म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ५७८

RFFBK-0001766

सचित्र उषःकालमाला पुस्तक. वा. व. २ रुपये.



टिळक अंक

Home Rule is my Birth Right and I Want it

LOK. B. G. TILAK.

वर्ष १ लें.] जुलै–ऑगष्ट. [पु. १० ते १२

लोकमान्यांचा संदेश

कवि–रा. रा. शं. रा. देशमूख एम्. एस्. सी. नागपूर

(चाल–राजहंस माझा निजला)

परिसलें मी तुमच्या शोका; सोडिले जुन्या जंव देहा
तो त्याच मर्त्यभूमिचा; जाणार एकदां केव्हां
वहविला पूर अश्रूंचा; तुम्हीं एक होऊनी तेव्हां
त्या तुमच्या उत्कट प्रीतिचें
माझ्या वरच्या लोभाचें
आधार मानितो साचें
परिवृथा करित शोकाला । 'लोकमान्य माझा निजला ॥ १ ॥

त्या नित्य सत्य जीवाला; मरण तें, कसें ये चित्ता
या वरच्या आवरणाला; जीव कां तुम्ही हो म्हणतां
जरी हें न कळे तुम्हांला; वाचाल एकदां गीता
जीर्ण देह हा जंव होई
जीव त्यासि सोडून जाई
नव देहीं पुन्हा तो येई
उमगलें जरी हें, बोला । लोकमान्य माझा निजला ॥ २ ॥

REFBK-001766

हें कोण वदतो वोल; सोडि मी हिंद जनतेला
माना ते सगळें फोल; आधार मुळीं नच याला
उठवितीच जे ही भूल; भीरू ते कार्य करण्याला
मम कार्यसुकर करण्याला
देह मी विशालचि कला
हिंदभूवरीं विस्तारला
व्हा प्रवृत्तचि अर्थाला । देईन तुम्हां स्फूर्तिला ॥ ३ ॥

नैराश्य छटा जो उठवी; राष्ट्र तो रसातळीं नेई
शत्रु तोच भारतदेशीं; मानावें अपुल्या चित्तीं
नर जेव्हां करी कृत्यासी; नारायण मग तो होई
जाणुनी याच तत्वाला
लागावें कर्तव्याला
न त्यजी कधीं आशेला
सफलता येई कार्याना ! बोल हे प्रभूचे माना ॥ ४ ॥

व्यामोह तुम्हा जंव होई; 'रहस्य' तदा मनीं आणा
संकटें शिरांवर येई; वारीन खास मी त्यांना
अति बली अतां मी होई; मानसीं आपुल्याजाणा
मत्कार्य घेऊनी हातीं
जे कोणी पुढती सरती
मम छत्रही त्यांच्या वरती
जाणुनी याच गोष्टीला । जा करा सतत कार्याला ॥ ५ ॥

नमूनो त्याच्या चरणारविंदी
करीतसे हिंदीयांना विनंती
ठेवूनि हृदयीं स्व आसनाला
पाही तसे तो तुमच्या कृतीला

लो० टिळक: हिंदुस्थानचे राजकीय गुरु.

[लेखक:—रा.ब. चिंतामण विनायक वैद्य एम्.ए.एल्एल्.बी.]

माझे परमपूज्य मित्र, हिंदुस्थानच्या प्रत्येक मनुष्याचे परमपूज्य मित्र लोकमान्य बाळ गंगाधर टिळक कैलासवासी झाल्यास आज दिडी महिना झाला. प्रत्येकाच्या अन्त:करणांत दु:खाचा कळस झाला आहे, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. असें परमावधीचें दु:ख,काशीपासून रामेश्वरापर्यंत, कलकत्त्यापासून कराचीपर्यंत भरतखंडांतील प्रत्येक मनुष्याच्या, हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन प्रत्येकाच्या अन्त:करणांत भरलें आहे, ही गोष्ट वर्तमान-पत्रांतील लेखांवरून, सभांतील भाषणांवरून, निरनिराळ्या प्रसंगींच्या लाखोंनीं मोजल्या जाणाऱ्या प्रचण्ड जनसमुदायांवरून स्पष्ट होत आहे. अशा रीतीनें सर्व हिंदी जनतेच्या अन्त:करणांत दु:खाचा उमाळा उत्पन्न करणारा सत्पुरुष हिंदुस्थानांत आज दोनशें वर्षांनीं किंवा तीनशें वर्षांनींच अवतीर्ण झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. इतकी व्यापक प्रेमाची साक्ष आजपर्यंत कित्येक शतकें भरतखण्डांत कोणत्याही व्यक्ती-संबंधानें दिसून आली नाहीं. असें हें अलौकिक प्रेम लो. टिळकांनीं कसें उत्पन्न केलें ? काय म्हणून 'लो. टिळक महाराजकी जय' हे उद्गार लाखों माणसांच्या तोंडून सर्व हिंदुस्थानभर आज निघत आहेत? या प्रश्नाचा विचार मी या अल्प लेखांत करणार आहे.

लो. टिळक या लेखाच्या मथळ्यांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें सर्व हिंदुस्थानचे राजकीय गुरु होते हेंच या प्रेमाचें मूळ आहे. ज्याप्रमाणें श्रीमच्छंकराचार्य यांनीं जगद्गुरुत्व धर्माच्या आणि तत्वज्ञानाच्या बाबतींत संपादन केलें होतें, त्याप्रमाणें राजकीय बाबतींत हिंदुस्थानांतील सर्व लोकांना लो. टिळक हे गुरुस्थान झाले होते. अर्थातच ज्याप्रमाणें श्रीमच्छंकराचार्यांच्या चरणारविंदीं सर्व धर्माचे लोक लोटांगण घालीत असत, असें आपण इतिहासांत वाचतों, त्याचप्रमाणें राजकीय बाबतींत हिंदुस्थानचे सर्व लोक, सुज्ञ व अज्ञ, लोकमान्यांस गुरू समजून त्यांच्या पायीं लोटांगण घेत होते. ४० वर्षांच्या परिश्रमाचें, तपश्चर्येचें, एकान्तिक देशसेवेचें आणि राजकीय विषयांतील असामान्य दूरदर्शित्वाचें हें फळ होय, हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. हा चाळीस वर्षांचा त्यांचा आयुष्यक्रम आपण थोडक्यांत पाहूं आणि लोकमान्य टिळक एक अवतारी पुरुष कसे होते याची आपल्या मनाशीं खात्री पटवून घेऊं.

विद्याभ्यास होऊन कॉलेजांतून बाहेर पडल्याबरोबरच लो. टिळकांनीं आपल्या स्वदेशसवेचा कार्यक्रम आरंभिला. पृथ्वीच्या नकाशाकडे आपण हजारों लोक पाहतों

पण अवतारी बुद्धिवान् पुरुषाच्या लक्षांत जी गोष्ट आली ती आपल्या कधींच येत नाहीं. फळ झाडापासून तुटून खालीं पडलें हा सामान्य सर्व ठिकाणीं होणारा वृत्तान्त आहे. पण तो चमत्कार आहे असें न्यूटनच्या लक्षांत आलें आणि त्यानें गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त वसविला. पृथ्वीच्या नकाशाकडे पाहून सर्व पृथ्वीवर पारतंत्र्याच्या दुःखांत पोळणारा देश-समृद्ध विस्तीर्ण देश-हिंदुस्थानच आहे हें पाहून स्वदेशाच्या उद्धाराकरितांच जन्म घेतलेल्या लोकमान्यांच्या हृदयांत स्वदेशाच्या सेवेचें व्रत अंगीकारण्याचें निश्चयाचें वारें उत्पन्न होऊन हिंदुस्थानास स्वातंत्र्य मिळवून दिलें पाहिजे, हिंदुस्थानास स्वराज्य प्राप्त करून देण्यासाठींच मी आपला सर्व आयुष्यक्रम अर्पण करीन असा त्यांनीं निश्चय केला. शाळा आणि वर्तमानपत्र या दोन साधनांनीं लोकमत जागृत करण्याचा प्रथम संकल्प करून आपला पुढचा आयुष्यक्रम देशसेवेस त्यांनीं वाहिला. यांत त्यांनीं किती स्वार्थत्याग केला याची कल्पना हल्लींच्या काळाच्या ग्राज्युएटांना करतां यावयाची नाहीं. हल्लीं बहुतेकांना भिक्षांदेहीचीच पाळी दिसते आणि स्वदेशाच्या धंद्यांत कांहीं विशेष नुकसानही दिसत नाहीं. पण लोकमान्य टिळक जेव्हां ग्राज्युएट झाले त्यावेळीं प्रत्येक ग्राज्युएट शंभर दोनशेंची जागा पटकावून हजाराच्या रस्त्याला लागत होता, किंवा हायकोर्ट वकीलीच्या धंद्यांत लाखों मिळविण्याची उमेद बाळगीत होता. पण अशावेळीं अशा भावी स्वार्थावर लाथ मारून दारिद्र्य पत्करून लोकमान्यांनीं आपल्यास स्वदेश सेवेस अर्पण करून घेतलें हा त्यांचा पहिला स्वार्थत्याग होय.

पण नुसत्या स्वार्थत्यागानें कार्य होत नाहीं. अवतारी पुरुषांना अलौकिक दृष्टि लागते. हिंदुस्थानदेश पारतंत्र्याच्या दुःखांत लोळत आहे ही जाणीव प्रथम उत्पन्न झाली पाहिजे आणि ही जाणीव उत्पन्न होऊनहि हीन दिसणाऱ्या हिंदुस्थानाला स्वातंत्र्य किंवा स्वराज्य प्राप्तकरून देणें शक्य आहे ही कल्पना सुचली पाहिजे. हजारापैकीं ९९९ ना त्यावेळीं प्रथम आम्हीं पारतंत्र्यांत लोळत आहोंत हीच जाणीव नव्हती. शेंकडा ९९ लोक ब्रिटिश राज्य उत्तम आहे, असेंच समजून साहेबानें नुसता सलाम घेतला तर खुष होत होते आणि साहेब आपल्याशीं बोलला म्हणजे आपलें सारें कल्याण झालें असेंच समजत होते. ब्रिटिश सुराज्य आहे, निदान जालियानवालाबागेच्या कत्तलीपूर्वी तरी तें सुराज्य होतें असें माझें मत आहे. पण कितीही सुराज्य असलें तरी पारतंत्र्यांत पडलेला समाज कधींही सुस्थितीचा अनुभव घेत नाहीं असा इतिहासाचा सिद्धान्त आहे आणि याच सिद्धान्ताचें स्पष्टीकरण Good Government can never be a substitute for Self-Government असें एका प्रसिद्ध उदारमतवादी इंग्लंदच्या प्राइममिनिस्टरचें वाक्य करीत आहे. तात्पर्य, हें कीं आम्हीं पारतंत्र्यांत पडलों आहों हेंच अगोदर त्यावेळीं लोकांच्या नजरेंत येत नव्हतें आणि कदाचित् आलें तरी हिंदुस्थानचे लोक इतके हतवीर्य व नादान आहेत कीं ते स्वराज्य उपभोगण्यास लायक नाहींत असेंच त्यांना वाटे. तात्पर्य; ज्यावेळीं

लोकमान्यानीं स्वदेशसेवेचें व्रत अंगिकारिलें त्यावेळीं जनसमाजांत हाच मोठा भ्रम होता कीं, हिंदुस्थानचे लोक स्वराज्यास लायक नाहींत; आणि ब्रिटिश राज्यासारखें राज्य नाहीं. खरी देशस्थिति मनुष्याच्या प्रत्ययारूढ होण्यासही तेजस्विता आणि बुद्धिवैभव याची जरूरी आहे. अवतारी पुरुषाचें लक्षण हेंच आहे. विजापुरांत रस्त्यांत गाईचा वध कसाई करीत होता तो पाहून अन्तःकरण कळवळलें श्रीशिवाजीमहाराजाचेंच. लोक हजारदां हा प्रकार विजापुरांत पाहत असले पाहिजेत. पण हिंदुधर्म आणि महाराष्ट्र पारतंत्र्याच्या रसातळीं गेला आहे ही जाणीव उत्पन्न झाली शिवाजीमहाराजानांच. "फारच बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच" याची जाणीव गुलामाला कधींच होत नाहीं. जसें शिवाजीमहाराजाचेंच अंतःकरण, तत्कालीन धर्माची आणि लोकांची हीनस्थिति पाहून कळवळलें त्याचप्रमाणें महाराष्ट्राला या स्थितींतून बाहेर काढतां येणें शक्य आहे, महाराष्ट्रांत स्वधर्म आणि स्वराज्य कायम करणें संभाव्य आहे हेंही वाटलें शिवाजीमहाराजांनाच. शहाजी राजे त्यांचे वडील सामर्थ्यवान् कमी होते असें नाहीं. प्रत्यक्ष निजामशाहीच्या सिंहासनावर बालसुलतानाला घेऊन ते बसत होते. पण महादेव गोविंद रानड्यांप्रमाणें शहाजीराजांना देशाचे स्वातंत्र्य किंवा हिंदुस्थानचें स्वराज्य हे शब्द सुचले नाहींत किंवा शक्यही दिसले नाहींत. तात्पर्य हें अवतारी पुरुषाचें लक्षण आहे कीं, जी गोष्ट सामान्यजनांना दिसत नाहीं किंवा शक्य वाटत नाहीं ती अलौकिक सामर्थ्याच्या पुरुषास दिसते व शक्य वाटते. आणि यांतच लोकमान्य टिळकांच्या राजकीय गुरुपणाची किल्ली आहे.

हिंदुस्थानचे लोक ब्रिटिश साम्राज्याच्या सुराज्यांतही पारतंत्र्याचें दुःख भोगीत आहेत आणि त्यांस स्वराज्याचा लाभ करून देणें शक्य आहे ह्यागोष्टी जाणून लोकमान्यांनीं आपला कार्यक्रम आंखला. केसरीपत्राच्या द्वारानें त्यांनीं हें कार्य प्रथम हातीं घेतलें. लोकांच्या ठिकाणीं आम्हीं नालायक आहों, मागसलेले आहों, पाश्चात्यांच्या मानानें कमी सुधारलेले आहों, राजकीय बाबतींत अगदीं शस्त्र शास्त्रहीन आहों अशा प्रकारचा लोकांचा भ्रम नष्ट करून त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास उत्पन्न करण्याचें काम त्यांनीं प्रथम उचललें. व त्याचे बरोबर ब्रिटिश राज्यांत कांहींच न्यून नाहीं, ब्रिटिश राज्यांत सर्वच आनंदी आनंद आहे हाही लोकांचा व राज्यकर्त्यांचाही भ्रम नष्ट करावयास पाहिजे होता. तेंही काम त्यांनीं केसरीद्वारा केलें. ब्रिटिश राज्यपद्धतींतील अनेक वैगुण्यांवर आणि त्या राज्यपद्धतीनें होणाऱ्या अनेक दुष्परिणामांवर निर्भीड व चरचरित लेख त्यांनीं लिहिले. अशा लेखांचा विपर्यास होईल हें त्यांस माहित होतें. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना लोकमान्य ब्रिटिश राज्य उलथून पाडण्याचा प्रयत्न करणारे आहेत असें वाटणें साहजिक आहे. त्यांत आश्चर्य हें कीं, कित्येक हिंदी गृहस्थाना सुद्धां असाच भास प्रमाणिकपणें झाला असें म्हणावें लागतें. पण हा समज ब्रिटिश नोकरी

शत्रीय कार्य किंवा हिंदी नेमस्तांचा काय निश्चयानें चुकीचा होता. ब्रिटिश राज्य नष्ट व्हावें असा लोकमान्य टिळकांचा कधींच आशय नव्हता. ते विलायतेंत गेले असतां इंग्रजी लोकांस लोकमान्य अराजक किंवा ब्रिटिश राज्यद्रोही नाहींत हें प्रत्यक्ष अनुभवानें पाहून मोठें आश्चर्य वाटलें. असो, मीही स्वानुभवानें सांगूं शकतों कीं, लोकमान्यांचे असें मत कधींच नव्हतें. हिंदुस्थानच्या भावी कल्याणासाठीं हल्लींच्या जगताच्या परिस्थितींत ब्रिटिश साम्राज्याच्या अस्तित्वाची या देशास अवश्यकता आहे असें त्याचें प्रांजल मत होतें आणि तें ते बोलूनही दाखवीत. पण हल्लींचीं राज्यपद्धति बदलून लोकांच्या तंत्रानें राजकारभार चालला पाहिजे असें त्यांचें मत होतें, आणि याच्या सिद्धयर्थ त्यांस ब्रिटिशराज्याच्या वैगुण्यावर सणसणित टीका करावी लागली व ती त्यांनीं सर्व प्रकाराचे हाल सोसून केली. अनेक दुर्धर प्रसंग ओढवले ते सहन केले, हें सामर्थ्य लोकमान्य टिळकांचेंच होय.

मी लोकमान्यांस अवतारी पुरुष म्हटलें आहे. अर्जुन आणि श्रीकृष्ण अशी नरनारायणाची जोडी भारतीयुद्धाच्या वेळीं होती तींच रामदास आणि शिवाजी महाराज या रूपानें महाराष्ट्राच्या आपत्तीच्या वेळीं अवतीर्ण झाली म्हणजे ब्राह्म व क्षात्र दोन्हीं तेजें भिन्न रूपें धारण करून आलीं. हल्लींच्या वेळीं प्रत्यक्ष निराळ्या क्षात्रतेजाची आवश्यकता नव्हती म्हणून **ब्राह्म व क्षात्र दोन्ही अंश** धारण करून लोकमान्य टिळकांची विभूती निर्माण झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. रामदास आणि शिवाजी या दोन्ही तेजांच्या अंशानें ते अवतीर्ण झाले होते. दुःखें सहन करण्याचें सामर्थ्य क्षात्रतेजाशिवाय येत नसतें. कर्णानें ब्राह्मण असून परशुरामाचें शिष्यत्व पत्करलें. पण मांडी पोखरली जाऊन रक्तबंबाळ झाली तरी हूं कां चूं न करण्याचें त्याचें क्षात्रसामर्थ्य परशुरामानें ओळखलें. लोकमान्यांचे अनुयायी होण्यास पुष्कळ तयार होतील पण त्यांच्यासारखे जेलखान्यांत जाण्याचें धैर्य व सामर्थ्य ज्यांत आहे असे लोक फारच थोडे. असो, अशा प्रकारचे सर्व हाल सोसून त्यांनीं आपलें स्वदेशसेवेचें कार्य १९१४ पर्यंत चालू ठेविलें, आणि लोकांचा भ्रमण म्हणजे आपल्या नालायकीचा भ्रम किंवा ब्रिटिश राज्यांत सर्व उत्तम गोष्टी आहेत हा राज्यकर्त्यांचा भ्रम त्यांनीं खोडून काढला. हिंदी लोक स्वराज्यास सर्वस्वीं याचवेळीं लायक आहेत असा त्यांनीं कांग्रेसकरवीं स्पष्ट ठराव नमुद करविला, आणि हिंदुस्थानला स्वराज्य देणें आमचें राज्यधोरण आहे असें मॉंटेग्यूसाहेबांकडून स्पष्टपणें वदवून घेतलें.

अवतारी विभूतिचें कार्य " विनाशायच दुष्कृताम् " एवढेंच नसून " **धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे** " या भगवदुक्तीप्रमाणें धर्मसंस्थापनाचेंही आहे हें महशूर आहे. दुष्कृतांचा विनाश प्रत्यक्षतः या हल्लींच्या परिस्थितीत करावयाचा नव्हता, तर दुर्मतांचा करावयाचा होता. तो भ्रान्त मतांच्या नाशाचा

अथवा destructive कार्यभाग करूनच लोकमान्य थांबले नाहींत तर त्यांनी राजकीय क्षेत्रांत स्वधर्मस्थापनाही केली आहे हें लक्षांत घेतले पाहिजे. ब्रिटिश साम्राज्याचें अस्तित्व आणि हिंदुस्थानचें स्वातंत्र्य या दोहोंचा मेळ कसा घालावयाचा याचा उलगडा त्यांनीं होमरूल लीग स्थापना करून केला. लोकमान्यांनीं constructive work कांहीं केलें नाहीं असें म्हणणाऱ्यांनीं त्यांनीं स्थापन केलेल्या होमरूल लीगकडे पहावें. अनेक हाल सोसून जागोजागीं फिरून एक एक दिवसांत चार चार व्याख्यानें हजारों लोकांच्या समोर देऊन सर्व हिंदुस्थानांत विशेषतः महाराष्ट्रांत ही संस्था लोकमान्यांनी बळकट केली आहे. याचबरोबर दुसरे धर्मस्थापनेचें कार्य म्हटलें म्हणजे त्यांनीं जगापुढें ठेविलेलें भगवद्गीतारहस्य हें होय. हा ग्रंथ केवळ धार्मिक नाहीं तर या ग्रंथांत प्रतिपादन केलेला कर्मयोग राजकीय व्यवहारांत सुद्धां उपयोगी पडणारा आहे; या कर्मयोगाचें रहस्य समजावून देण्याचें किंवा त्याची थोरवी गाण्याचें हें स्थल नव्हे. पण भगवद्गीतेच्याच शब्दांनीं म्हणावयाचें तर " इमं विवस्वते योगं प्रोक्तवान् अहमव्ययम्–सकालेनेह महता योगो नष्टः परंतप " तो श्रीकृष्णानें उपदेशिलेला कर्मयोग महान कालाच्या अवधींत नष्ट झालेला लो० टिळकरूपानें भगवंतानीं पुन्हां उपदेशिला असें म्हणावयास हरकत नाहीं.

होमरूल लीगची स्थपना आणि कर्मयोगाचा पुनरुपेदश हीं दोन महत्वाची धर्मसंस्थापनेचीं कार्यें लोकमान्य टिळकांनीं अलीकडच्या पांच सहा वर्षांत केली, तेव्हां अर्थातच जगताचें राजकीय बाबतींत गुरुपण त्यांजकडे आलें. हिंदुस्थानांत सर्व लोकांना त्यांच्या मताची सत्यता पटली आणि हिंदुस्थानच्या भावी राजकीय प्रगतींत कोणत्या दिशेनें आपण झटावें हें सांगण्याची जबाबदारी सर्व लोकांनीं, मद्रास, बंगाल, सी. पी. यू. पी. पंजाब या ठिकाणच्या सर्वमताच्या लोकांनीं व लोकाग्रणीनीं लो. टिळकांवर टाकली. भवबन्धनांतून सोडविणारा मोक्षगुरु प्रत्येक मुमुक्षूस जसा प्रिय असतो त्याचप्रमाणें हिंदुस्थानास राजकीय बंधनापासून मोक्ष मिळविण्याचा मार्ग दाखविणारा गुरु हिंदी जनतेस अत्यंत प्रिय झाला याचें आश्चर्य नको आणि म्हणूनच या गुरुच्यानिधनाबद्दल सर्वव्यापी दुःख आज हिंदी जनतेवर पसरलें आहे. लो. टिळक आणखी पांच वर्षें वाचतें आणि हिंदुस्थानच्या पूर्ण स्वरज्यप्राप्तीच्या प्रगतीस ठिकाणीं नेऊन पोंचविते तर फारच बरें झालें असतें. निदान एक वर्ष वाचून स्वराज्याच्या पहिल्या हप्त्याचा कसा लाभ घ्यावयाचा हा मार्ग दाखविते तर बरें झालें असतें. परंतु लो. टिळकांनीं आपल्या शिष्यांची कसोटी पाहण्यासच इतक्या लवकर परलोकवास पत्करला असें वाटतें. श्रीसमर्थ रामदासांनीं जशी एकदां शिष्याची परीक्षा केली. तशी ही परीक्षेची वेळ आहे, आणि प्रसंगाला आणि Sacrifice च्या कसोटीला कोण तगतो. हें पाहण्याची अथवा दिसण्याची वेळ आली आहे.

प्रत्येक मोक्षगुरूंप्रमाणें लोकमान्य टिळकांनीहीं आपल्या उपदेशाचा मंत्र लोकांना दिला आहे. हा मंत्र तेजस्वी असून तो नुसता जपमाळ घेऊन घोटावयाचा नाहीं, तर कर्मयोगाच्या पल्लवांनीं तो अवगुंठित करून आचरणांत आणावयाचा आहे. Home rule is my birth-right and I shall have it असा हा मंत्र आहे. यांतील प्रत्येक शब्द महत्वाचा असून त्यांतील शेवटचें लहानसें दिसावयाला वाक्य अतिशय तेजस्वी आहे. I shall have it. मी स्वराज्य मिळविणार अशी जपमाळ घेऊन स्वराज्य कधींही मिळावयाचें नाहीं. तर हा निश्चय आपल्या मनाशीं करून सतत उद्योग even at a sacrifice नव्हे तर at every sacrifice जो जो स्वार्थत्याग लागेल तो करून चालविला पाहिजे आणि पूर्ण स्वराज्य मिळेतोंपर्यंत कोठेंही न थांबले पाहिजे. हा उद्योग सनदशीर मार्गांनींच करावयाचा आहे हें मात्र लक्षांत ठेविले पाहिजे. असा कर्मयोग स्वराज्यग्रासीसाठी प्रत्येक मातृभूमीवर प्रेम करणाऱ्या हिंदुपुत्रास लोकमान्य टिळकांचा आमच्या सर्व हिंदवासीयांच्या राजकीय परात्पर गुरूचा-आत्मा दाखविण्याचें सामर्थ्य देवो अशी त्याची ईश्वरीभूत आत्म्याची प्रार्थना करून हा लेख संपवितों.

कालाचा घाला !

(मंदाक्रांता)

" रात्री गेले **टिळक** " कळतां हातिंचा हातिं पेला
नेत्रांवाटे टपटप गळे अश्रुंची पूर्ण माला
शून्या झाल्या सकलहि दिशा सृष्टि भासे उदास
भानु व्योमीं जलद पटलीं झांकुनी घे मुखास ॥ १ ॥

मार्गीं साऱ्या **तिलक** निधनें खिन्नतापूर्ण लोक
वृक्षांच्याही दलिंदलिं दिसे अश्रुचिन्हात शोक
ज्याचीं त्याचीं स्तुति चरणें शोक पंकांत भूच्या
शब्दांमाजी रुदन भरलें हाय हाय ! सर्वी द्विजांच्या ॥ २ ॥

राष्ट्राचा जो तिलक भगवान् लोकबंधु स्वधामा
गेला स्वर्गीं **तिलक** आपुला हाय हा **बाळनामा**
राष्ट्रीयांच्या रुचिर सुमनीं हार जो गुंफलेला
एकाएकीं उचलुनि तया काल तो दूर गेला ॥ ३ ॥

ज्याचा लोकी महिपतिजनीं नीतिशाली दरारा
ज्याच्या शब्दें त्रिविध जनही एक व्हावें भरारा
केली नाहीं धन मिळविण्या क्षुद्रसेवा पराची
केली सेवा तनुमनधनें एकट्या **भारताची** ॥ ४ ॥
ज्याचें कानीं वचन पडतां चेतना अंगिं यावी
लेखें ज्यांच्या सहज जनता दिव्य तेजें भरावी
नेत्रीं ज्याच्या अतुल भरलें **तेज** तें कोहिनूरी
सत्कृत्याची त्रिभुवनिं सदा वाजती राहि भेरी ॥ ५ ॥
गेला हाहा नरवर असा **वाळ** तो **लोकमान्य**
धैर्यी ज्याच्या जगतिं न तुला तोड नाहींच अन्य
न्यायाच्या जो सदनिं वदतां न्याय-मूर्तिहिमुग्ध
मुंबातीरीं तिलक तनु ती हाय हा होय दग्ध ॥ ६ ॥
देशासाठीं तळमळ जया मेरु जो निश्चयाचा
स्वार्थत्यागी नर न दुसरा सर्वदा एक वाचा
स्वातंत्र्यार्थीं झटुनि झटला अंतहीं होय त्यांत
माते ! आतां रुदन किति हें शांत हो शांत शांत ॥ ७ ॥
नेला कालें मुकुट न जया भूपती भारताचा
लाभे त्याला सुरसदनिं त्या मान सिंहासनाचा
स्वातंत्र्याचा पुनरपि जनां पाठ देईल लोकां
माते ! आतां पुसुनिपदरें अश्रु, आटोप शोका ॥ ८ ॥
त्वदुःखानें तनय तव हे सर्व दुःखांत मग्न
माते तूझ्या बघुनि वदना चित्त शोकांत भग्न
द्याया धीरा तुजविण दुजें कोण गे या अम्हांस
माते ! आतां किति दिवस तूं राहसी गे उदास ॥ ९ ॥
दावी आम्हां सुपथ जननी ! दाखवोनी दिशा ही
होवा नाहीं तव मनिं असें कार्य तें काय पाहीं
शोकानें तूं जरिहि गळशी कोण आम्हांस धीर
माते ! कष्टी मनिं न मुळिं हो पुत्र हे सत्यवीर ॥ १० ॥

" वसन्तविहार "

लोकमान्यांची पदवी

[रा. रा. **न. चिं. केळकर**. वी. ए. एल्. एल्. बी.]

लोकमान्य टिळकांचे विशेष गुण लक्षांत घेता त्यांना कोणती पदवी योग्य या-विषयीं पुष्कळांना पुष्कळ विचार सुचतात. Father of Indian unrest हा शब्द अनेक दृष्टींनीं अर्थोद्बोधक असून त्याचें भाषांतर कोणत्या मराठी शब्दानें करावें याविषयीं अनेक सूचना मजकडे आल्याहि आहेत, तीच कल्पना थोडी निराळी करून लो. टिळकांना पदवी द्यावयाची तर आपल्या जुन्या मायन्यांतील राजकार्य धुरंधर या विश्वासनिधी यापैकीं राज्य या ऐवजीं राष्ट्र शब्द घातला असतां तीहि पदवी योग्य होईल असें मला वाटतें. दोनही शब्द आपापल्या परीनें समर्पक उद्दिष्ट अर्थ उत्कृष्ट रीतिनें व्यक्त करणारे आहेत टिळकाचें नांव आपल्यांशीं निरंतर निकटबद्ध अशाविषयीं निरनिराळ्या शब्दांचा कांहीं दिवस जो संग्राम चालेल तो प्रेक्षणीय होईल यांत शंका नाहीं यांत जो शब्द यशस्वी होईल तोच भाग्याचा.

लो० टिळक. सन १८९०.

लो० टिळक. सन १८९२.

लो० टिळक. सन १८९५.

लो० टिळक. सन १९००.

लो. टिळकांच्या कांहीं गोष्टी.

[लेखक:—रा. रा. कृ. आ. गुरुजी]

चरित्र लिहावयाचें मनांत आलें म्हणजे ज्याचें चरित्र लिहावयाचें त्याचे बाह्य स्वरूपावरूनच तें लिहूं गेल्यास तें चांगलें वठत नाहीं व वठावयाचें नाहीं. त्यास चरित्रनायकाचे बाह्य स्वरूपाप्रमाणेंच अंत:स्वरूपाचेंहीं ज्ञान करून घेतलें पाहिजे. कारण जसें दिसतें तसें असतेंच या भरवंशावर फसलेले लोक बरेच आढळतात. " स्नान संध्या टिळे माळा, पोटी क्रोधाचा उमाळा " ही तुकारामोक्ति माझ्या वरील विधानास पोषकच आहे असें मला वाटतें. आमच्या लोकमान्यांचा सणसणीत लेख, खणखणींत आवाज आणि झणझणीत शब्द वाचून व ऐकून प्रत्येकास, नव्हे, खुद्द मला असें वाटें कीं हे जमदग्नीचा अवतार असले पाहिजेत. यांचे " विष्णु आणि तेलंग, " " हा ह्मातार चळ की पोर खेळ " इत्यादि लेखांतील भयंकरपणा पाहून माझे नेत्रासमोर काजवेच आले ! कै. काशीनाथ त्रिंबक तेलंग, महादेवराव गोविंद रानडे म्हणजे कांहीं सामान्य प्रकरणें नव्हेत, कीं ज्यांच्या संबंधानें कोणी फारसा विचार करीत नाहींत. हीं दोन्ही धेंडें सर्व हिंदुस्थानास महशूर, या दोन्ही पुरुषांचा लोकांत तसाच सरकारांत सन्मान सारखा, दोघेही विद्वन्मणी माळेचे मेरू अशी ख्याति असें असतां ते जरा घसरलेले दिसतांच या राजश्रींनी भीडमुरवतीचें गाठोडें झुगारून देऊन आपला निर्भयतेचा कोरडा यांच्यावर यथास्थित चालविला !

यांच्या लेखाचे असें अनेक मासले मी पाहिले; यांची विचारसरणि, कोटिक्रमपद्धति, ओतप्रोत माहिति पाहिली. व पुढें पुढें यांचीं प्रत्यक्ष दर्शनेंही होऊं लागलीं, आपलेपणाचे अनुभवही येऊं लागले, हजाराच्या बोलण्यांत यांचा अमोलिक स्वार्थत्याग, अळोट बुद्धमिता, अनुपम धैर्य, अपूर्व चिकाटी इत्यादि गोष्टी येऊं लागल्या. तेव्हां यांत तथ्य किती आहे याचा अनुभव घ्यावा आणि तो पटल्यास यांचें एक छोटेसें चरित्र लेखनपट्टूंच्या उपयोगी पडेल असें तयार करावें, अशा उद्देशानें मी आजाऱ्याचे मिषानें यांच्या घरीं राहून यांच्या संबंधानें शक्य तितकें साधन मिळवून यांचेच चरित्राचा एक भाग तयार केला व तो—लोकमान्यांच्या वाढदिवसानिमित्त वाचकांस सादर केला.

या एका भागाकरतां कोण मारामार ! किती लपंडाव्या, किती गुप्त कारस्थान किती घरभेद, आणि किती उचलाउचली, लपवा लपवी करावी लागली हें मी तर जाणतोंच पण आमच्या लोकमान्यांची आक्का, लोकमान्यांची सुशील पत्नी आणि

वैकुंठवासी झालेले थोरले चरंजीव आज हयात असते तर ते सांगते. जरी ते आमच्या कारस्थानांत नव्हते तरी जातां येतां सहजासहजी कान देणारे लोकमान्यांचे भाचे रा. रा. धोंडोपंत विध्वंस हेही बरेंच सांगतील.

इतका परगणा करण्याचें कारण हेंच कीं " जो स्वदेशास पारतंत्र्यांतून मुक्त करील तोच चरित्रास लायक आहे. हें ज्याचे हातून घडलें नाहीं तो चरित्रास लायक नाहीं हें लोकमान्याचें मत आम्हांस रुचेना व आमचें करणें त्यांस पटेना ! हेंच होय. लोकमान्य एके बाजूस एकटे आणि दुसरे बाजूस मजसकट चौघे होतों तरी त्यांच्या चरित्राचीकिल्ली त्यांचे कपाटांत असल्यामुळें पहिला भाग कसावसा बाहेर पडला आणि दुसरा राहिला तो राहिलाच ! आतां रा. रा. आप्पाजी विष्णु कुळकर्णी यांनीं यांच्या चरित्राची पुष्कळशी सामुग्री तयार केली आहे, तसेंच रा. रा. सीताराम केशव दामले यांनीं एक छोटेसें चरित्र लिहिलें असून आज अनेक इतिहासबहाद्दर त्यांचें चरित्र लिहिण्यासारखे आहेत तेव्हां मजसारख्या सामान्य मनुष्यानें काय लिहावें ? असा प्रश्न उत्पन्न होतो. त्याचें उत्तर इतकेंच कीं, थोर पुरुषांचीं चरित्रें अमक्यांनींच गावीत आणि अमक्यांनीं गाऊं नयेत असा प्रतिबंध जोंपर्यंत झाला नाहीं, अथवा या संबंधानें कायद्याची शिक्षा मागणारी मंडळी जोंपर्यंत निपजली गेली नाहीं, तोंपर्यंत, ज्यांना जितके व ज्या प्रमाणांत गुण गातां येतील तितके त्यानें खुशाल गावेत. या तत्वास अनुसरून लोकमान्यांच्या व माझे परिचयांत तो अनुभव मला आला तो आपले वाचकांस कळविण्याचा विचार केला आहे. त्याचा ते उपयोग करोत अशी प्रार्थना आहे.

(१)वासुदेवाचे बळवंत कां झालें ?

आपले लोकांत मुलाचें नांव ठेवतांना जन्म वेळेवरून जें नांव निघेल तेंच ठेवायाचे व टोपण अथवा सर्वांस प्रिय असें दुसरें टोपण नांव ठेवावयाचें असा प्रघात आहे. तरी कागदोपत्रीं मूळ नांवाचाच उपयोग बहुतेक केला जातो, असा प्रघात असतां लोकमान्यांनीं मूळ नांवाचा अजिबाद लोप करून टोपण नांवच प्रघातांत आणले याचें योग्य कारण याचें अक्कास सांगतां येणें शक्य नव्हतें, तरी यांच्या काकास सांगतां येणें शक्य होतें. परंतु त्यांसही सांगतां आलें नाहीं तेव्हां एके दिवशीं सहज गोष्टी निघतां निघतां आपलें नांव **वासुदेव** असतां आपण **बळवंत** नांवाचाच उपयोग कां करता ? म्हणून प्रश्न केला असतां बळवंतराव म्हणाले, आमची मातुःश्री तपस्विनी होती. पुत्रप्राप्तीस्तव तिनें वर्ष दीड वर्ष सूर्याराधनाचें खडतर तप केलें होतें. तिनें प्रेमानें जें नांव ठेवलें व जें सर्वांनीं प्रचारांत आणलें त्याची योग्यता शास्त्रप्रेमापेक्षां कमी नसल्यामुळें तेंच मी उपयोगांत आणूं लागलों. खरें आहे. माता तपस्विनी असो वा नसो तिचे निर्व्याज प्रेमाची सर तिचेच प्रेमाला; अन्याला कशी येणार ?

(२) दादा म्हणूं नका.

लोकमान्यांच्या कुटुंबांतील सर्व मनुष्यें त्यांना दादा म्हणत असल्यामुळें कारखान्यांतील सर्व लोक त्यांस दादाच ह्मणत असत. बाकीचे त्यांचे बरोबरीचे, स्नेही वगैरे लोक बळवंतराव ह्मणत. मी त्यांचे कुटुंबापैकींच एक असें समजत असल्यामुळें मी ही त्यास दादा ह्मणूं लागलों. परंतु माझे दादा ह्मणणें त्यास आवडलें नाहीं. एकदां त्यांना कोठेसें जावयाचे होते आणि ते टाईम्स वाचीत आरामाच्या खुर्चीवर बसले होते. त्यांनीं जाण्याची वेळ नजीक आली आणि चहा तर घ्यावयाचा होता. तेव्हां मी दादा, आपली बाहेर जाण्याची वेळ झाली ना ? चहा तयार आहे असें सांगितलें तेव्हां ते ह्मणालें तुम्ही मजपेक्षां सात वर्षांनीं वडील असून दादा कां ह्मणतां ? हें बरोबर नाहीं मला हें नापसंत आहे. मी ह्मणालों " जरी वाढळा येरंड तरी तो होईल काय इक्षु दंड" हें वाक्य खरें असल्यास माझें म्हणणें अयुक्तिक नाहीं. उसापेक्षां येरंड किती जरी मोठा वाढला तरी त्याचा जन्म उसाच्या मागचा आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. वडीलकी, ज्ञानावर अवलंबून असते. तो मान ज्याचा त्यास मिळाला पाहिजे. या विषयावर बरेंच बोलावयाचे होतें पण तें साधलें नाहीं ! वेळेच्या अभावामुळें राहिलें तें राहिलेंच.

आपलेपणा.

ज्याला एकदां आपलें म्हटलें तो जन्माचा आपलाच झाला असें समजून ते याच्याशीं वागत असत. मग ती एकादी व्यक्ति असो अथवा संस्था असो. त्या व्यक्तिचे अथवा संस्थेचे व आपले संघट्टण असो वा नसो, मतभेदामुळें कायमचे बिनसो अथवा न बिनसो. ऐनवेळेला यांचा आपलेपणा पुढें यावयाचाच. असें कांहीं प्रसंग माझे लक्षांत आहेत. त्यांतील एक प्रसंग आगरकरांच्या मृत्यूसंबंधाचा होय. यांच्या हातून कांहीं मृत्युलेख लिहिले गेले पण ते लिहवितांना हृदय दाटून आल्यामुळें दुःखाचे सुसकारे टाकीत, इकडे तिकडे फिरत, डोळ्यांतील अश्रु पुशीत. जर कोणाचे मृत्यूलेख लिहिले असतील तर ते आगरकर व रानडे यांचे होत. पहिल्या प्रसंगाचे वेळीं मी समक्ष होतों. दुसऱ्याचे वेळीं नव्हतों म्हणून दुसऱ्या विषयीं मला ऐकिवापेक्षां जास्त कांहीं सांगतां येत नाहीं. या वेळीं लोकमान्य म्हणाले, आगरकर आणि मी किती जरी भांडलों, वाक् प्रहार करण्याकरितां आम्ही आपल्या तीक्ष्ण शस्त्रास्त्रांनीं केव्हडे जरी प्रहार केले असले तरी आगरकरासारखा योद्धा आगर. करच ! लंगडा पाय रणांगणावरून कसा नाचवावा ही विद्या अगरकरासारखी दुसऱ्यास साधावयाची नाहीं! टिळकांच्या अंतःकरणाची रग आगरकरांच्या अंतःकरणाप्र

जितकी लागते तितकी इतरास लागणें शक्य नाहीं! हें मनांत आलें म्हणजे विचार शून्य होतात ! मति मूढ बनते ! म्हणून अंतःकरणांत कालवत असलेले विचार थांबून थांबून काढावे लागतात ! ज्यांचें अंतःकरण थोर त्यांचें सर्वच थोर !

कालेजांतील आगरकरांची जागा रिकामी झाली होती ती भरून काढण्यासारखा त्यांच्या जोडीचा व तोडीचा टिळकांखेरीज दुसरा कोणीं नाहीं असें वाटणाऱ्यांपैकीं एक गृहस्थ लोकमान्याकडे आले. त्यावेळीं केसरीच्या मजकुराचा वार होता. या आठवड्यांत वर्तमानपत्रें वाचलीं नसल्यामुळें कांहीं इंग्रजीं पत्रें त्यांच्या अराम खुर्ची जवळ, कांहीं ठिकाणीं खुणा करून ठेवली होतीं व लेखक भोजनाकरतां घरीं गेले होते. लोकमान्याचें भोजन अवरून सुपारीचीं खांडें तोंडांत टाकून अरामाच्या खुर्चीवर नुकतेंच बसून वर्तमान पत्रें खालींवर करीत होते. अशा समयांत वर सांगितलेले गृहस्थ आले. इकडच्या तिकडच्या एक दोन गोष्टी झाल्या. नंतर त्या गृहस्थांनीं आगरकरांचे जागेवर आपण याल काय? असा हासत हासत प्रश्न केला. तेव्हां टिळक म्हणाले:— "कालेज आमचे आहे त्यास कमीपणा येत असल्यास सर्वांनीं आपले मतभेद बाजूस सारून संस्था चालवणें हें सर्वांचें कर्तव्य आहे. तशी जरूरच असल्यास ती भागविण्यापुरता मी येईन. " लोकमान्यांच्या या उत्तरानें त्यांचें समाधान झालें व ते म्हणालें आपलें मनाचा थोरपणा आणि संस्थेबद्दलचा आपला अभिमान पाहून आनंद झाला, तो व्यक्त केल्यावांचून रहावत नाहीं. वगैरे प्रकारचे औपचारिक भाषण करून आलेले गृहस्थ निघोन गेले व हे आपले कामास लागले.

कै. महादेव बल्लाळ नामजोशी यांचे आहे. कै. विष्णुशास्त्री चिपळोणकरांनीं न्यूस्कूल काढण्याचें ठरविलें तेव्हां मशारनिल्हे नामजोशी यांस आपले मदतीस घेतलें. नामजोशी हे अवघे म्याट्रिक झालेले होते. तथापि इंग्रजी व मराठी भाषा चांगली वाचीत व लिहीत; वक्तृत्वाचें आंगही चांगलें होतें. धाडस, कल्पना निर्भय, प्रसंगीं "आपडीं थपडी" करण्यास मागें न घेणारे, लॅार्डरेसारख्या गव्हरनरास बगलेंत मारून आपलें काम करून घेणारे, सुक्तासुक्ताची परवा न करतां कामाशीं गांठ घाळणारे; नामजोशासारखे अद्याप कोणी आढळले नाहींत. इतकें असतांहि नामजोशास आपला म्हणण्यास पुण्यांत लोकमान्याखेरीज दुसरा कोणी तयार नव्हता. याचें कारण सामाजिक वर्तणुकींतील त्यांचा पंगूपणा होय. लोकमान्यांचें लक्ष्य राष्ट्रहिताकडें असे. राष्ट्रहिताचें कामीं जो त्यांस मदत करितो त्यांचा सखा बनण्यास नड नसे. कै. नामजोशांची लोकमान्यास अहर्निशी मदत असल्यामुळें ते त्यांच्या इतर दुर्गुणांकडे दुर्लक्ष्य करीत. इतकेंच नाहीं तर इंडस्ट्रियल कान्फरन्ससारखीं जोखमेचीं दगदगीचीं आणि खर्चाचीं कामें लोकमान्यानीं नामजोशावर पूर्णपणें सोपविलीं व त्यांनीं त्यांची

चीज करून दाखविलें. तरी नामजोशांच्या संगतींत टिळक गुंतल्यामुळें त्यांचें वजन हलकें झालें असें म्हणणारे बरेच प्रतिष्ठित त्यावेळीं होतें इतकेंच नाहीं तर नामजोशांची संगत टिळकांनीं सोडावी म्हणून कित्येकांनीं प्रयत्नही केला होता. त्यास सर्व गुणांनीं पूर्ण असा कोणीं नाहीं. लोकांच्या दृष्टीनें नामजोशी कसेही असले तरी राष्ट्रीय कामांत त्यांचा उपयोग लब्धप्रतिष्ठितापेक्षां पुष्कळ अधिक होतो, म्हणून त्यास दूर करणें अथवा त्याचा अव्हेर करणें कदापि घडावयाचें नाहीं असें चोख उत्तर देऊन परत लावलें आहे. नामजोशांचा व लोकमान्यांचा हा आपलेपणा नामजोशांच्या हयाती-पुरताच नव्हता वर त्यांचे पश्चात् त्यांचे कुटुंब पोषणांतही आपलेपणा लोकमान्यानीं दाखविला आहे. हा अद्‌भुत गुण किती ठिकाणीं सांपडेल ?

पूर्वीपासूनच डाचत असलेली स्वदेशीची लाट वंगभंगामुळें पुण्यांत ज्यास्त जोरांत आली व ती लोकमान्यांनीं आणिली. त्यावेळीं पण्यांत विलायती मालाचा होमहवनादि प्रकार होऊन त्यांत अनेक विद्यार्थ्यांच्या परदेशी टोप्यांच्या आहुती दिल्या गेल्या. या प्रकाराचें अध्वर्युत्व एका चांगल्या जाडया व व नामांकित विद्वानाकडे होतें. पण योगायोग असा कांहीं चमत्कारिक घडून आला कीं, याच विद्वानांच्या घरच्या मामद्यास विलायती साखरेशिवाय पवित्रता आली नाहीं ! पुणें तें पुणें, तेथें नुसतें हूं झालें कीं, त्याचा नगारा सर्व महाराष्ट्रभर दणदणावयाचा ! त्यांत असलें एकादें खाजें सांपडल्यावर मग काय विचारता ! त्याची भंबेरी उडण्यास उशीर तो किती ? भोजन प्रसंगांत उडालेली चळवळ पुरती पानसुपारी झाली नाहीं तोंच उलटसुलट समाजांत पसरली. तोंडाचे पट्टे तर सारखे चालले होतेच, पण कित्येक लेखकांनीं आपल्या लेखण्या पाजळल्या ! कवींनीं आपलें कवित्व गाजविलें ? मेळेवाल्यांनीं आपल्या तालसुरांत टिपऱ्यांची जोड देऊन रस्तोरस्तीं या अध्यर्यूची विडंबना चालविली. तरी लोकमान्यानीं तिकडें लक्ष्य दिलें नाहीं ! लोकांच्या या कृतीचा लोकमान्य पुरस्कारही करीत नाहींत व प्रतिकारही करीत नाहींत, हें पाहून लोक ज्यास्तच चवताळलें आणि त्यांनीं इंद्राय तक्षकाय स्वाहाप्रमाणें लोकमान्याकडे मोर्चा फिरविला ! व त्यांच्या वाडयांतील गणपतीसमोर ते तेथें बसलें असतां त्यांच्यावर हल्ला करण्यास सुरुवात केली. हा हल्ला लोकमान्यांनीं शांतपणानें अंगावर घेऊन यांतील प्रमुख वीरास इतर मेळेवाल्यापेक्षां अधिक बक्षीस दिलें ! लोकमान्यांच्या या कृतीमुळेंच बहुतेक वीर सर्द झालें. तेव्हां लोकमान्य म्हणाले:–

"तुमच्या अंगीं आतां संचरलेली वीरश्री पाहून समाधान वाटलें. हीच तुमची वीरश्री परवशतेच्या नादीं न लागतां स्वतंत्र धंद्यांत आणि राष्ट्रकार्यांत गुंतून राहील तर देशाचे कल्याणास फार काळ लागणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. परंतु तुमच्या

या वीरश्रींत शोध आणि सारासारविचार यांचा पुष्कळच अभाव असल्यामुळें हिला दुबळेपणा आलेला आहें. हें आपण लक्षांत घेतल्याचें दिसत नाहीं. ज्या आपल्यांतील थोरांतील थोर पुढाऱ्यानें स्वदेशीचें निशाण खांद्यावर घेतलें व त्या निशाणाचें छायेंत आपल्या गंभीर वाणीनें सर्वांस ओढून घेतलें, तो कंजूषपणानें, हलगर्जीपणानें, अथवा जाणून सवरून आपले थोर अधिकारास कलंक लावून घेईल काय? या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर कोणी देईल असें मला वाटत नाहीं यदाकदाचित आपल्यांतील एकाद्या वीरानें होय. म्हटलें तर त्यास मी असें विचारीन कीं, जरी तुम्ही म्हणतां हें खरें असलें तरी एका गोष्टींकरतां तुम्ही आपलेपणाचें थोर निशाण शत्रूंच्या गोटांत फेंकून देण्यास तयार व्हाल काय? या प्रश्नाचें योग्य उत्तर आपापसांत ठरवून उद्यां दोन प्रहरीं मला कळवा." अशा अशयाचें भाषणांत आपलेपणावर यांनीं किती जोर दिला आहे, हें सहज लक्षांत येईल.

ताई महाराज प्रकरण हें होय. या प्रकरणासंबंधानें वाचकांस तपसीलवार सांगण्याचें कारण नाहीं. कोणत्या जड वेळेवर हें प्रकरण उपस्थित झालें देव जाणें! या प्रकरणानें आपल्याबरोबर लोकमान्यांच्या आयुष्याचाही शेवट लावला असेंच म्हटलें पाहिजे. मी वरील गोष्टींच्या प्रारंभीं "**आपलेपणा**" म्हणून जो मथळा घातला आहे त्याची कसोटी या प्रकरणांत आहे व ती लावून पहाणाऱ्यांत हीही एक असल्यामुळें तेवढाच भाग येथें सांगतो.

ताई महाराज्यांच्या दत्तकप्रकरणांचा पहिला अंक संपला, आणि दुसऱ्यास प्रारंभ व्हावयाचा आहे असें ठरलें. त्याचीं ह्यांडविलें बाहेर पडलीं. त्यांत प्रवेशवार जीं पात्रें दिलीं होतीं, त्यावरून ताईमहाराजासारख्या अप्रबुद्ध तरुणीस स्वार्थी मंडळींनीं घेरलें असून त्या घेरणाऱ्यांत सामान्य गृहस्थ नसून दिसण्यांत संभावित, इंग्रजी भाषा-ज्ञानांत प्रविण, इत्यादि प्रकारचीं वर्णनें देण्यापेक्षां त्यावेळच्या सेशन जज्ज साहेबांनीं दिलेल्या वर्णनापैकीं मासला म्हणून एक उदाहरण खालीं देतों.

"One of the prosecution witnesses is an Honorary Magistrate in Poona City, and yet I cannot be convinced that he has spoken the truth."

यावरून किती योग्यतेच्या गृहस्थांनीं ताई महाराजास बगलेंत मारून लोकमान्यांच्या गळ्यास तात लावण्याचें काम पत्करलें होतें, हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. आज अमके गृहस्थ ताईमहाराजास घेऊन मे. ॲस्टन साहेबांच्या बंगल्यावर गेले, आतां फलाण्या गृहस्थांनीं हिऱ्याचें कांकण खिशांत घालून तमक्या दिशेस तांगा

हाकला इत्यादि प्रकारच्या अनेक बातम्या त्रिकाल येत असत. अशा बातम्यांचा सुकाळ जों जों वाढत जाई तों तों घरांतील मंडळीचें धाबें दणाणें व लोकमान्यांनीं आपलें काम सोडून देऊन हें भावी संकट टाळावें हें बरें असें सर्वांस वाटे. पण आपले हे विचार लोकमान्यांचे कानावर घालून त्यांस परावृत्त करण्याचें धैर्य कोणास होत नसे. यामुळें आमचे विचार जागचे जागीं जिरत.

कै० आगरकरांचा व माझा परिचय ते कालेजमध्यें असल्या वेळेपासून त्यांच्या मामामुळें झाला होता. लोकमान्याबरोबर भाषण करण्यास जितकें मन संकोचित होत असेंतितकें आगरकराबरोबर गप्पागोष्टी करतांना होत नसे. एकदां आपण उभयतांचीं विद्वत्ता सारखी असतां वृत्तींत बदल कां दिसतो म्हणून आगरकरास प्रश्न केला असतां ते म्हणाले,–'त्यांच्या खासगी वर्तनाकडे लक्ष पुरवा म्हणज आम्हां उभयतांच्या वृत्ती-तील फरक आपणांस कळोन येईल.' आगरकरांचे या ह्मणण्याचा अनुभव घेण्याकरितां लोकमान्यांचा प्रत्येक क्षण वाया न जाऊं देण्यांत मी दक्ष असे.यामुळें घरच्या मंडळी-पेक्षां माझी लगट अधिक असोन वडीलकीचा मान मला मिळतो व भिडस्तपणाचा गूण लोकमान्यांत आहे त्याचा उपयोग माझेमार्फत करून घेतल्यास हें संकट टळेल असें वाटून घर मंडळीनीं या प्रकरणांत मला मध्यस्थ बनविलें. मला तरी यांच्या प्रकृ-तीचा आसरा कुठें आला होता. तरी घरमंडळीप्रमाणेंच माझें अंतःकरण कळकळत होतेंच. म्हणून मी या प्रकरणांतील मध्यस्ती पत्करली आणि वेळ साधून " प्रस्तुतच्या आगींत उडी न घालण्याची देणगी आम्हांस द्या " अशी करुणा भाकली ! यावर थोडा वेळ दम धरून व थोडी सुपारी तोंडांत टाकून लोकमान्य मला म्हणाले:–"मला आपला, विश्वासाचा, समजून ज्या बाबा महाराजानें आपलें सर्वस्व माझे स्वाधीन करून देह ठेवला त्या आपलेपणाचा आणि विश्वासाचा घात करावयास तुम्ही सांगतां काय ? विश्वास घातकी म्हणून जनांत वावरल्यापेक्षां मृत्यू काय वाईट ? या खटल्यांत मृत्यू आल्यास तो आनंदानें पत्करीन, पण विश्वासघातकी म्हणवून घेऊन जगांत रहाणें कालत्रयींही पत्करणार नाहीं." या उत्तरानें मी तर सर्द झालोंच ! पण तेथें कागद-पत्रांची व्यवस्था लावणारीं कारकून मंडळीही आश्चर्यचकित होऊन एकमेकांच्या तोंडाकडे पहात राहिली ! या आपलेपणाला काय नांव द्यावें हें ठरविण्याचें काम वाचकांवरच सोपवितो.

लोकोपयोग.

लोकमान्याच्या आजपर्यंतच्या कृतीकडे लक्ष्य दिल्यास हें सदरच अयोग्य आहे असें वाटेल. कारण आर्य माता आणि आर्यपुत्र हेंच ज्यांचें ब्रीद व यांच्या उद्धारार्थ

ज्यांनीं लोखंडाचे चणें खाल्ले त्यास आपपर भाव असणेंच शक्य नाहीं. जेथें या भावाचा अभाव तेथें लोकोपयोग या शब्दाचा उपयोग करावयाचा झाल्यास तो परराष्ट्रवाचकच झाला पाहिजे. इतके लांब जाण्याचें मला कारण नाहीं आपल्या रुढींत लोकोपयोग या शब्दाचा जो अर्थ मानला जातो व लोकमान्यांच्या चरित्रकारांनीं ज्या अर्थानें यांच्या कृतीकडे लक्ष दिलें आहे त्याच दृष्टीचीं पण निराळ्या स्वरूपाचीं कांहीं उदाहरणें सांगण्याची खटपट मी करीत आहें. दुष्काळ, प्लेग, तापाची सांथ, दारुबाजी वगैरे संबंधानें यांनीं जो लोकोपयोग केला तो सामाजिक नजरेचा असून पतकरलेल्या पेशास अनुसरून असाच होता. पण ज्या व्यक्तीचा व आपला कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं, ज्या व्यक्तीचीं मूर्ती काळी कीं गोरी माहित नाहीं, व मूर्ती प्रत्यक्ष हजर नाहीं अशा व्यक्तीकरितां एक मंजसारखा अगदीं सामान्य मनुष्य येतो तो त्याची हकीकत सांगतो आणि त्याकरतां लोकमान्य पदरचे पैसे खर्चून दोन दिवस मोडून त्याचें जन्माचें कार्य करून देतात ! हें कृत्य काय दर्शवितें ? अर्थातच लोकोपयोग करण्याची लालसा याचें स्पष्ट खुलाशाकरतां एका हयात गृहस्थाचें उदाहरण सांगतों.

धारवाडांत रामराव नारायण वल्लारी नांवाचे वकील आहेत. यांना कालेजचा संस्कार नव्हता तरी इंग्रजी बरें येत असे. हे पोलीसखात्यांत सु. साहेबांचे शिरस्तेदार होते. त्यावेळचे पोलीस सु. साहेबांची स्पेलें नीट नेटकीं करून त्यांचे रिपोर्टीस वाळसें आणण्याचें काम शिरस्तेदाराकडे असे. रामराव तें काम करीत व वरिष्ठांचे तेही श्रम वाचविण्याचें कसब यांना चांगलें साधलें असल्यामुळें थोड्याच काळांत यांच्या ओंजळीनें साहेबांची तहान भागत असे. यामुळें यांचा वचक सर्व पोलीसास असे. एक साहेब गेले दुसरे आले, दुसरे गेले तिसरे आले तरी हे आपले शिरस्तेदारी कसबानें त्यांस आपलेसें करित. दुसरें, हे विलासवृत्तीचे असल्यामुळें छान छुकीनें वागत असत. हें परोत्कर्षासहिष्णु लोकांस पसंत न पडणें यथार्थच आहे. अर्थातच पोलीसास इतर खासगी, व पांढरपेशा लोकांनीं साह्य करून यांच्या हातांत टिनपॉट देण्याची तजवीज केली व तींत त्यांना यशही आलें.

ही शिरस्तेदारी संपल्यानंतर यांनीं इंग्रजी व कानडी भाषेंत राजहंस नांवाचें वर्तमान पत्र काढलें. वर्तमान पत्र चालविण्यास कायद्याचें ज्ञान लागतें हें या वेळ-ऐकून ठाऊक होतें, तें यांनीं संपादन केलें आणि वकीलीची परिक्षा देण्याबद्दल परवानगी मागीतली. यांना परवानगी मिळाल्यास हे खात्रीनें पास होणार आणि हे सव्यसाची बनल्यास आपल्या कृतीचीं पाळें मुळें खणून उन्हांत वाळवणार अशी बरक्या दर्जाचे पोलीसांची खात्री असल्यामुळें रामरावजीस परवानगी मिळूं नये, अशी

लो० टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर. सन १९१४.

लो० टिळक व त्यांचे कुटुंबांतील मंडळी. सन १९०२.

खटपट पोलीसांनीं केली पण त्या खटपटीस यश आलें नाही. परवानगी मिळाली! आणि लोकांच्या खात्रीप्रमाणें ते पासही झाले तरी मंडळीना आशेनें सोडलें नाहीं याना सनद देतांना धारवाडखेरीज करून सनद द्यावी अशा उद्योगास मंडळी लागली व त्यांतील कांहीं मंडळी जड धेंडासह जड खिशानें मुंबईस रवाना झाली. हे समजतांच मात्र रामरावजीस निराशेनें घेरलें, तथापि उद्योगाची सीमा संपेपर्यंत दैवाकडे वळावयाचें नाहीं अशा विचारांत ते होते.

यावेळीं हायकोर्टाचे जज्जांत कैं. महादेव गोविंद रानडे हे एक जज्ज होते. यांच्या कानावर सर्व कच्ची हकीकत गेल्यास अन्याय होणार नाहीं अशी लोकांची खात्री होती. ती खरी होती पण हें काम तशाच मोठ्या गृहस्थाखेरीज व्हावयाचें नाहीं असा मोठा व परोपकारी गृहस्थ मुंबईइलाख्यांत टिळकाखेरीज दुसरा नाहीं असा लोकांचा समज होता. पण बाब लहान, व्यक्ति एक आणि कार्यकर्ते व करिवते यांचें सामाजिक व सार्वजनिकसभेच्या कामांत विळ्या भोपळ्या इतकें सख्य! तेव्हां हें काम यांस सांगणेंच प्रशस्त नाहीं असें वाटलें. तथापि खडा टाकून पहावें लागल्यास लागला असें वाटून रामरावजीचे एक स्नेही धारवाडाहून निघोन पुण्यास आले. लोकमान्यास भेटले व संक्षेपतः हकीकत सांगीतली. लोकमान्यांनों कांहीं जरूरीचें काम आहे कीं काय याची चौकशी करून ते धारवाडाहून आलेल्या स्नेह्यासह रात्रीच्या गाडीनें मुंबईस आले, महादेवरावजींस भेटले, व येण्याचें कारण सांगितलें. तेव्हां माधवरावजी म्हणाले जें काम चिठ्ठीनें व्हावयाचें त्याकरतां इतकें श्रम कशाला घेतलेत? लोकमान्य म्हणाले आपणा उभयतांच्या संबंधानें समाजांत ज्या चुकीच्या समजुती पसरल्या आहेत त्यांचा निरास करण्याकरतां समक्ष येणें बरें वाटलें, महादेवरावजी हांसले. अशा हजारों समजुती चुकीच्या आहेत. त्या वकीलीधंद्यानेंच निघतील तेव्हां निघतील. असें भाषण चालू आहे तों चहा आला व सह्याचे कागद घेऊन शिपाईही आला. चहा घेतां घेतां कागद चाळीत होते तों त्यांत सनदाही होत्या. त्यांतील रामरावांची सनद काढून त्या सनदेंत धारवाड डिस्ट्रिक्ट होते त्याचेंच मागें "धारवाड आणि" या अक्षरांचा शोध घालून–झालें आपलें काम असें लोकमान्याबरोबर आलेल्या गृहस्थास सांगितलें. तो गृहस्थ उठून बाहेर गेला. लोकमान्य सुमारें पंधरा मिनीटें बोलत बसून निघाले. बरोबर आलेला गृहस्थ चौचाकी तयार ठेवून बाद पहातच होता. उभयतां गाडींत बसून स्टेशनवर येऊन तेथून पुण्यास आले. त्यांच्या गाडीभाडयाचा वगैरे खर्च द्यावा, अशा इच्छेनें रामरावाचा मित्र आडवूं लागला. तें या चाणाक्ष पुरुषाचे लक्षांत तेव्हांच आलें आणि म्हणाले 'मीं का भाडोत्री तांगेवाला अथवा वकील आहे म्हणून तुम्ही संकोच वृत्तीनें उभे राहिला. तर खुळे कुठले, जा स्नान करा तुमचे स्नेह्यास तार करायाची असल्यास करा आणि रात्रीचे गाडीनें जा.'

असो, लोकमान्याची शिकवणूक, लोकमान्याच्या साधेपणाचे दाखले कपाळावरील गंध, टिळकनाथाची उत्पत्ति म्हणजे लोकमान्यांचे नवसाला पावणें कुळकर्णी व बाबा, कारकून व बाबा, विष्णुपंत छत्रे व त्यांचा स्नेही साहेब, काशीनाथपंत छत्रे व जपानी नोकर, पंढरीच्या वारकऱ्याचें दर्शन, वक्तृत्व संपादन कां करित नाहीं ? इत्यादि किती तरी गोष्टी आज मजसमोर उभ्या आहेत. या गोष्टी जशा उभ्या आहेत तसेंच आपले वेळेच्या धाकाचें चित्र माझ्या अशक्त प्रकृतीस मानवत नसल्यामुळें वाचकांस तूर्त येथेंच विश्रांती घ्या म्हणून विनवितों.

महाराष्ट्रदेवीचें पिंपळपान.

कविः—रा. रा. **श्रीनिवास रामचंद्र बोवडे** बी. ए. नागपूर.

हरवलेलें पिंपळपान कुठें सांपडत का असतें ? सांडलें सरदारगृहांत; पण सरदारगृहाच्या मालकांनां कांहीं तें सांपडलें नाहीं. पिंपळपान होतें हें सर्वांनीं पाहिलें; सांडतांनांही पुष्कळांना दिसलें. पण काय ? आतां कुठें आहे हें कोणालाच सांगतां येत नाहीं. हाय ! हाय ! !

हरवलें माझें पिंपळपान । कुठें सांडलें कोणीं नेलें
माझें पिंपळपान ॥

एकच होतें मजजवळीं तें । केवळ माझा प्राण ॥
ठेंवित होतें अपुल्या हातें । कसें विसरलें भान ॥
आनंदाचें मत्प्रेमाचें । होतें एकच स्थान ॥
केल्या बहुपरि आशा ज्यावरि । धरिला बहु अभिमान
राजस माझें लेंणें साजें । जया नसे उपमान ॥
कुणास दिसलें कुणा गवसलें । माझें हर्षनिधान ॥
देरे सागरा देरे अंबरा । माझे पंचप्राण ॥
तरुलतिकानों ! गिरि कुहरानों ! । द्या मज माझें दान ॥
नलग माणिक नलगे मोती । नको हिऱ्यांची खाण ॥
बंधुभगिनिनों वनदेवीनों । द्या मज माझें वाण ॥
का येईना कुणास करुणा । मजसि न उरले त्राण ॥
हें जन्माचें वेड जिवीचें । माझें पिंपळपान ॥

लोकमान्य !

लेखक:—रा. रा. वि. स. वाकसकर.

मरावें परी कीर्तिरूपें उरावें.

रामदास.

लोकमान्यांच्या गुणवर्णनपर इतकें वाङ्मय सध्यां प्रसिद्ध झालें आहे व होतही आहे कीं, कोणाही नूतन लेखकास आतां नवीन मुद्दा पुढें आणणेंच शक्य नाहीं. म्हणून त्यांचा जन्म, त्यांची विद्या, त्यांचा उद्योग, त्यांचें कर्तृत्व, त्यांची मूर्ति, त्यांची चिकाटी, त्यांचें धैर्य, त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचा साधेपणा इत्याद्यनेक गुणसन्निपातांचा राष्ट्राला काय उपयोग झाला आहे याचें विवेचन करण्याचें जबाबदारीचें काम भावी इतिहासकारावर सोंपवून त्यांच्या मृत्यूनंतर घडून आलेल्या एकदोन महत्त्वाच्या मुद्यांचा विचार करण्याचें आज लहानशा लेखांत ठरविलें आहे.

लोकमान्यांच्या मृत्यूनंतर '**हिंदुस्थानाच्या काळा**मध्यें' (Times of India) त्यांच्या मृत्यूच्या योगानें प्राप्त झालेल्या मनःस्थितीचा द्योतक असा एक अग्र लेख आलेला आहे. हा मृत्यूलेख पुष्कळांस आवडला नाहीं. परंतु, हा मृत्युलेख पाहून जो एक प्रश्न प्रस्तुत लेखकास आजपर्यंत सुटत नव्हता तो सहज सुटला. रावणवधानंतर त्याचें उत्तर कार्य आपण करावें कीं, न करावें असा रावणाचा भाऊ जो बिभीषण याला शंका उपस्थित झाली. कारण रावण जीवंत असतांना त्यानें रावणाच्या पक्षाचा त्याग करून रावणाचा शत्रु जो राम त्याचा आश्रय केला होता. अर्थात् बिभीषणास रावणाबद्दल मुळींच प्रेम राहिलें नव्हतें. त्याच्या मनांत रावणाबद्दल तीव्र द्वेष उत्पन्न झालेला होता. आणि म्हणूनच रावणाच्या मृत्युनंतर त्याच्या उत्तरकार्यासंबधीं बिभीषणाच्या मनांत उपर्युक्त शंका उत्पन्न झाली व ती त्यानें रामास सांगितली. बिभीषणाची ही शंका ऐकतांच भगवान् रामचंद्र म्हणाले, बाबारे ! **मरणान्तानि वैराणि** ।

हें आर्यतत्त्व तूं विसरूं नकोस. रावण मेला आहे. आतां त्याच्या वैराचें प्रयोजन काय आहे. सर्व वैर विसरून त्याचा अंत्यविधि तूं यथासर्ग

केलाच्च पाहिजेस.—नव्हे तो करणें हा तुझा धर्म आहे असेंच आर्यधर्माचें बीज आहे. रामचंद्राच्या उपदेशानुसार पुढें बिभीषणानें तो विधि केला. आतां प्रश्न असा उत्पन्न झाला होता कीं, रामरावणाच्या युद्धामध्यें जर कर्मधर्मसंयोगानें रामाचा वध रावणाचे हातून झाला असता तर रामाच्या प्रेताशीं रावण कसा वागला असता ? रावणाच्या प्रेताशीं रामचंद्र ज्याप्रमाणें आर्याच्या उदात्ततेनें वागले त्याच उदात्ततेनें रावण रामाच्या प्रेताशीं वागला असता काय ? असा प्रश्न आज पुष्कळ दिवस प्रस्तुत लेखकाच्या मनांत घोळत होता. नामदार गोखले, फिरोजशहा, रानडे आगरकर इत्यादि व्यक्तीशीं लोकमान्यांचा फारच मोठा विरोध होता. परंतु या प्रत्येकाच्या निधनानंतर त्यांचेबद्दल केसरींतील मृत्युलेख अंतः करणाच्या कळवळ्यानें व आंतड्याच्या पिळवटयानें ओतप्रोत भरलेले आढळले. मतांचा विरोध, स्वभावाचा उद्दामपणा, कार्याविषयीं तुच्छता व वर्तनाचा कुटिलपणा यांपैकीं एकाचाही गंधसुद्धां यांच्या मृत्युलेखांत केसरी मध्यें दिसला नाहीं. भगवान् रामचंद्राप्रमाणेंच लोकमान्यांनीं खऱ्या आर्य रक्तास साजेल असलेच मृत्युलेख केसरींत प्रसिद्ध केले. अर्थात् रामाच्या निधनानंतर रावण कसा वागला असता हें कोडें तेव्हांही तसेंच राहिलें. पण लोकमान्यांच्या निधनानंतर टाइम्समध्यें त्यांच्याबद्दल आलेल्या मृत्युलेखानें ह्या कोड्याचा तेव्हांच उलगडा केला.तो उलगडा असा कीं, लोकमान्यांच्या मृत्यूनंतर ज्या प्रमाणें "**हिंदुस्थानचा काळ**" Times of India लोकमान्यांशीं वागला त्याचप्रमाणें रावणही रामाच्या मृत्यूनंतर त्याच्याशीं वागला असता. ! ! !

लोकमान्यांच्या निधानानंतर राष्ट्रीय पक्ष अगदीं निर्बळ झाला आहे, त्याला कोणींच त्राता उरला नाहीं, त्याला कोणीही पुढारी राहिला नाहीं असले प्रलाप प्रतिपक्षांतून स्पष्ट व अस्पष्टपणें उमटूं लागले आहेत. या सर्वांना काय उत्तर असावें याचा विचार करीत असतां मला एका ऐतिहासिक प्रसंगाची आठवण झाली. तोच प्रसंग संक्षेपतः देतों, म्हणजे त्यांतच वरील प्रलापांना उत्कृष्ट उत्तर आहे असें वाचकांस आढळून येईल.

पेशवाईमध्यें पटवर्धनाचें घराणें पराक्रमी या नात्यानें प्रसिद्धीस आलें. त्यांत गोपाळराव हाही एवढा पराक्रमी पुरुष निवर्तल्यावर थोडकेच दिवसांनीं पटवर्धनांचें पथक त्र्यंबकराव मामा पेठ्यांच्या सेनापतित्वाखालीं कर्नाटकच्या स्वारीस निघालें. तेव्हां मामांनीं पटवर्धन मंडळीस भालदा राहात्मीं सांगून पाठविलें कीं, तुमचे " ..... मान पान गोपाळराव दादा यांजबरोबर गेले, आतां जी चाकरी सांगूं ती करून राहावें." या निरोपास पुरुषोत्तमराव दाजी यांनीं उत्तर पाठविलें,

* " अरे, गोपाळराव मात्र गेले, परंतु ज्यांनीं गोपाळराव केले ते जिवंत आहेत ! " हें उत्तर फार मार्मिक आहे. राष्ट्रीय पक्षाच्या प्रतिपक्षास वरील उत्तरांत थोडासा शब्दफेर करून असें निक्षुन सांगता येईल कीं, " अहो, लोकमान्य मात्र गेले, परंतु ज्यांनीं लोकमान्य केले ते जिवंत आहेत" !!! कळावें.

* हरिवंशाची बखर.

श्री.

नागपूर
ता. २७. ८. २०

रा. रा. संपादक ' उषःकाल माला ' यांस

कृ. सा. न. वि. वि.

आपलें ' टिळक-अंका'साठीं कविता पाठविण्यासंबंधीचें पत्र पावलें आभारी आहें. परन्तु --

रामापरी वदति रामच एक जैसा
बालापरी तिलक-बालहि एक तैसा
त्याचे यशोगुण गणा, चरितास गाया
वाल्मीकि एक, न समर्थ दुजा जगीं या

कळावें, लो. अ. ही विनंती.

आपला,
आनंदराव कृष्णाजी टेकाड

लो. टिळकांचें राष्ट्रकार्य.

लेखक—रा. रा. महादेव रा. बोडस, एम्. ए., एल्एल्. बी.

" In all epoch's of the world's history, we shall find the Great Man to have been the indispensable saviour of his epoch;—the lightning, without which the fuel never would have burnt. The history of the World, I said already, was the Biography of Great Man."

—CARLYLE:—*Heroes & Hero-Worshp.*



सर्व राष्ट्राचा आत्मा तो माहात्मा, व माहात्म्याचें चरित्र तेंच राष्ट्राचें चरित्र, हा कार्लाइलचा वरील सिद्धांत ज्यांस लाविता येईल अशा थोड्या राष्ट्रीय पुरुषांत लो० टिळकांची गणना केली पाहिजे. टिळकांचे गेल्या चाळीस वर्षांचें चरित्र हिंदुस्थानदेशाच्या प्रगतीशीं इतकें संलग्न झालें आहे कीं एक दुसऱ्याचें प्रतिबिंब होतें म्हटलें तरी शोभण्यासारखें आहे. देशांतील महात्मे आपल्या समकालीन राष्ट्रीय प्रवृत्ति एकत्र संकलित करतात व त्यांस योग्य वळणही देतात. गिरिकंदरांत पसरलेलें जल जसें गंगेच्या नियमित प्रवाहांत वाहूं लागलें म्हणजे शक्तिमान् आणि कार्यकारी होतें तसेंच उद्बद्ध राष्ट्राच्या सर्व शक्ति एकाद्या थोर विभूतीच्या चरित्रांत एकवटून जगाचे इतिहासांत महत्काय करितात, हा कार्लाइलचा भावार्थ आहे; आणि त्याचें टिळकांच्या चरित्राइतकें उत्तम उदाहरण दुसरें क्वचित्च सांपडेल.

सन १८८० पासून १९२० पर्यंतचा चाळीस वर्षाचा काळ हिंदुस्थान देशाचे इतिहासांत अत्यंत महत्वाचा मानण्यांत येईल. या काळांत एवढी मोठी राजकीय व सामाजिक क्रांति झाली आहे कीं जरी निकट सांनिध्यामुळें आपणांस ती सध्यां चांगलीशी दिसत नाहीं तरी भावी इतिहासकार या कालाला हिंदुस्थानचें मध्ययुग आणि नवीनयुग यांचा संधिकाल असें नांव देतील. इंग्रजी विद्येंचें बीजारोपण जरी ७० वर्षपूर्वीपासून होऊं लागलें तरी त्याचे खरे अंकूर १८८० सालानंतरच दिसूं लागले. इंग्रजी विद्येच्या पहिल्या अमदानींतील मंडळी बहुधा परानुकरणप्रिय होती. पाश्चात्य ज्ञान चांगलें पचनीं पडून स्वतंत्रविचारांचा उदय १८७७ सालच्या **केसर-इ-हिंद** च्या जाहीरनाम्यानंतर दिसूं लागला. त्या जाहीरनाम्यानें सर्व हिंदुस्थान देश एक आहे ही भावना उत्पन्न झाली, व अर्वाचीन **हिंदी राष्ट्र** जन्मास आलें. पूर्वी हिंदुस्थानांतील

निरनिराळे प्रांत वेगळ वाटत असत, ते आतां एकछत्री व एकसूत्री इंग्रजी अंमलान घट्ट बांधले गेले. आपल्या राष्ट्राचा अभ्युदय परकी राज्यकर्त्यांच्या स्वाधीन न ठेवतां आपलेच हातांत घेतला पाहिजे ही इच्छा बळावत चालली; व तिचा परिणाम पुढें १८८५ सालीं राष्ट्रीयसभेच्या स्थापनेंत झाला. राष्ट्राचा अभ्युदय पुनरुज्जीवनानें होणार आहे ही कल्पना महाराष्ट्रांत कै. विष्णुशास्त्र्यांनीं उत्पन्न केली, व टिळक आगरकर प्रभृति त्यांच्या सहकारी मित्रानीं नवी इंग्रजी शाळा आणि नवी इंग्रजी मराठी वर्तमानपत्रें चालवून यांच्या साहाय्यानें तिची जोपासना केली. लो. टिळकांचें चरित्र म्हणजे या पुनरुज्जीवनकल्पनेची वाढ होय. लोक-मान्य टिळकांनीं कोणतें राष्ट्रकार्य केलें असा प्रश्न केल्यास आणि त्याला एकाच शब्दानें उत्तर द्यावयाचें झाल्यास, त्यानीं हिंदी राष्ट्राचें पुनरुज्जीवन केलें असें म्हणतां येईल. बंगल्यांतील राममोहन राय, केशव चंद्रसेन प्रभृतीच्या धर्मसुधारणा किंवा उत्तर हिंदु-स्थनांतील दयानंदजीचा आर्यसमाज हे केवळ एकदेशी प्रयत्न होते. राष्ट्राच्या सार्वत्रिक पुनरुज्जीवनाचा अंकुर प्रथम महाराष्ट्रांत उगवला, व त्याची जोपासना चाळीस वर्षें लो. टिळकानीं केली. टिळकानीं इतर लोकनायकाप्रमाणें सभा स्थापल्या, शाळा काढल्या, इमारती बांधल्या व वर्तमानपत्रें चालविलीं; सभांतून भाषणें केलीं; सरकाराकडे अर्ज पाठविले; डेप्युटेशनें नेलीं; व प्रसंगीं सरकारचे रोषास पात्र होऊन प्रायश्चित्तही भोगलें. पण हें कांहीं त्यांचें मुख्य कार्य नव्हे, दुसऱ्या पुढाऱ्यांनीं असलीं कामें त्यांच्याहीपेक्षां जास्त प्रमाणानें केलीं आहेत. तरी त्यांच्या पेक्षां टिळकांची योग्यता अधीक मान-ण्यांत येते यांतील बीज निराळें आहे. टिळकाचें खरें संघटनात्मक कार्य म्हटलें म्हणजे हिंदी राष्ट्राचा अभ्युदय पुनरुज्जीवनानेंच होणार या महासिद्धांताची स्थापना होय.

टिळकांची बुद्धि विध्वंसक होती असला पोरकट आक्षेप घेणारांनां त्यांच्या चरित्राचें स्वारस्य मुळींच कळलें नाहीं असें म्हटलें पाहिजे. थोडयाबहुत नाशाखेरीज पुनरुत्पत्ति होत नाहीं हा गोष्ट सर्वांचे अनुभवाची आहे. जमीन नांगरल्या खेरीज पेरणी करतां येत नाहीं, झाड कापल्याखेरीज कलम लागत नाहीं आणि नाळ कापल्याखेरीज बालक सुटें होत नाहीं, हा सार्वत्रिक अनुभव आहे. परमेश्वरानें प्रत्येक अवतारांत कोणाचा तरी संहार करूनच पुनः धर्मसंस्थापना केली आहे. त्याप्रमाणेंच प्रत्येक महात्म्याला नवीन संघटना करण्याचें अगोदर जुन्या सांचलेल्या केरकचऱ्याचा थोडा फार नाश करावाच लागतो. परंतु महात्म्यांची खरी योग्यता त्यांच्या मुख्य ध्येयावरून ठरवावयाची असते. टिळकांचें ऐहिक चरित्र आतां समाप्त झाल्यामुळें त्यांच्या स्वीकृत कार्याचें विहंगम दृष्टीनें परीक्षण करण्याची वेळ आली आहे. त्यानीं आरंभि-लेले अनेक उद्योग कांहीं पुरे झाले, कांहीं अपुरे राहिले व कांहीं दुसरे लोक पुर करतील. तसेंच त्यांची प्रत्यक्ष मूर्ति गेली तरी त्यांनीं उत्पन्न केलेली चेतनाशक्ति

कांहीं कांळपर्यंत तरी इतरांकडून राष्ट्रकार्य करवील आणि त्यांनीं प्रदीप्त केलेल्या भावना तरुण पिढीला पुढील मार्गदर्शक होतील. तथापि हें सर्व कार्य चांगल्या रीतीनें पार पडण्याला टिळकांच्या सार्वत चरित्राचें पर्यालोचन झालें पाहिजे. मनुष्याचे हयातींत त्याची किंमत त्याचे आंगच गुणावगुणावरून होत असते; परंतु त्याचे पश्चात् त्याची योग्यता त्याचे राष्ट्रीय कामगिरीवरूनच ठरविली पाहिजे. या दृष्टीनें पाहिलें असतां लोकमान्यांचा दर्जा हिंदुस्थानाचे इतिहासांत फ रच उच्च दर्जाचा लागल यांत शंका नाहीं. श्रीशिवाजी महाराजानीं मुसलमानी लाट मागें हटविण्याकरितां महाराष्ट्रांत क्षत्रिय जातीचें पुनरुज्जीवन केलें, तसें टिळकांनीं इंग्रजी अमलाचें व विद्येचें मोहजाल तोडून टाकण्याकरितां भारतीय आर्यसंस्कृतीला पुनः उद्दीप्त केलें. दुसऱ्याचे खांद्यावर बसून जसा कोणी उंच होत नाहीं, तसेंच उसन्या विद्येनें व सुधारणेनें कोणतेंही राष्ट्र उदयास येत नाहीं हा सिद्धांत गेल्या चाळीस वर्षांत लोकांचे मनांत पूर्णपणें बिंबला याचें मख्य श्रेय टिळकांस दिलें पाहिजे. हिंदी राष्ट्राला आपले पायावर उभे रहाण्यास शिकविलें हीच लोकमान्यांची राष्ट्रीय कामगिरी. त्यानीं घालून दिलेला कित्ता पुढें गिरविणें त्यांच्या शिष्यांचें काम आहे.

ज्या गुणामुळें टिळकांचे हातून एवढी क्रांति घडून आली त्या गुणांची थोडी बहुत मीमांसा करणें अप्रासंगिक होणार नाहीं. टिळकांची घडाडी, चिकाटी, करारीपणा, धैर्य बाणेदार स्वभाव वगैरे शब्द त्याच्या तरुण चहात्यांच्या लेखांतून लोकांनां परिचित झालेले आहेत, व त्यांत पुष्कळ सत्यांश आहे. तरुण माणसांच्या नजरेस हेच गुण विशेषेकरून येतात व त्यांचे रसभरित वर्णन वारंवार लोकापुढें मांडले गेल्यानें भावी तरुण पिढीला चांगलें वळण लागेल हा फायदाच आहे. पण हे नैतिक गुण टिळकांना लोकनायक करण्यास पुरेसे नाहींत. कमी दर्जाच्या माणसांतही ते आढळतात, व पुष्कळवेळां असल्या गुणांमुळें चांगल्याप्रमाणें वाईट कार्यंही होतात. टिळकांची बुद्धि, विद्वत्ता उद्यमशीलता आणि व्यासंग हेही उच्च प्रतीचे होते; पण असामान्य होते असें म्हणतां येणार नाहीं. रानडयांची बुद्धि, डा. भांडारकरांचा व्यासंग, गोखल्यांचे वक्तृत्व आणि केरूनानांचे गणितज्ञान टिळकांपेक्षां निःसंशय अधिक होतें, टिळकांचीं **ओरायन** आणि '**आर्टिकहोम**" हीं पुस्तकें त्यांच्या विद्वत्तेची व शोधक बुद्धीची चांगली साक्ष देतात; पण ती अलौकिक आहेत किंवा त्यांतील सिद्धांत अबाधित आहेत असें मुळींच नाहीं. त्यांचे **गीतारहस्यहो** सिद्धांतरूप नाहीं, वादविवादप्रचुर आहे. अगोदर अंतिम प्रमेय कर्मयोग निश्चित ठरवून नंतर त्याला साधक प्रमाणानीं भरलेला हा ग्रंथ उत्तम वकीली बाण्याचा झाला आहे. त्यानें कोणताही नवा सिद्धांत स्थापन केला नाहीं कुमारिल भट्टाच्या ग्रंथांप्रमाणें तो नास्तिकानां निरुत्तर करणारा आहे, पण शंकराचार्यांच्या ग्रंथाप्रमाणें सत्य सिद्धांताचें यथार्थ ज्ञान



दोन अलौकिक मित्र !

नामदार खापर्डे व लोकमान्य टिळक.

(ता. ३० मे १९२० रोजीं बनारस मुक्कामीं घेतलेला फोटो.)

"He is the first Lokamanya, and perhaps will remain the only one until kind Providence raises another. As a friend, there is no one who could be compared with him. He was dearer and nearer than the dearest and the nearest. He is not gone. He does not sleep. He lives; and his life is an example for all the existing and the generations yet unborn."

—*Hon. G. S. Khaparde.*

करून देणारा नाहीं. तात्पर्य टिळकांची बुद्धि नेहमीं विवादकुशल आणि प्रतिपक्षावर जय मिळविणारी असल्यामुळें त्यांचे सर्व ग्रंथ वादविवादाला उत्तम साधनें पण तत्त्व निश्चयाला निरुपयोगी झाले आहेत. एका मार्मिक लेखकानें लिहिल्याप्रमाणें टिळकांचे बुद्धींत क्षत्रियाचा लढाऊपणा फार भरलेला असल्यामुळें त्यांचे सर्व आयुष्य कोणाना-कोणाशीं युद्ध करण्यांत गेलें. फर्ग्युसनकालेजांत सहकारी मित्राशीं, चहाग्रामण्यांत पुण्यांतील शुद्धपक्षाशीं, पुढें सामाजिक सुधारकांशीं, नंतर मुंबईसरकाराशीं, नंतर राष्ट्रीय सभेंतील नेमस्तपक्षाशीं व ताई महाराजाच्या खटल्यांत कोल्हापूरच्या छत्रपतीशीं सामना करण्यांत त्यांची फार शक्ति खर्च झाली. यामुळें त्यांचे युद्धनैपुण्य व नैतिक गुण जगाचे प्रत्ययास आले हें चांगलें खरें पण ईश्वरदत्त बौद्धिक सामर्थ्याचा अपव्यय ही पुष्कळ झाला ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं.

लहान मोठ्या सर्व माणसांत गुण व अवगुण यांचें मिश्रण झालेलें असतें; किंबहुना सामान्य लोकांपेक्षां मोठ्या माणसांत हें गुणावगुणांचें प्रमाण जास्त असतें. तसें टिळकांतही होतें. पुष्कळ वेळां सद्गुणाचा अतिरेकच अवगुण होतो यांचीं टिळकांचे चरित्रांत अनेक प्रत्यंतरें आहेत. त्यांचा स्पष्टवक्तेपणा आणि खुला स्वभाव, खाजगी, स्नेह्याविषयीं दृढ विश्वास आणि पक्षपातीपणा हे गुण अमोलिक होते; पण तें त्यांच्या पुष्कळ संकटांस कारण झाले. त्यांनीं भोगलेल्या तिन्ही शिक्षांस कारण झालेले लेख त्यांचे स्वतःचे नव्हते, इतकेंच नाहीं तर त्यांना पसंतही नव्हते. १९०८ सालचा पहिला लेख-प्रसिद्ध होऊन सिंहगडावर त्यांनीं पाहिल्याबरोबर त्याचे परिमार्जनाचा उपायही त्यांनीं केला; परंतु कोर्टांत खटला उभा राहिल्याबरोबर त्याची सर्व जबाबदारी त्यांनीं आपले शिरावर घेतली. कै. बाबा महाराजांच्या वचनांत गुंतल्यामुळेंच त्यांनीं ताई महाराजाच्या सर्व खटल्याचा भार आंगावर घेतला. वस्तुतः असें करण्याची कांहीं जरूरी नव्हती व इतर ट्रस्टी जसे तटस्थ राहिले तसे टिळकही बाजूस राहिले असते तर हा खटला जितका लांबला तितका वाढलाही नसता; व टिळकांचे आयुष्याची १८ वर्षें फुकट गेलीं तींही गेली नसतीं. प्रीव्हीकौन्सिलनें निकाल दिलेल्या फिर्यादीचा पहिला मसुदा जेव्हां त्यांनीं प्रस्तुत लेखकास दाखविला, तेव्हां टिळकांनीं स्वतः वादी होऊन दावा करूं नये तर श्री. जगन्नाथ महाराजांचे जनक पित्यास दाव्यापुरतें पालन करणार करून दावा मांडावा व ट्रस्टीनीं सर्व इस्टेट कलेक्टराचे स्वाधीन करून तटस्थ वृत्तीनें सर्व मदत करावी अशी आग्रहाचीं सूचना केली आणि स्वतः वादी झाल्यास अनेक संकटें येतील, असेंही त्यांस सांगितलें; पण टिळकांस ती सल्ला रुचली नाहीं. कारण तेणेंकरून मृत स्नेह्यास दिलेल्या वचनाचा भंग होतो असें त्यांस वाटलें. राजकीय पुढाऱ्यानें कोणाचाही ट्रस्टी किंवा खजीनदार होऊं नये; कारण तेणेंकरून विनाकारण खाजगी शत्रु उत्पन्न होतात, ही कै. दादाभाई-

नौरोजी व रावसाहेब मंडलीक यांची पोक्त शिकवणूक त्यांस माहीत होती; पण मृत स्नेह्यास दिलेलें वचन त्यांस अनुल्लंघनीय वाटलें. वस्तुतः टिळक तटस्थ राहिले असते तर हा खटला इतर शेंकडों दत्तकाच्या खटल्याप्रमाणें दोन चार वर्षांत आटोपला असता, मुंबई सरकार मध्यें पडलें नसतें व चिरोलचें पुस्तक आणि खटलाही उद्भवला नसता. पण भवितव्यता चुकत नाहीं.

हा टिळकांचा स्नेह्याचे संरक्षणार्थ धांवून जाण्याचा स्वभाव अनेक प्रसंगीं दिसून आला आहे. १८८१ सालचा कोल्हापूर खटला, कार्फंड प्रकरणांतील मामलेदाराकरितां खटपट, बडोद्यांतील बापटप्रकरण, नामदार गोखल्यांच्या विलायतेंतील विधानांचे समर्थनार्थ पुरावा मिळविण्याचा प्रयत्न, सुरत राष्ट्रीय सभेच्या वेळीं स्वतःच्या खाजगी मताविरुद्ध केवळ स्नेह्याकरितां धरलेला आग्रह, आणि ज्यास एकदां आपला ह्मटलें त्याचे कितीही अवगुण असले तरी ते पोटांत घालून जाहीर रीतीनें पाठिंबा देण्याचा त्यांचा बाणा हीं त्यांच्या उदर स्वभावाचीं कित्येक उदाहरणें आहेत. १९०७ सालच्या कांग्रेसचे अध्यक्ष आपणांस व्हावयाचें नाहीं हें त्यांनीं आगाऊ जाहीर केलें असतें तर नागपुरासच वाद मिटता. तसेंच सुरतेस राष्ट्रीयसभा मोडल्यावर कनव्हेनशनमध्यें जाण्याची त्यांची स्वतःचीं फार इच्छा होती, व तसें केलें असतें तर दुफळीही झाली नसती. पण स्नेह्यांच्या मुरवतीखातर त्यांनीं स्वतःचें मत बाजूला ठेवलें व पुढील सर्व परिणाम स्वतः भोगले, हें प्रस्तुत लेखकांस प्रत्यक्ष माहीत आहे. टिळकांना अध्यक्षपणाचा मान हवा होता किंवा त्यांचा स्वभावाच्या हेकेखोरपणानें त्यानीं सुरतेस राष्ट्रीय सभेंत घोंटाळा केला हे नेमस्त पक्षाचे आरोप सर्वथा खोटें आहेत. टिळकांनां पदोपदीं नडला तो त्यांचा आग्रही स्वभाव नसून स्नेह्यांची भीड आणि त्याचें स्वभावांतील अतिरिक्त दिलदारपणा होय. १९१५ सालीं मुंबईच्या राष्ट्रीय सभेंत त्यांनीं प्रतिनिधि व्हावें व पुढारीपणानें भाग घ्यावा अशी पुष्कळ नेमस्तांचीही अंतःकरण पूर्वक इच्छा होती व कै. हरीभाऊ आपटयांनी पुष्कळ खटपट केली.खुद्द टिळकांचीही तशी इच्छा होती व त्यांचा योग्य सन्मान राहील अशी ना.पंडित मालवीयानीं हमीही घेतली. पण कांग्रेसमध्यें जाईन तर सर्व स्नेह्यानां घेऊन जाईन हा त्यांचा बाणाच आडवा आला. हा स्नेहातिरेक खाजगी व्यवहारांत अमोलिक गुण होता; पण सार्वजनिक कार्यांत तो पुष्कळदां विघातक झाला. राजकीय पुढाऱ्यानें एकदां देशकार्याकरितां पुढें पाऊल टाकल्यानंतर संन्याशाप्रमाणें रागलोभादि सर्व सांसारिक वासनांपासून अलिप्त राहिलें पाहिजे; देशहिताचे कामीं शत्रुमित्रांनां सारखें वागविलें पाहिजे; व स्वतःची आवडनिवड अगदीं विसरली पाहिजे. स्वतःच्या कुटुंबाची ज्यांनीं कधींही

विवंचना केली नाहीं, त्यांना परकी स्नेह्यांची भीड तुटत नव्हती हा मनुष्यस्वभावाचा विचित्रप्रकार टिळकांचे चरित्रांत चांगला प्रत्ययास आला आहे.

टिळकांचा भोळा स्वभाव आणि स्पष्टवक्तेपणा तर आबालवृद्धांस माहीत झाला होता. त्यांचे घरीं नेहमीं खुला दरबार असे. लहान मोठा, गरीब श्रीमंत, स्नेही परका, कोणी कसाही व कोणत्याही उद्देशानें येवो ते सर्वांशीं सारख्या मोकळेपणानें बोलत. टिळकांचीं जाहीर भाषणें जितकीं विचारपूर्वक आणि मोजक्या शब्दांची असत, तितकींच त्यांचीं खाजगी संभाषणें जर सावधपणाचीं असतीं तर पुष्कळ अनर्थ टळले असते. ब्रुईनसाहेब एकदोन दिवसांआड घरीं येऊन तासतास अनेक विषयांची चर्चा करीत व टिळकही एकाद्या निकट स्नेह्याप्रमाणें त्यांच्या पाशीं खुल्या दिलानें बोलत. पोलीस ऑफिसराशीं इतका पाल्हाळ उपयोगी नाहीं असें प्रस्तुत लेखकानें सुचविलें तेव्हां आपलेजवळ गुप्त कांहीं नाहीं व पोलिस अथवा खुद्द सरकारही आपलें कांहीं वाकडें करूं शकणार नाहीं असा त्यांचा रोख जबाब असे. त्यामुळें खुद्द ब्रुईनसाहेबांची त्यांचेविषयीं पूज्य बुद्धि झाली व तीच पुढें ताई महाराजांचे खटल्यांत उपयोगी पडली. हें मात्र खरें लहान थोर सर्व दर्जाच्या लोकांचे टिळकांविषयीं जें अतोनात प्रेम दिसून येतें त्यालाही मुख्य कारण हा त्यांचा खुला स्वभावच होय.

१९०८ सालचा फौजदारी खटला त्यावेळचे पुण्याचे कलेक्टर कार्मायकेल साहेब यांजबरोबर झालेल्या फाजील संभाषणाचा परिणाम होय ही गोष्ट लोकांना फारशी माहीत नाहीं, पण खरी आहे. संभाषण होऊन घरीं आल्यावर सायंकाळीं जेव्हां टिळकानीं त्रोटक हकीकत प्रस्तुत लेखकास सांगितली, तेव्हांच भावी अनर्थाचें स्वप्न पडलें. पुढील खटल्यांतील लेख केवळ निमित्त मात्र होते. वस्तुतः कार्मायकेल साहेबांचा रिपोर्ट व त्यावरील सिडेनह्याम साहेबांची मखलाशी हीच टिळकांच्या पुढील संकटास कारण झाली. सहा वर्षांची शिक्षा देण्याचा विचार चालल्याची गोष्टही प्रस्तुत लेखकानें त्यांस पकडल्याचें दुसरे दिवशीं सांगितली; व म्हणूनच त्यांनीं बॅरिष्टर वगैरे देऊन व्यर्थ पैसा खर्च करण्याचे रहित करून स्वतःच डिफेन्स देण्याचा निश्चय केला. डिफेन्सचे भाषणांत कायद्याचे दृष्टीनें पुष्कळ अप्रस्तुत गोष्टींचा उल्लेख येई, तेव्हां त्यांचें एकच उत्तर असे कीं मी ही शिक्षा भोगून जिवंत घरीं परत येईनसें वाटत नाहीं, तेव्हां हें माझे शेवटचें राजकीय भाषण आहे असें समजून बोलत आहे, व त्यांत माझा स्वतःचा डिफेन्स न देतां माझ्या देशाच्या आंकाक्षा जाहीर करणार आहें. प्राणांतिक शिक्षा डोळ्यांपुढें असतांना असामान्य धैर्य दाखविणारा पुरुष कोणत्याही देशांत एकादे वेळेसच निपजतो. वधस्तंभावर खुषीनें मान ठेवणारा **ग्यालिलियो**, अग्नींज्वालेंत हात धरणारा **जॉन नाक्स**, क्रूसावर चढवीत असतांही शांतवृत्ति ढळूं न देणारा **येशू ख्रिस्त**, स्वतःचे प्रिय पुत्रास उखळींत घालणारा **श्रियाळ** व पुत्राचें प्रेत दहन करणारा **हरिश्चंद्र** यांचे सारखीं धीरोदात्त

माणसें या अज्ञानमय जगताची दीपस्तंभ झालीं आहेत, त्यांचेच मालिकेंत लो. टिळकांनां वसविण्यास हरकत नाहीं. राजकीय चळवळ ही एक प्रकारची अधिकारी वर्गाशीं लढाई आहे. प्रत्यक्ष युद्धाप्रमाणें या सनदशीर लढाईमध्येंही अनेक डांवपेच वापरावे लागतात. त्यांत विशेषेकरून अधिकारीवर्ग जेव्हां शहाणपणा, एकजूट, साधनसामुग्री वगैरेनीं अतिशय बलिष्ठ असतो तेव्हां तर फारच सावधगिरी ठेवावी लागते. पलवान-प्रतिस्पर्ध्याशीं आपल्या तुटक्या मोडक्या सैन्यानें सामना करूं पहाणारा सेनापति असा-मान्यच असला पाहिजे. सन १८९० सालीं लो. टिळक फर्ग्युसन कालेजाचे मंडळींतून एकटे बाहेर पडले हें प्रसिद्धच आहे;१८९७सालीं राजकीय लढाईंत ते बहुतेक एकाकीच होते; १९०७ सालीं त्यांचा पक्ष तयार होऊन तो राष्ट्रीय सभेंत कायम झाला; १९१४ सालीं देशांत त्यांचे विषयीं सार्वत्रिक सहानुभूति वाढली व १९२० 'सालीं ते अक्षरशः लोकमान्य झाले. प्रारंभीं कांहीं अनुकूलता नसतां ज्यानें एवढें प्रचंड सैन्य पार्टी गोळा करून स्वराज्याची लढाई जिंकली तो सेनापति अलौकिक नाहीं असें कोण म्हणेल. या लढाईंत जे अनेक प्रकारचे डावपेंच वेळोवेळीं वापरावे लागले त्यांवरून टिळकांच्या युद्धकुशलतेची चांगली साक्ष पटते. गेल्या तीन वर्षांत राष्ट्रीय सभेंतील नेमस्त पक्ष, बिझांट पक्ष आणि गांधी पक्ष या तिघांवरही त्यांनीं अनुक्रमानें सरशी मिळ-विली, त्यावरून तर त्यांचे चातुर्याविषयीं सर्वांची खात्री झाली आहे. एक युक्ति मात्र त्यांना अवगत नव्हती किंवा अवगत असूनही करारी स्वभावामुळें त्यांस साधत नव्हती असें म्हणावें लागतें. ती युक्ति प्रसंगीं पड घेण्याची होय. बुद्धिबळाचे डावांत कित्येकदां मोहरीं मागे घ्यावीं लागतात, तसेंच मोठमोठया सेनापतीसही युद्धाचेवेळीं अडचणीचे जागेंतून सैन्य मागें घ्यावें लागतें. मनुष्याच्या व राष्ट्राच्या आयुष्यांत असे कांहीं प्रसंग येतात कीं तेवेळीं थोडी माघार घेणें अंतिमहिताच्या दृष्टीनें श्रेयस्कर असतें. पुढील अडचणी लक्षांत न घेतां जो सेनापति केवळ शौर्यातिरेकानें आपले सैन्य नदींत किंवा खड्ड्यांत घालतो तो आपले सैन्याचा नाश करतो व कार्यही बिघडवितो. बोर युद्धांत जनरल डिवेटप्रभृति चाणाक्ष सैनिकांचा सल्ला न ऐकतां जनरल क्रांजी हेकटपणानें शत्रूशीं तोंड देऊन बसल्यानें बंदिवान झाला, व त्यामुळें सर्व बोर पक्षाचा पाडाव झाला ही गोष्ट सर्व विश्रुत आहे. लो. टिळकांचा स्वभाव वऱ्याच अंशानें जनरल क्रांजेसारखा धाडशी आणि एक घाव दोन तुकडे करणारा होता; व त्यामुळें पुष्कळदां बाजू त्यांचे अंगावर येत असे. सन १८९७ सालीं खटला पुढील सेशनापर्यंत तहकूब करून घेण्याची ब्रुईनसाहेबांची सल्ला ऐकली असती तर दामोदर चाफेकराचा कबूली-जबाब दरम्यान प्रसिद्ध होऊन टिळक निर्दोषी सुटून जाण्याचा पुष्कळ संभव होता. परंतु टिळकांची प्रवृत्ति नेहमी समोर लढाई करण्याकडे असे. डावेपेंचानें सुटून जाणें त्यांनां केव्हांच पसंत नसे. सुरतेच्या राष्ट्रीय सभेंत त्यांनीं आरंभीं मुग्धता स्वीकारली असती तरी पुढील बोजवार टळला असता. अध्यक्षाची

निवड होऊं द्या व नंतर विषयनियामक कमेटींत आम्हीं तुम्हांस पूर्ण पाठिंबा देतों असें लजपतराय, हरकिसन लाल, सुरेंद्रनाथ प्रभृति इतर प्रांतांतले पुढारी आश्वासन देत होते; पण गप्प बसले तर पड खाल्ली असें लोक म्हणतील, असल्या शुष्क भीतीनें त्यांनीं सर्वांनां नाखुष केलें. त्यांनां सर्व प्रकारचे आरोप पुरवत; पण भ्याल्याची किंवा माघार घेतल्याची शंकाही त्यांचे मनाला दुःसह होत असे. मानी पुरुषाला अपमानं केव्हांही सहन होत नाहीं, तसेंच टिळकांना एकदां टाकलेलें पाऊल मागें घेणें मरणप्राय संकट वाटत असे. नैतिक दृष्ट्या हा गुण फार उदात्त आहे; पण व्यवहारांत तो पुष्कळदां विनाशकारक होतो. या त्यांच्या धाडशी स्वभावामुळें पुष्कळ लोक सपूर्ण सहानुभति असून त्यांचे मागें जाण्यास धजत नसत; व जे जात तेही प्रसंग येतांच मागच्यामागें पळ काढीत. नदींत उडी टाकणारा सेनानी, खडकावर नांव घालणारा नावाडी आणि वन्य श्वापदाचे कळपावर एकटा चालून जाणारा शिकारी नैतीक दृष्ट्या शूर असेल, पण आपले सोबत्यास तो भीतिप्रदच होतो. पुढाऱ्यानें सर्वच लोक आपल्या सारखे असामान्य धैर्याचे आहेत असें मानून चालत नाहीं. जग सर्व प्रकारच्या लंगडचालुल्या लोकांनीं भरलेलें आहे. त्यांच्या अल्पताकतीप्रमाणेंच लोकनायकानें आपली योजना केली पाहिजे. टिळकांना ही परकायाप्रवेशाची विद्या साधत नसे. त्यांना सर्व लोक आपल्या सारखेच आहेत किंवा असले पाहिजेत असें नेहमी वाटे. व त्यामुळें त्यांच्या विचारांत पूर्वीपासून एक प्रकारची परमतासहिष्णुता असे. त्यांच्या स्वभावांत जो तापटपणा दिसून येई तोही या असहिष्णुतेचाच परिणाम होय. कोणी विरुद्ध मत सांगितलें तरी शांतवेळीं ते त्याचा नीट विचार करीत आणि ग्राह्यांस स्वीकारीतही असत; परंतु तत्क्षणीं तडाखा दिल्यावांचून राहात नसत. त्यामुळें ज्यांना त्यांचा स्वभाव चांगला माहीत नव्हता अशा पुष्कळ लोकांचा त्यांचे विषयीं गैरसमज होत असे. चांगल्या लोकांचे हे गैरसमज चिरस्थायी झाल्यानें कायमचें शत्रुत्व झाल्याचींही उदाहरणें आहेत.

अशा प्रकारचें एक उदाहरण प्रस्तुत लेखकाच्या प्रत्यक्ष माहितीचें आहे. तें सांगण्यासारखें आहे. लो. टिळकांचा व सर **फिरोजशहा मेथा** यांचा अत्यंत निकट स्नेह सन १८८१ चे खटल्यापासून जडला होता तो १८९५ पर्यंत अव्याहत टिकला. १८९२ सालीं पुणें प्रांतिक सभेचे अध्यक्षस्थान त्यांनीं फेरोजशहाला दिलें तेव्हांपासून अधीक वाढला. १८९२ सालीं भरलेल्या पुणें प्रांतिक सभेची हकीकत मनोरंजक आहे. टिळकांना प्रांतिक सभेचे सेक्रेटरी नेमलें असतां त्यानीं पांच वर्षें कांहीं तजवीज केली नव्हती. कारण कालेजचा तंटा, संमती कायद्याचा वाद, लॉ क्लास आणि केसरी पत्र यांत ते व्यग्र होते. प्रस्तुत लेखक त्यावेळीं मराठ्याचा एडिटर असल्यानें त्यास एक दिवस कै. गोखल्यांनीं प्रांतिकसभेचे सेक्रेटरी होऊन प्रांतिकसभेची तयारी करण्याची

सचना रानड्यांच सांगण्यावरून केली. परंतु टिळक सेक्रटरी नेमिले असतां त्यास बाजूला ठेवून स्वयं निर्मित अधिकार आपले हातीं लेखकास पसंत नसल्यामुळें त्यांनीं सायंकाळीं टिळकांस विचारिलें. टिळकांनीं लगेच प्रतिपक्षाचा डाव ओळखून कोणास न कळवितां रात्रीचे गाडीनें मुंबईस प्रयाण केलें व सकाळीं फिरोजशहाकडून अध्यक्ष होण्याचें कबूली पत्र घेऊन पुनः सायंकाळीं पुण्यास रानड्यांस दाखविलें. आणि एक महिन्यांत मे महिन्याचे सुटींत फेरोजशहाचे अध्यक्षतेखालीं पुण्याची पांचवी प्रांतिक परिषद उत्तम रीतीनें पार पडली. यामुळें टिळकांची कर्तबगारी प्रतिपक्षाचे नजरेस आली इतकेंच नाहीं, तर मुंबईचे सिंहाचा पाठिंबा मिळाल्यामुळें त्यांची इभ्रतही वाढली. १८९३ सालीं रानड्यांचे स्थलांतर मुंबईस झाल्यानें अर्थात्च पुण्याचे लोकमत टिळकांचें ताब्यांत पूर्णपणें आलें. त्याचा परिणाम टिळकांनीं आपल्या बाजूचें बहुमत करून सार्वजनिक सभा आपले तब्यांत घेतली.ही संधि साधून विरुद्ध पक्षानें फेरोजशहाचे मन टिळकांविषयीं कलुषित केलें. १८९५ ची कांग्रेस पुण्यास ठरली होती, तेच वेळीं पुण्याच्या कांहीं लोकांनीं सामाजिक परिषदेचा वाद उपस्थित केला. टिळक कांग्रेसचे जनरल सेक्रेटरी असल्यानें फेरोजशहाला पुण्याच्या भानगडींत मन घालणें अवश्य झालें. त्यांनीं टिळकांस भेटण्याविषयीं निरोप पाठविला व पूर्वी ठरलेल्या संकेताप्रमाणें टिळक, दाजीसाहेब खरे व प्रस्तुत लेखक असे त्रिवर्ग फेरोहशहाचे ऑफिसांत गेलों. या दोन्हीं मानी पुरुषांची दृष्टादृष्ट होतांच दोन घन पदार्थ एकमेकांवर आपटल्यामुळें ठिणगी उडते तशी एकदम चकमक उडाली. अर्धा तास शांतपणें बसून दोघे खुल्या मनानें बोलते तर सर्व गैरसमज दूर झाला असता, व पुण्यास उत्पन्न झालेली दुफळी मोडली असती. फेरोजशहा आणि टिळक, दोघेही वीर करारी आणि टणक. फेरोजशहानीं उभ्यानेंच सवाल केला कीं आम्हांस विचारल्याशिवाय तुम्हीं पुण्यास काय गडबड मांडली आहे ?त्यांस टिळकांनीं जबाब दिला कीं पुण्याचें स्थानिक गोष्टींत मुंबईकरांनीं पडण्याचें कारण नाहीं. फिरोजशहांनीं सांगितलें कीं असें असेल तर तुमचें आमचें पटावयाचें नाहीं व टिळकांनीं प्रत्युत्तर केलें आह्मांला त्यांची पर्वा नाहीं. दाजीसाहेबांनीं उभयतांस शांत करण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. १८९५ सालीं मेथा टिळकांमधील द्वैषभावाचें हें जें बीजारोपण झालें, त्याचा परिणाम बाराबर्षांनीं १९०७सालीं सुरतेस राष्ट्रियसभा मोडण्यांत झाला, व अखेर शेवट आणखी बारा वर्षांनीं अमृतसरचो कांग्रेस लो०टिळकांनीं पूर्णपणें काबीज करण्यांत झाला. पुढाऱ्यांचे स्वभाव वैचित्र्यानें राष्ट्राचे इतिहासावर कसा परिणाम होतो याचें हें उत्तम उदाहरण आहे.

सुरतेच्या भांडणाचे बीज बारा वर्षापूर्वी पेरलें गेलें होतें हें ज्यांना माहीत नव्हतें त्यांनीं त्यांची तात्कालिक कारणें अनेक शोधून काढलो होती; पण वस्तुतः तें भांडण दोन पक्षांचे किंवा दोन व्यक्तींचें ही नसून दोन भिन्न प्रकारच्या राजकीय चळवळींचें होतें. कांहीं थोड्या शहाण्या लोकांनीं खोलींत बसून सर्व

राष्ट्राच्या अभ्युदयाची रूपरेषा आंखणें ही फेरोजशहाची पद्धति; व सर्व लोकांच्या विचारानें त्या राष्ट्रीय कार्याची दिशा ठरविणें ही टिळकाची पद्धति. या दोन पद्धतींचे संघर्षण स. १८९५ सालीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत सुरू होऊन शेवट बारा वर्षांनीं सुरतेच्या कांग्रेस मंडपांत झाला. आणि टिळकांचे पद्धतीचा अखेर विजय १९१९ सालीं अमृतसरला झाला. हिंदी राष्ट्राच्या राजकीय प्रयत्नांतील अल्पसत्ताक वर्चस्व* जाऊन लोकशाहीचे प्राबल्य कायम झालें. मध्यंतरीं टिळकांविषयीं भयंकर गैरसमज उत्पन्न झाले पण अखेर त्यांनीं आपले राष्ट्रकार्य पुरें करून देह ठेवला. टिळकांनीं ही जी क्रांति घडवून आणली आहे त्याचे परिणाम पुढें हळू हळू दिसूं लागतीलच. परंतु त्यांच्या अनुयायांनीं आधारांत चांचपडत न रहातां त्यांनीं घालून दिलेल्या हमरस्त्यानेंच लोकशाहीची वाढ केली पाहिजे. हा मार्ग फार बिकट आहे व टिळकांप्रमाणें आणखी पुष्कळांनां या कार्यांत आत्मयज्ञ करावे लागतील. लोकमान्यांची कोरडी स्तुति किंवा निरुपयोगी शोकाश्रु ढाळीत बसण्यापेक्षां त्यांचा कित्ता गिरविणारे शिष्य पुढें येतील तर त्यांनीं लावलेला वृक्ष सुफल झाला असें म्हणतां येईल, प्रत्येक महात्मा आपले नियोजित जीवितकार्य करून विराम पावतो; पण तें पुढें चालविणें मागें राहिलेल्या अनुयायांचें कर्तव्य आहे.

काळाचीं झडप

चाल०-उद्धवा शांतवन०-

(दासानुदास चाफळ.)

ही कसली भीषण वार्ता । मृत्यूची जळती ज्वाळा !
कीं कढलेल्या तेलाची । वृष्टि ही महाराष्ट्राला !
कीं सुरीच पाजळलेली । चरचर चिरि जनहृदयांला !
वातेंचें सुटतां वारें
हादरलें भारत सारें,
भेदरले दिग्पट, तारे,
पशुपक्षी ढळढळ रडती । पाषाणहि दुःखें कढती ॥ १ ॥
पोटांत हाय ! कालवतें , । वक्षस्थल हें धडधडतें,
मूर्च्छित मति होउनि जाते, । रक्तही शिरांतुनि थिजतें,
चक्षुंपुढें गरगर फिरतें । स्थिरचर, हें ऐसें गमतें,
कल्पनाहि केवळ ज्याची
सहन मनास न व्हायाची
तें मूर्तिमंत घडतांची

_गमते भूकंप जहाला । प्रलयकाल कीं अवतरला ॥ २ ॥
हा हिरा हरपला हाय ! तेजाचा तारा तुटला,
कडकडला ध्वज धैर्याचा; दुःखोदधि कीं खळबळला,
ही कोसळली शिरिं वीज । आमचा कोट ढासळला '
खग्रास लागलें ग्रहण,
या ' बाल'-भास्करा जाण,
जाणार कधीं नच सुदुन;
अंधार दाटला गगनीं , । या नयनीं, अंतःकरणीं ॥ ३ ॥
हा परिस्थितीची खिंड । लढवीतचि गेला निधुनी,
हा गेला राघु भरारां । इहलोकांतुनि कीं उडुनी,
मोहरा धरेचा पडला । राष्ट्रोन्नतिच्या घोर रणीं,
झुंजार हा महावीर,
हा वायुगतीचा तीर,
हा कर्णधार बहु धीर,
निस्तेज जाहला हाय ! जाळिते तनुस ही हाय ! ४ ॥
उकलावें कोणि रहस्य । श्रीमद्भगवद्गीतेचें ?
सांगावें कोणी गूढ । त्या कर्मयोगमार्गाचें ?
मिरवावें कोणी ब्रीद । सार्थपणें त्या केसरिचें ?
तूं लाल हिंददेवीचा
तूं बाळ हिंदमातेचा ,
तूं तिलक तिलकवंशाचा,
तुज ऐसा नव्हता कोणी । शून्य अतां झाली धरणी ॥ ५॥
हे हतभागि महाराष्ट्रा ! करणार काय तूं आतां ?
हे राष्ट्रोन्नतिकारांनो ! करणार काय आकांता ?
स्वातंत्र्यवीरवर नर हो ! वसणार शांत कां आतां !
"लोकमान्य " कीं जय बोला,
स्वातंत्र्यसंगरीं डोला ,
संपादुनि घ्या ध्येयाला,
व्हा भान विसरुनी दंग । धीरानें कसुनी चंग ॥ ६ ॥



लाल—बाल—पाल

हिंदमातेचें रुदन.

चित्रकारः—कापरे. B A P W

बाळटिळकाचा गुणैकदेश.

(लेखक–नारायण कृष्ण गद्रे.)

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे, रविवार ता. १ आगष्ट सन १९२० ह्या दिवसारंभींच हा लोक सोडून व त्यांतील स्वदेश आणि स्वराष्ट्र म्हणजे भरतमहाराष्ट्र ह्यांस स्वविरहार्णवांत गटंगळ्या खात ठेऊन, परलोकीं गेले.त्यांचें चरित्र, ज्यास जसें व जितकें ठाऊक आहे, तसें व तितकें लिहावें, असें त्यांच्या प्रत्येक देशबांधवास वाटत आहे; आणि त्याप्रमाणें तो, सांपडेल त्या ठिकाणीं, आपापल्या वर्णीनीं लोकमान्यांचें चित्र काढीत आहे. हा लेखकही, वरील न्यायानेंच उषःकालमालाकारांच्या विनंतिरूप पडत्या फळांची आज्ञा शिरसावंद्य मानून, लोकमान्यांविषयीं चार शब्द, जरा वेडेवांकडेच, लिहिणार आहे; तरी लोकमान्यांची सदाराध्यदेवता जी भरत महाराष्ट्रजनता, तीच ह्याचीही मूर्तिमती क्षमा अशी माऊली असल्यानें, आपल्या त्या एका सुकृतीपुत्राच्या वर्णनांत, आपल्याच दुसऱ्या कोणा अल्लड मुलांकडून कांहीं न्यूनता घडली तरी, रागावणार नाहीं, असा भरंवसा असल्यानेंच खालील लेख लिहिण्याचें धाष्टर्य करीत आहे.

पुत्र व्हावा ऐसा गुंडा । ज्याचा तिहीं लोकीं झेंडा ॥

असें एक, पुत्र कशा प्रकारचा इच्छावा एतद्विषयक, वृद्धवचन किंवा सुभाषित आहे. टिळकांचें कुळ हे चित्पावन ब्राह्मणांतर्गत होय. त्यांची शाखा ऋग्वेदी आश्वलायन. गंगाधरपंत टिळक–**लोकमान्यांचे** वडील.हे नव्या तऱ्हेनें कांहीं अधिक शिकून शाळाशिक्षकाच्या धंद्यांत शिरले. हे रत्नागिरीस असतांना शकाब्द १७७८ च्या आषाढ वद्य ६स सूर्योदयानंतर अर्धपाव घटकेंतच पुत्र जन्मानें कृतार्थ झाले. असें म्हणण्याचें कारण गंगाधरपंताचें वय त्या वेळीं ३६ वर्षांचें होतें, आणि ह्यापूर्वी त्यांस एकावर एक तीन मुलीच झाल्या होत्या. पैकीं थोरलीचें लग्नही झालें होतें. अर्थात् त्यांच्या पत्नीनें तर पुत्राकरितां रविवारचें सूर्यव्रतही घेतलें होतें. आणि त्या सूर्याचाच प्रसाद हा पुत्र होय. ह्या पुत्राचें नांव **केशव** असें ठेविलें होतें. परंतु पुढें बाळ हेंच प्रचारांत आलें. गंगाधरपंत चांगले चतुरस्त्र होते. त्यांस आपली देशस्थिति, धर्मस्थिति, आणि एकंदर परिस्थिति किती असमाधानकारक आहे हें पूर्णपणें कळत होतें. अर्थात् आपली पुढील पिढी जर कांहीं विशेष कर्त्तृत्ववान् निपजली तरच ह्या

सर्वस्वीं विनाशक परिस्थितींतून आपला, आपल्या ज्ञातीचा व आपल्या सर्व देशबांधवांचा कांहीं निभाव लागण्याची आशा आहे; नाहीं तर, बुडत्याचा पाय खोलांत अधिकाधिकच रूतून इतर नामशेष झालेल्या राष्ट्रांप्रमाणें ह्या भरतमहाराष्ट्रासही नामशेषच व्हावयाची पाळी निश्चयानें येणार असें नुकत्याच झालेल्या नागपुर, सातारा इत्यादि ठिकाणच्या स्वराज्यनाशाच्या आणि त्या वेळीं चालू असलेल्या लार्ड डलहौशीच्या हिंदीमराठी संस्थानी स्वराज्यें एकामागून एक खालसा करण्याच्या तडाक्याच्या अति दु:खद अनुभवानें गंगाधरपंता सारख्या प्रत्येक विशेष समंजस ब्राह्मणास–विशेषत: कोकणस्थ ब्राह्मणांस, अहर्निश वाटत असलें पाहिजे. अर्थात् अशा प्रकारच्या राजकीय आपत्तीच्या ध्यासानें तदेकनिवारक उपायांचेच चिंतन चालू असणाऱ्या पुरुषास होणारी संतति–यो यच्छ्रद्धः स एवसः त्या न्यायानें राजकीय परिस्थिति सुधारण्याचाच सक्रिय ध्यास बाळगणारा पुत्र होणें हेंच नैसर्गिक होय. त्याकाळीं म्हणजे शकशतक अठराव्याच्या चतुर्थपादांत प्रत्यहीं कानावर आदळणाऱ्या, आज ह्या स्वराज्याची इतिश्री झाली, उद्यां अमक्या तमक्याची होणार, परवां एकंदर संस्थानांची, दत्तकाधिकारविनाशक सार्वभौमराजशासनानें, ह्या स्वराज्यसत्रांत पूर्णाहुति पडणार, अशा बातम्यांनीं स्नानसंध्यादि नित्यकर्में, किंवा व्रतोपवासादि नैमित्तिक कर्मेंही यथासांग करितां येण्यासारखी मन:स्थिति गंगाधरपंतांसारख्यांची नसावी ह्यांत कांहीं अनैसर्गिक नाहीं. तेव्हां गंगाधरपंतांस, वरीलसारख्या काळांत झालेला पुत्र, त्यानें पुढें आपल्या सर्व आयुष्याभर जें आचरण केलें तसलेंच आचरण करणारा, परंतु, ज्याचा तिहीं लोकीं झेंडा ऐसा गुंडा, व्हावा हेंच योग्य ! ह्या टिळककुलाचें नाम सार्थ करणाऱ्या मुलाचें जनन सिंहलग्नावर, रवि स्वगृहीं मघानक्षत्रारंभीं उदित असतांना आणि दशमेश म्हणजे राज्यभुवनेश शुक्र–कवि-हा रवितेजांत अस्तंगत अशा योगावर जरी झालें, तरी नवमस्थानीं म्हणजे भाग्यकीर्ति भावांत अश्विनी ह्या तीव्रबुद्धिदर्शक देवगणी नक्षत्रांत देवगुरु आणि प्रजाकारकचंद्र ह्यांचा युतियोग असल्यामें प्रजापक्षाचें गुरुस्थान आणि तत्स्थीतिदर्शक अलोट किर्ति होण्यासारखीं कृत्यें ह्या मुलाच्या हातून घडलीं. दैव हें पंगु आणि उद्योग हा अंध असा प्रकार असल्यामुळें वरील प्रमाणें जन्मकालीं असणाऱ्या पंगु दैवयोगाशीं अंध परंतु धडधाकट भगीरथ प्रयत्नसम अशा उद्योगाची गांठ घालणें हें काम लोकमान्यांनीं आपल्या उत्तरोत्तर वाढत्या ,वयांत वाढत्या ज्ञानानें आणि वाढत्या निश्चयानें केलें; म्हणूनच ' अधिकस्य अधिकं फलम् ' ह्या न्यायानें त्यांचा दैवयोग खुलून, त्यांस दिगंत आणि अजरामर किर्ती मिळविता आली. अस्तु !

बाळचा आग्रही–हट्टी–स्वभाव वयाच्या पहिल्या वर्षींच कसोटीस लागला. श्रावणीच्या दिवशीं आजोबांनीं, लाडानें जवळ बसवून घेतलेल्या आपल्या ह्या, नात-

वासही एक जानवें घातलें. अनुपनीत अशा ह्या मुलाचें जानवें अमंत्रत्वानें ओवळेंच. तेव्हां पुढें जेवणाच्या वेळेस तें काढून टाकण्याबद्दल बाळास सांगण्यांत आलें. वडील गंगाधरपंत **नाना**, आजोबा रामचंद्रपंत अप्पा हे दोघेही सोवळे. बाळास जानवें काढून जेवावयास ये असें अजोबांनीं सांगतांच बाळ म्हणतो ' तूं काढ आपलें म्हणजे मी काढीन आपलें. ' पुष्कळ समजूत घालण्याचा आणि धाकाचा प्रयत्न झाला. पण बाळ कांहीं बधेना, शेवटीं नानांनीं विश्वरूप प्रगट करून जेव्हां सांगत्या दोन श्रीमुखांत भडकाविल्या तेव्हांच बाळाचें जानवें निघालें !

गंगाधरपंतांनीं आपल्या मुलास यथाकाल आणि यथाशक्ति शिक्षण दिलें. मुलाचे पाय पाळण्यांत किंवा प्रसाद चिन्हांनीं पुरः फलानि ह्या न्यायानें बाळ पुढें कशा प्रकारचा निवटणार हें ह्या शिक्षणकालीं अनेक वेळां गंगाधरपंतांच्या व इतरही आप्तेष्टांच्या दृष्टीस पडे. पैकीं एकच आख्यायिका येथें देण्यांत येत आहे. **बाळ** हा शाळेंत असतां एकदां एका शिक्षकाच्या शिक्षेस पात्र झाला. ही शिक्षा केवळ शिस्त मोडल्याविषयींच व्हावयाची होती. पण आपण जर आपल्या समाजाप्रमाणें निरपराधी आहोंत तर शिक्षा काय म्हणून सोसावयाची अशी पडली **बाळाची** मनोरचना शिक्षकानें छडी घेण्यासाठीं हात पुढें करण्यास आपल्या ह्या **बाल** शिष्यास आज्ञा केली. ती शिक्षकाची आज्ञा मान्य करण्याचें त्यानें नाकारिलें. अर्थात् त्यापुढें वर्गांतून आपलीं पाटी पुस्तकें घेऊन चालता हो अशा प्रकारची अन्य शिक्षा शिक्षकानें ह्यास दिली. ह्यांनीं ती मात्र लगेंच मानिली. परंतु प्रकार असा झाला कीं ह्यांच्या मागोमाग वर्गांतील इतर मुलेंही भराभर ह्यांचेच अनुकरण करण्यास लागलीं. घरीं आल्यावर शाळेंतील प्रकार वडिलास निवेदन करून आपण फिरून त्या शाळेंत त्या शिक्षकाच्या हाताखालीं जाण्यास सिद्ध नाहीं असें **बाळानें** स्पष्ट कळविलें. वडिलांनीं थोडी समजूत घालण्याचा आव घातला; परंतु लवकरच आपल्या मुलाचा स्वभाव जाणणाऱ्या गंगाधरपंतांनीं आवरतें घेऊन **बाळास** दुसऱ्या शाळेंत घातलें. पुढें बाळाचे बलवंतराव होऊन ' केसरी' चें संपादक असतांना ' गुरोरप्य वलिप्तस्य कार्याकार्यमजानतः । उत्पथप्रातिपन्नस्य न्याय्यं भवति शासनम् ॥ इत्यादि सुभाषिताच्या आधारानें हें **आमचे गुरुच नव्हेत** असा एक अग्रलेखही टिळकांनीं लिहिलेला आहे. आणि हा त्यांचा लेख अत्यंत नांवाजलेल्यापैकीं गणिला जातो. शके १७९५ त प्रवेश परीक्ष होऊन दक्षिणाविद्यापीठांत बलवंतरावांचें पुढील पदवीपर्यंतचें शिक्षण झालें. दक्षिणाविद्यालयांत गेल्यावर वडिलांच्या अनुमतीनेंच त्यांनीं, मनोविकासैकयोग्य असें वाचन, निबंधलेखन किंवा टिप्पण्या करणें इत्यादिप्रकारच्या अभ्यासाचें श्रम बरेच आणि बुद्धिपुरःसर कमी करून, पुढें आपणांस सोसाव्या लागणाऱ्या शारीरिकयातनाचेंही जणुं मुग्धज्ञान झाल्यानेंच, आपल्या शरीर-

बलसंवर्धनास योग्य असला-जोरजोडी, मल्लखांब, होडी वलव्हणें, पोहणें, धावणें पळणें किंवा इतर उघड्या हवेंतील खेळ खेळणें इत्यादि व्यायामाचा अभ्यास विशेष आस्थेनें चालू केला आणि थोडक्यांतच आपलें शरीर चांगलें कसलेलें अशा विशेषणास सर्वथैव पात्र करून सोडिलें. शके १८०१ त हे पदवीद्वययुक्त होऊन 'कलापति' ही तिसरी पदवीही गणित विषयांत पटकावणार होते; परंतु तेथेंही कांहीं वरील सारखीच गुरुपदाच्या मानापमानाची भानगड उत्पन्न होऊन तो नाद त्यांस सोडावा लागला. गणित विषयांत बळवंतराव, आपल्या गुरुपणाचा मान, काय तो एकट्या स्वदेशी व स्वज्ञाति अशा केरोपंतनानांसच देण्यास उत्सुक असत. तो मान ते वीद्यापीठीय, राजनियुक्त, इंग्रज गणितीपंडितास देण्याचें स्पष्ट नाकारीत. आणि हेच कारण ते गणितकलापति ह्या पदवीस मुकण्याचें होय असें श्रुत आहे. ह्याप्रमाणें कालोचित शिक्षणाच्या परतीरास पोचून बळवंतराव, सरकारी नोकरींत प्रतिमास सहस्त्राधिकराजमुद्रा मिळविणारे असे राजपुरुष निवडून त्यांच्या उतार वयांत त्यांस५०० रुपये बैठा पगारही व्हावा, अशा योग्यतेस चढले होते. परंतु त्यांची मनोरचना स्वतंत्रवाण्याची अशी असल्यानें तो मार्ग चोखाळ्याचें पाप त्याजकडून झालें नाहीं.

ह्या सुमारास इंग्रजीज्ञानानें दिपलेल्या महाराष्ट्रास तशाच स्थितींतून जागा झालेला असा एक धड डोळ्याचा वाटाड्या लाभला. हा वाटाड्या म्हणजेच आधुनिक महाराष्ट्राचा प्रवृत्तिमार्गीतील परात्पर गुरु जो विष्णु शास्त्री चिपळूणकर तो होय. हा गृहस्थ आपल्या प्रत्युत्पन्नमतित्वानें बृहस्पति ह्या टोपण नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या कृष्णशास्त्री चिपळूणकरांचा पुत्र होय. हाही इंग्रजींत पदवीधर असून वडिलांच्या शिकवणीनें व आग्रहानें रुपेरीशृंखलेंतच मिरवत होता. वडीलपणाच्या अधिकारानें रुपेरी शृंखलांनीं अलंकृत झालेला पाहाण्यास बळवंतरावांचें वडीलच ह्या वेळीं नव्हतें. इंग्रजी शिक्षणरूपी वाघिणीच्या दुधानेंही विष्णुशास्त्री चिपळूणकरांना इंग्रजी रुपेरीशृंखलांचें रुपणें सहज सोसावें इतका कणखरपणा प्राप्त झाला नाहीं; त्याचप्रमाणें तो अनिष्ट कणखरपणा किंवा चांबटपणा विष्णुशास्त्री यांच्या बळवंतरावादि कित्येक समकालीनांतही शिरला नाहीं, हेंच त्या अजून भावी अशा महाराष्ट्र महोदयाचें शभ चिन्ह ! विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि बळवंतराव हे सहाध्यायी नव्हत. परंत गोपाळराव अगरकर आणि बळवंतराव हे सहाध्यायीच होत. परीक्षापार झाल्यावर पुढें काय करावयाचें ह्यासंबंधानें ह्या दोघांचे विचार बरेच किंबहुना तंतोतंत जुळत. बळवंतराव वकीळीचा आणि गोपाळराव कलापति (एम्. ए.) त्वाचा अभ्यास करीत असतांना दोघांचा परस्पर विचारविनियम दृढ होत गेला. दोघांमधें कधीं राजकीय, कधीं सामाजिक, तर कधीं धर्मविषयांवर बोळणें चाले. पहिल्या विषयासंबंधानें दोघांची तेव्हांच एकवाक्यता होई; तशी सामाजिक व धार्मिक बिषयांसंबं-

धानें होत नसे. ह्यासंबंधांत ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी होय कीं, गोपाळरावांचें वाचन विशेषतः इंग्रजींतूनच तेवढें झालें असल्यानें त्यांच्या विचारांचा ओघ आणि कल्पनांची वाढ त्याच दिशेनें विशेष व्हावी, आणि बळवंतरावांच्या वाचनांत स्वशास्त्रग्रंथांचीही बरोबरीनें भर असल्यानें त्यांचा ओढा आपल्या परंपरागत धार्मिक व सामाजिक आचार विचारांशीं सहजच अधिक मिळवा हेंच उचित. त्या वेळच्या अशा प्रकारच्या वादविवादप्रसंगीं बळवंतरावांनीं एकदां असे उद्गार काढिले कीं "ह्या इंग्रजी शिक्षणानेंच आमचा स्वाभिमान नष्ट झाला. त्यामुळेंच विलायती व्यापाऱ्यांचें उखळ पांढरें झालें. आमचा धर्माभिमान गळाला; धैर्य पळालें. कोणीही आम्हांस तुच्छ लेखावें आणि त्या गोऱ्यांची अरेरावी मात्र सारखी वाढत जावी. आमची बुद्धिमत्ता, कल्पकता, उमेद, साहसप्रियता इत्यादि सर्व सद्गुणांची पार माती झाली. ते जळून भस्म झाले ! तेव्हां ज्ञानसंपादन सर्व स्वभाषेंतूनच व्हावें. अनिर्वाहप्रसंगीं उपयोगी पडण्यापुरतें इंग्रजी भाषेचें ज्ञान असलें ह्मणजे पुरे. मुसलमानी राज्यांत कुठें त्यांच्या भाषेंतूनच मिळणाऱ्या शिक्षणावांचून आमचें अडलें होतें? तेव्हांहीं स्वभाषांतूनच ज्ञान संपादून आम्हीं त्या राजावादशहांच्या दिवाणगिऱ्याही नाहीं का चालवूं शकलों ? एक भाषा आणि ती आपली मातृभाषा उत्तम येत असली म्हणजे बस ! सर्व भरतखंड यवनाक्रांत झालें असतांही श्रीछत्रपति शिवाजी महाराज आणि श्रीरामदास ह्यांनीं स्वधर्म आणि स्वराष्ट्र त्यांचा पूर्णोद्धार, एकटचा आपल्या मराठी भाषेंतूनच मिळविलेल्या ज्ञानाच्या बळावरच, नाहीं का घडवून आणिला ? भट पेशव्यांचें किंवा फडणीस भानूंचे पराक्रम काय आरबी, फारशी, किंवा इंग्रजी व फ्रेंच ह्या भाषांच्या ज्ञानाभावानें थिजून राहिले ? सारांश, इंग्रजीद्वारा ज्ञानसर्वस्व मिळविण्यासाठीं आह्मी जी माथेफोड सध्यां करीत सुटतों तीच आमच्या शारिरीक व मानसिक दौर्बल्यास कारण आहे." बाल गोपाळांच्या वादाचें स्वरूप वरील प्रकारचें असे.

विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यावेळीं निबंधमाला काढीत असत. मालेच्या ३० व्या अंकांत त्यांनीं इंग्रजग्रंथकारांचा चांगलाच खरमरित समाचार घेतल्यामुळें येथील अँग्लोइंडियनांत बराच क्षोभ माजला. एका नेटिव्हानें, क्षुद्रशाळामास्तरानें, इंग्रजसरकाराच्या बंद्या गुलामानें, ज्याचा बापही सरकारीच पगार खातो असल्या पिढीजाद सेवकानें हें असें खाल्लयाघरचे वासे मोजण्याचें धाष्टर्य करावें ! कोण हें अक्षम्य साहस ! ! अशा या राजद्रोहास चांगलेंच प्रायश्चित्त भोगावयास लाविलें पाहिजे. ह्यासंबंधानें बॉंबेगॅझेटमध्यें पत्रव्यवहार सुरूं झाला. ती हकीकत मोठी चित्तवेधक आहे. तरी येथें देतां येत नाहीं. कारण ह्या लेखाची मर्यादा संपत आली आहे. मालाकारांनीं गॅझेटांतील पत्रव्यवहारास उत्तरही सणसणीत दिलें. ते एखाद्या लटपटित हीनस्वत्वाप्रमाणें मूग गिळून बसले नाहींत. गॅझेटांत 'एलिफास' नांवानें

पत्रव्यवहार करणारा हा गृहस्थ मालाकारांच्या टीकास्त्रानें अनेक वेळ घायाळ झालेला असा कोणी एक महाराष्ट्रीयच ' कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ' ह्या वर्गांतील दुट्टाचार्य होता; आणि मालाकारांनीं, तो कोण असावा, तें ओळखिलेंही होतें. तथापि त्यांनीं त्याची स्पष्ट ओळख वाचकांस होऊं दिली नाहीं.

विष्णुशास्त्र्यांनीं रुपेरीशृंखला तोडण्याचें ठरविलें. ही वार्ता बाळगोपाळांसही कळली. त्रिवर्गांचा पत्रव्यवहार सुरूं झाला. गोपाळरावांनीं एकदम उच्च शिक्षणाचें पीठ (कालेज) काढण्याचें सुचविलें. त्यावर ' स्तनंधयानें त्याच अवस्थेंत पुत्रवान् होण्याची इच्छा करण्यासारखी आगरकरांची आकांक्षा अव्यवहार्य आहे ' असें विष्णुशास्त्री यांचें मत पडलें. तरी, थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं, विष्णुशास्त्र्यांन चाकरी सोडिली. आणि शके १८०१ च्या कार्तीकानंतर सन १८८० च्या प्रारंभास त यांनीं पुणें येथें नवी इंग्रजी शाळा स्थापन केली. त्यांस बळवंतराव टिळक वकीलीचा अभ्यास चालूं असतांच हंगामी म्हणून येऊन मिळाले व ते वकीलीची सनद मिळाल्यावरही कायमच जडले. गोपाळराव आगरकर, एम्. ए. च्या परीक्षेंत फसगत झाल्या मुळें त्यांस येऊन मिळण्याचें लांबणीवर पडलें. पुढें यथाकालीं तेही मिळालेच. पढें दुसरेच वर्षी केसरी आणि मराठा हीं वर्तमानपत्रें ह्या मंडळींनीं काढिलीं. चित्रशाळा, किताबखाना हींही विष्णुशास्त्र्यांच्याच उद्योगानें सुरू झालीं. त्याचप्रमाणें काव्येतिहाससंग्रह मासिकपुस्तकही त्यांच्याच प्रेरणेनें प्रचलित झालें. ह्याप्रमाणें शके १८०१-२ ह्या वर्षीं ह्मणजे दुसऱ्या बाजींनीं इंग्रजांस घरजांवई करून घेतलें त्या कालास पाऊणशें वर्षें होतात न होतात तोंच परमेश्वर कृपेनें, ज्या भावी महाराष्ट्रमहोदयाचे प्रभात किरण आज अत्युच्च गिरिशिखरांवरून किंवा ताळशाल्मलीवृक्षांच्या अग्रांवरच केवळ भासत आहेत व जे लवकरच सर्व देशभर घरोघरच्या अंगणापरसांतूनही त्याच परमेश्वराच्या कृपेनें विहार करावयास लागतील, त्या महोदयाची मुहुर्तमेढ विष्णुशास्त्र्यांच्या सहकारितेनें बळवंतरावांनीं दृढ पायावर खोल रचिली.

उषःकाल मालाकारांनीं आंखून दिलेल्या मर्यादेचा अतिक्रमही झाला म्हटलें तरी चालेल. टिळकांच्या बालपणांतील पुष्कळ गोष्टी लिहिण्यासारख्या आहेत. बालटिळक हा गुणसागर आहे. उत्तम गणिती, उत्तम वय्याकरण, उत्तम मार्मिक, संस्कृतकाव्यज्ञ, आणि कोणास खरेंही वाटणार नाहीं, परंतु, बालटिळक हा संस्कृत मराठी असा सव्यसाची कवीश्वरही होता. ह्या बालानें शके १७९५ त आपल्या वयाच्या सतराव्या वर्षीं संस्कृत कविता लिहून सुप्रसिद्ध संस्कृत पंडित जिनसीवाले यांजकडून धन्योद्गार आणि प्रशंसापत्र मिळविलें त्या कवितांचा थोडासा नमुना खालीं देण्यांत येत आहे.

मातृविलाप.

प्रसमीक्ष सुतं गुणालयं । विधिना संहृतजीवितं पुरा ॥
जननी निपपात दुःखिता । धरणौ मोहवशं गता भृशम् ॥ १ ॥
बत ! हास्मि हता विधे त्वया । तनयस्यासुहृता न मे पुनः ॥
रविणा सरसि प्रशोषिते । ननु जीवेच्छफरी तदाश्रया ॥ ३ ॥
पितरौ प्रथमं ततः सुतौ । हननस्य क्रम एष भो विधे ।
तनयः प्रथमं कथं त्वया । ममनीतः प्रतिकूल चारिणा ॥ ४ ॥
उपचारशतैर्विवर्धितः । प्रतिपच्चंद्र इवासि निर्गतः ॥ ५ ॥
बहुकालमहो ! न संस्थितिम् । सुतचाप्त्वा न कलासुवर्धनम् ॥
सकलैः सुजनै प्रदोक्षितः । प्रथमसूचितभाविवैभवः ॥
सहसैव दवाग्निना हतः । सुत बीजांकुरवद्गतो भवान् ॥ ६ ॥
न भवान् भवनाब्दहिर्गतोऽ । नुमतिं प्राप्य कदापि नो मम ॥
अधुना परिहाय मां कथं । सुत ! नापृच्छय दिवं प्रयास्यसि ॥ ७ ॥
गृहकर्मणि रक्तमानसा । मशितव्यं न विलंब्य देहि मे ।
अयि पुत्रक ! को वदेदिदं । वचनं संप्रति मां गते त्वयि ॥ १६ ॥

अशाप्रकारच्या २० श्लोकांचें हें प्रकरण आहे. ह्यांतील शेवटील श्लोक संस्कृत महाकविसंप्रदायानुसारें भिन्न वृत्तांत आहे तो असा—

बाष्पोदकेन नितरामभिषिच्यमान–। स्तस्या न शोकदहनो निरतो हृदिस्थः ॥
प्रावर्ततााधिकतरं स पुनः प्रदीप्तो । निक्षेपितो जलनिधाविव वाडवाग्निः ॥ २० ॥

अशाप्रकारची साधनसंपत्ति घेऊन बालटिळकानें आपलें सर्व यौवन आणि प्रौढवय हीं जन्मभूमाउलीच्या सेवेंत सर्वस्वीं खर्च केलीं; आणि तिला पारतंत्र्यपंकांतून लवकरच वर डोकें काढितां यावें असा मनू आज आपल्या भगीरथ प्रयत्नानें आणून दिला आहे. त्या आपल्या बाळाच्या, तिहीं लोकीं–आशिया यूरोप आणि अमेरिका अशा तिन्हीं खंडांत–झेंडा फडकविणाऱ्या बाळाच्या मृतीनें तिला जो शोक झाला आहे त्याचें वर्णन वरील बाळटिळकाच्या 'मातृविलाप'नामक संस्कृत काव्यांतीलच कल्पनेनें खालील आर्येंत गोवून हा लेख संपविण्यांत येत आहे.

बाळमृतीनें भडके शोकाचा राष्ट्रभूहृदीं वणवा ।
कोट्यवधि जनाश्रुजलें न शमे तो दीप्ति घे परंतु नवा ॥ १ ॥

' अवतार समाप्ती !'

" नव्या संकटीं नव्या दमाचा नवीन संदेश
द्याया राष्ट्रा प्रभू घेतसे नवे नवे वेष !"....कर्मवीर काव्य.

\+ × ×

काळिज चिरलें कसें चरचरा ! उरांत शिरलीं सुरी !
वैधव्याची अभद्र छाया पडली मातेवरा ! १
धाय मोकले, रडे, ओरडे भारत-देवी कशी
निर्दयतेनें बळी घेतला बाळाचा दृष्टदिशीं ! २
कसाब हातीं सांपडलेली गौ पाही, कळवळे
गो-ब्राह्मण-प्रतिपालक श्रीशिव सहजी ज्याशीं तुले ! ३
निजदेहाचा बळी अर्पिला महाराष्ट्र-रक्षणीं
सुखें लोकगंगोदकीं शिरे थोर तीर्थ मानुनी ! ४
सर्वस्व-दानता परंपरा चालवि जो कलियुगीं
रहस्य-बांधक कृष्ण लोपतां कसें रहावें उगी ? ५
महाराष्ट्र-स्वातंत्र्याच्या जो भालीं ये पंजर
तोडुन टाकाया धडपडला साऱ्या आयूभर ! ६
पूर्व वैभवाची ओळख जो पटवी पुरतेपणीं
हिंदवी स्वराज्याच्या ध्वनितें घुमवी खोऱ्यांतुनी ! ७
उघड्या नयनीं परिस्थीतीच्या भयाण भिंतीवरी
टक्कर मारी पुन्हा पुन्हा जो, म्हणती त्या केसरी ! ८
भरल्या पुरल्या संसाराची रांगोळी कांडुनी
मातृभूमिचा पाट थाटवी जगताच्या अंगणीं ! ९
मुक्या मनानें कसें करावें कृष्णा तव वर्णन ?
दुःखित भाषा शब्द न ह्मणुनी येती ते धावुन ! १०
कृतज्ञतेच्या अश्रूंनीं तुज वर्णिल अजची पिढी
देशाभिमान गंगा स्मरणें वाहिल दोन्ही थडी ! ११
तिच्या तिरावर गर्जूं ' हरहर महादेव' गजर !
रणवाद्यांतें बडवूं ! उठवूं शस्त्रांचें मखर ! १२
रण भेरीच्या रणनादानें साग्र तुझें वर्णन
होइल केवळ ! कशास शिणवूं फोल गीत गाउन ! १३

कवि-' केशवसुत.'

फोटो. एन्. व्ही. वीरकर.]
The Manoranjan Press, Bombay.

लो. बा. गं. टिळक.

[ऑगस्ट. १

आगस्ट १९२०.] लो. बाळ गं. टिळक. [उषःकाल.

नवरत्नांचा हार.

(लेखक—**दत्तो अप्पाजी तुळजापुरकर. बी. ए. एलू. एल्. बी.**)

'**टिळक** गांधीप्रमाणें शांत वृत्तीचे किंवा मदनमोहन मालवीयप्रमाणें गोड स्वभावाचे असते तर त्यांच्यामध्यें कोणत्याहि प्रकारचें वैगुण्य मुद्दाम शोधून पहाणा-रालाहि आढळून आलें नसतें,' असे उद्गार एका मोठ्या गृहस्थानें एका वादाचे प्रसंगीं काढले होते. मी त्यावेळीं तेथें होतों. मी त्यांना उत्तर दिलें 'एवढ्यानें तुमचे' किंवा टिळकांच्या अंगचे दोष दाखविणारांचें समाधान होईल असें मला वाटत नाहीं. टिळक वर्णानें काळे आहेत, त्यांना चहाचें व्यसन आहे, ते सुपारी फार खातात. याहि गोष्टी टिळकांचे दुर्गुण म्हणून तुम्हांला दाखवितां येतील. काळ्या वर्णाचा अंत-र्भाव दुर्गुणांत होत नसला तरी वैगुण्यांत खास होईल. टिळक काळे नसून सुस्वरूप असते तर एखाद्या राजबिंड्याप्रमाणें त्यांच्या स्वरूपाचीहि तारीफ करण्यांत आली असती, ते चहाला स्पर्श न करणारे असते तर चहा न पिणाऱ्याचा काय, पण पिणा-ऱ्यांनीं सुद्धां त्यांची स्तुति केली असती, आणि त्यांना सुपारी खाण्याचें व्यसन नसतें तर त्यांच्या खऱ्या सद्गुणांत आणखीहि एका **निरूपयोगी** सद्गुणाची तुम्हीं खात्रीनें भर टाकली असती.'

मुलामुलींच्या सक्तीच्या शिक्षणाबद्दल पुण्यास जी कांहीं दिवसांपूर्वी वादाची धुमश्चक्री उडाली होती, त्यावेळच्या प्रसंगाला उद्देशून वरील संवाद झाला होता. यांतील विनोदाचा भाग जरी बाजूला ठेवला तरी शांतवृत्तीचे रानडे किंवा गांधी अथवा आपल्या मधुर भाषणानें कोणालाहि अप्रिय न होणारं मदनमोहन मालवीय-यांच्याशीं तुलना करून टिळकांच्या सद्गुणमालिकेंत थोडेंसें वैगुण्य दाखविणारे बरेचसे विद्वान् गृहस्थ आपल्याला आढळून येतात, ही गोष्ट कांहीं खोटी नव्हे. सदरील गृहस्थांत सर्वच कांहीं अप्रामाणिक बुद्धीचे किंवा लोकमान्याचे प्रतिस्पर्धीच आहेत असें आपल्याला म्हणतां येणार नाहीं—पुष्कळ लोकांची तशी प्रामाणिक समजूत आहे. पण त्यांत विशेष काय आहे हेंच खरोखर समजत नाहीं. टिळक न्या. रानड्यांप्रमाणें 'शांतिब्रह्म' नसतील,—नव्हते. असें मीहि सदरील 'प्रामाणिक' लोकांप्रमाणें 'प्रामाणिकपणानें' म्हणतों. ते शांतिब्रह्म नव्हते किंवा एका प्रसिद्ध विनोदी लेखकानें म्हटल्याप्रमाणें 'खडवडीत सह्याद्रीपर्वतासारखे ते 'रगेड् पॉलिटिशन् होते असेंहि आपण म्हणूं. पण यामुळें त्यांच्या खऱ्या योग्यतेंत काडीचाहि कमीपणा येत नाहीं-काळ्यावर्णाच्या ऐवजीं ते गोऱ्यावर्णाचे असते तर जशी त्यांच्या शारीरिक वचनांत कांहींहि वाढ झाली नसती, तशीच स्वभावाच्या शांतपणामुळें किंवा मऊपणामुळें त्यांच्या सद्गुणांचें वचन एक गुंजभरहि जास्त वाढलें नसतें !

दोन मोठ्या व्यक्तींची अशा रीतीनें तुलना करणें हेंच आधीं असमंजसपणाचें आहे. सूर्य, चंद्राप्रमाणें शांत नाहीं किंवा चंद्र सूर्याप्रमाणें तेजस्वी नाहीं हें दोषाविष्करण जितकें हास्यास्पद ठरेल तितकेंच टिळक, रानडे, गांधी, मदनमोहन किंवा लजपतराय असल्या थोर विभूतींच्या अंगीं हमखास आढळून येणाऱ्या विरोधी गुणांच्या आधारावर परस्परांचे दोषाविष्करण करणें हास्यास्पद होईल. अशी तुलना करणाऱ्या गृहस्थांना ' गुण ' आणि ' सद्गुण ' यांतील फरक समजला नाहीं असें म्हणावें लागतें. साखरेची गोडी हा साखरेचा गुण आहे, सद्गुण नव्हे. आणि गुलाबाचा सुगंधहि त्याचा सद्गुण नव्हे. अत्यंत पवित्र अशा स्त्रियाच्या पातिव्रत्याला धुतल्या तांदळांच्या स्वच्छतेची उपमा देतात, म्हणून त्या तांदळांच्या अंगी पातिव्रत्याच्या सद्गुणाचा वास थोडाच असतो ! मनुष्याची खरी किंमत गुणावर नसून सद्गुणावर असते–टिळकांचा काळा वर्ण हा जसा त्यांच्या शरीराचा गुण तसाच त्यांचा तामसी स्वभाव हा त्यांच्या स्वभावाचा गुण. तामसी स्वभाव ' हा स्वभावतःच कांहीं दुर्गुण नव्हे किंवा सद्गुणाचा अभावही नव्हे. त्याचप्रमाणें रानड्यांचा शांत स्वभावहि स्वभावतःच सद्गुण नव्हे. दोघांनाहि आपल्या अंगच्या ह्या गुणांचा वेळीं उपयोगहि झाला व प्रसंगोपात् त्यापासून त्रासहि झाला असेल. ह्या त्यांच्या अंगच्या गुणामुळें खऱ्या सद्गुणाला जर हरताळ लागण्याचा प्रसंग आला असता तर मात्र हे त्यांचे गुण त्यांच्या अंगचे दोष म्हणून पुढें मांडतां आले असते. टिळकांचा मोठेपणा हा त्यांच्या अंगीं असणाऱ्या एखाद्या विशिष्ट सद्गुणावरच अवलंबून होता असें म्हणतां येणार नाहीं–पुष्कळसा सद्गुण रत्नांचा हार त्यांचे गळ्यांत असल्यामुळें त्यांना वैशिष्ट्य आलें होतें. विशिष्टसद्गुण विशिष्टरत्नाप्रमाणें कितीहि तेजस्वी असले, तरी एक एक रत्नाचा जसा हार होत नाहीं. तसा एखाद्या विशिष्ट सद्गुणामुळें टिळकांनाहि टिळकपणा येत नाहीं. विशिष्ट सद्गुणांचा **समुच्चय** म्हणजे टिळकपणा त्यांचें आपल्या देशावर अलोट प्रेम होतें. पण त्यांच्यापेक्षांहि देशावर जास्त प्रेम करणारे लोक आपल्याला सांपडणार नाहींत असें नाहीं. मूर्खपणानेंच कां होईना, पण देशाकरितां स्वतःचा बळी देणाऱ्या गृहस्थाची देशभक्ति–भक्ति किंवा प्रेम एवढ्याच दृष्टीनें विचार केला तर टिळकांच्या देशभक्तीपेक्षां खात्रीनें जास्त सरस ठरेल; सती जाणें ही गोष्ट इतर दृष्टीनें कितीहि अव्यवहार्य, अननुकरणीय किंवा त्याज्य असली तरी प्रेमाच्या किंवा भक्तीच्या दृष्टीनें तिची उज्वलता अनन्य सामान्य आहे यांत संशय नाहीं–त्याचप्रमाणें देशभक्तीनें थबथबलेल्या अंतःकरणाचीं माणसें सामान्यलोकांतहि आपल्याला बरीचशीं आढळून येतील. परंतु त्यांपैकीं एकहि टिळक होऊं शकत नाहीं. त्याचें कारण देशभक्ति हा एकच गुण किंवा सद्गुण टिळकांचे अंगीं नव्हता. हिरा असला तरी तो कोंदणांत ठेवला तर त्याची शोभा.

टिळकांचा दुसरा मोठा सद्गुण म्हणजे त्यांचें खाजगी शुद्धवर्तन–'मन हें ओढाळ गुरूं परधनपर कामिनीकडे वाहें' हें अगदीं खरें आहे. व या बाबतींत निष्पाप असणाऱ्या माणसाला लोक नेहमींच पूज्य मानतात. परंतु टिळकांना टिळकपणा जो आला आहे, तो केवळ ह्याच सद्गुणामुळें आला आहे, असें म्हणतां येणार नाहीं; परस्त्रीकडे ढुंकूनहि न पाहणारे व परद्रव्याचा अभिलाष न धरणारे असे किती तरी लोक आपल्याला या हिंदुस्थानदेशांत आढळून येतील. पंढरपुरचा एखादा गरीब वारकरी, खेड्यांतला एखादा गरीब शेतकरी किंवा मुंबईच्या रस्त्यांवर पोटाकरितां हमाली करणारा एखादा गरीब हमाल-हेहि पुष्कळ वेळां तुमच्या आमच्यापेक्षांच काय पण प्रत्यक्ष टिळकांच्यापेक्षांहि या बाबतींत जास्त प्रामाणिक आहेत असें आपल्याला आढळून येईल. हमालाचा प्रामाणिकपणा किंवा एखाद्या गरीब वारकऱ्याचें शुद्धवर्तन हें टिळकांच्या प्रामाणिकपणापेक्षां किंवा शुद्धवर्तनापेक्षां कमी किंमतीचें आहे, असें आपल्याला म्हणतां येईल काय? पण टिळकांना या बाबतींत जें महत्व आलें आहे तें त्यांच्या या सद्गुणाचा हिरा इतर सद्गुणांच्या कोंदणांत बसवला गेला आहे म्हणून? आधुनिक सुशिक्षित मंडळींत हे गुण दुर्लभ असतात हेंहि खोटें नाहीं. व त्यामुळेंच टिळकांच्या या सद्गुणाला विशेष किंमत आली आहे, हेंहि कांहीं अंशीं खरें आहे–इतर सर्व बाबतींत अत्यंत श्रेष्ट असणाऱ्या कांहीं पुढाऱ्यांचें स्त्रियांच्या बाबतींतलें वर्तन अत्यंत निंद्य व गर्हणीय असल्याचें आपल्या दृष्टोत्पत्तीस आलें आहे. 'आपल्याला त्यांच्या खाजगी वर्तनाशीं काय कर्तव्य आहे' असें म्हणून आपण त्यांच्या ह्या किळसवाण्यादुर्गुणाकडेहि कानाडोळा करितों तें केवळ आपद्धर्म म्हणून. अशाहि कांहीं सुशिक्षित गृहस्थाकडे आपल्याला बोट दाखवतां येईल कीं, दुसऱ्यांच्या ठेवी गडप करणें किंवा सार्वजनीक पैशाची अफरातफर करणें याची त्यांना यत्किंचित्हि शरम वाटत नाहीं–गोष्ट वाईट आहे. पण कबूल करणें भाग आहे कीं, अशिक्षित गरीब, अडाणी लोकांपेक्षां सुशिक्षित लोकांतच ह्या दुर्गुणांचें प्राबल्य जास्त आढळून येतें–कदाचित् त्यांच्या तरतरीत बुद्धीच्या प्रबल ओघाला बंधारा घालणें नीतितत्वांना कठीण जात असेल. पण ही गोष्ट सत्य असली तरी सुशिक्षित लोकांतहि कांहीं लोक असे खात्रीनें आढळून येतील कीं, ज्यांचें खाजगी वर्तन टिळकांसारखेंच धुतल्यातांदळांप्रमाणें किंवा परीटघडीप्रमाणें स्वच्छ आहे. रानडे, गांधी यांची उदाहरणें जरी घटकाभर बाजूला ठेवलीं तरी टिळकांप्रमाणेंच खाजगी वर्तनाच्या कामांत आदर्शभूत होणारीं रावबहादुर जोशी, प्रो कर्वे, विजापुरकर यांच्यासारखीं माणसें आधुनिक सुशिक्षित समाजांत फार नाहीं, तरी कांहीं तरी खात्रीनें सांपडतील. परंतु यापैकीं कोणीहि टिळक होऊं शकले नाहींत. याचें कारण टिळकांचा टिळकपणा एखाद्या विशिष्ट सद्गुणांत नाहीं.

टिळकांचा तिसरा मोठा सद्गुण म्हणजे स्वार्थत्याग-पण, त्यांच्या स्वार्थ त्यागापेक्षांहि जास्त किंमतीचा स्वार्थत्याग करणारी मंडळी महाराष्ट्रांतच आपल्याला अनेक दाखवतां येतील. फार लांब कशाला ? टिळकांच्या बरोबरच स्वार्थत्याग करण्यास तयार झालेले विष्णुशास्त्री किंवा आगरकर यांचा स्वार्थत्याग टिळकांच्या स्वार्थ त्यागापेक्षां काडीभरहि कमी नव्हता; प्रो. कर्वे, किंवा प्रि. परांजपे यांचाहि स्वार्थत्याग कमी प्रतीचा आहे, असें आपल्याला म्हणतां येणार नाहीं. देशाकरितां किंवा धर्माकरितां आपलें सर्वस्वदान करणारे गृहस्थहि आपल्याला आढळून येतील. घरावर तुळशीपत्र ठेवून जन्मभर अयाचित वृत्तीनें राहणाऱ्या सद्गृहस्थांचा स्वार्थत्याग बिनमोल असतो यांत शंका नाहीं; परंतु असा बिनमोल स्वार्थत्याग करणारा गृहस्थहि टिळकांच्या इतका लोकमान्यतेस चढला नाहीं; याचें कारण स्वार्थत्याग एवढेंच कांहीं टिळकांचें भांडवल नव्हतें.

त्यांचा चवथा मोठा गुण म्हणजे विद्वत्ता-पण केवळ विद्वत्तेमुळें मग ती कितीहि अलौकिक किंवा अगाध असो. टिळकांना टिळकपणा आला होता हें म्हणणें खोटें आहे. अलौकिक बुद्धिमत्तेमुळें किंवा विद्वत्तेमुळें मनुष्य खऱ्या लोकमान्यतेस चढत नाहीं हें बेकनसंबंधानें पोप कवीनें जें मार्मिक उद्गार काढले आहेत, त्यावरून सहज दिसून येईल— अलौकिक विद्वत्ता आणि कमालीचा नीचपणा ह्या दोन्हींचें बेमालूम मिश्रण बेकनमध्यें आढळून येत होतें. नुसत्या बुद्धिमत्तेचाच विचार केला तर रानडे टिळकांपेक्षां जास्त बुद्धिमान होते यांत शंका नाहीं. स्वतः टिळकांनींच त्यांनां ' सर्वज्ञ सहि माधवः ' अशी पदवी दिली होती. विद्वत्तेंतहि टिळकांना मागें सारणारे विद्वान् लोक कांहीं कमी नाहींत, गणित, ज्योतिष-संस्कृत, या त्यांच्या आवडत्या विषयांतहि त्यांच्याशीं बरोबरी करणारे गृहस्थ महाराष्ट्रांतच कितीतरी सांपडतील-आम्हीं डेक्कन कॉलेजमध्यें असतांना संस्कृतांत टिळक श्रेष्ठ का भांडारकर श्रेष्ठ ' असा एकदां वाद निघाला होता. कॉलेजच्या विद्यार्थ्यांचाच तो वाद, तेव्हां त्यांत साहजिकच दोन पक्ष झाले होते.-आम्हीं अर्थातच टिळकांच्या बाजूचे होतों, शेवटीं कॉलेजांतील संस्कृत शास्त्रीबोवांपर्यंत तें प्रकरण गेलें. त्यांना टिळक भांडारकर दोघांचीहि माहिती होती-परंतु त्यांनीं आपला निर्णय भांडारकरांच्या बाजूनें दिला, आम्हांला साहजिकच थोडें वैषम्य वाटलें. तेव्हां एकदां संधि साधून आम्हीं त्याबद्दल टिळकांनाच प्रश्न केला. ' मला संस्कृत भाषेचीं केव्हांहि ' डिफिकल्टी ' आली कीं मी प्रथम भांडारकरांकडे जातों, यावरून संस्कृत चांगलें कोणाचें याचा तुम्हींच निर्णय करा. ' असें मार्मिकपणाचें उत्तर देऊन त्यांनीं आमचीच फजीति केली ! संस्कृतांतील प्राविण्याबद्दल डॉ. भांडारकर, बाबासाहेब पेंडसे वगैरे मंडळीबद्दल त्यांना अत्यंत आदर होता. लेखक या दृष्टीनें त्यांची योग्यता फार उच्चदर्जाची होती. वर्तमानपत्रांतील भाषेला नवीन वळण त्यांनीं लावलें—परंतु याहि बाबतींत त्यांच्या वरहि मात करणारे गृहस्थ

त्यांच्याच शिष्यवर्गांत उत्पन्न झाले आहेत. केसरींतील केळकरांचे कांहीं लेख टिळकांच्या लेखापेक्षांहि जास्त सरस वठलेले आहेत. दिल्ली दरबारच्या वेळेस दिल्लीवर लिहिलेला केळकरांचा केसरींतील अग्रलेख ह्या गोष्टीची साक्ष कोणालाहि पटवील. पुष्कळ वेळां असें प्रसंग आले आहेत कीं, केसरींतील केळकरांनीं लिहिलेल्या लेखांची टिळकांचे लेख म्हणून तारीफ करण्यांत आली होती, व स्वतः टिळकांनीं लिहिलेले कांहीं लेख लोकांना नीरस वाटल्यामुळें त्याची जवाबदारी केळकरांवर ढकलली गेली होती. केसरींत एक दोन आठवडे कडक किंवा चुरचुरीत लेख न आले तर केसरी शिळपट झाल्याबद्दल तक्रारीचीं पत्रें लोकांकडून खुद्द टिळकांकडेहि जात असत--एकादां एक गृहस्थ अशीच तक्रार घेऊन त्यांच्याकडे गेले होते, व केसरी दुसऱ्याच्या हातांत देऊं नये अशी त्यांनीं त्यांना विनंति केली. त्यावर टिळकांनीं त्यांना उत्तर दिले कीं गेल्या महिन्यांतील सबंध केसरीचे अंक माझ्याच हातचे आहेत. ते जर तुम्हांला पसंत नाहींत तर केसरी दुसऱ्याच्या हातांत देणें हाच एक मार्ग मला प्रशस्त वाटतो! नेहमीं चुरचुरीतपणा किंवा खमंगपणा आणायचा कोठला?' टिळकांच्या भाषेपेक्षां आगरकरांचीं भाषा थोडी निराळ्या वळणाची असली तरी जास्त परिणामकारक अशी होती. विनोदी, काव्यमय, छद्मी किंवा खोंचदार लेख लिहिण्याकडे टिळकांची प्रवृत्ति फार कमी अस. किंबहुना त्यांच्या सडेतोडे भाषेच्या सरळ ओघाला ही खोंचदार वळणें साधतच नसत—लेखक या दृष्टीनें त्यांची बरोबरी करणारे बरेचसे लेखक महाराष्ट्रांत आजमित्तीसहि आढळून येतील. पुष्कळवेळां टिळकांचा लेख किंवा टिळकांचें भाषण, तें टिळकांचें आहे, याचमुळें लोकांना आवडत असे. म्हणजे त्या लेखामुळें किंवा भाषणामुळें टिळकांना महत्व आलेलें नसून टिळकांच्यामुळें त्यांना महत्व आलें होतें!

ज्या बद्दल टिळकांची अत्यंत स्तुति करण्यांत येते. ते त्यांचे दुसरे मोठे दोन गुण म्हणजे धैर्य आणि करारीपणा—संकटें कितीहि आलीं तरी त्यांना डगमगायचे नाहीं आणि एकदां जी गोष्ट हातीं घेतली ती शेंडी तुटो कीं, पारंबी तुटो या न्यायानें कडेला नेल्याशिवाय राहावयाचें नाहीं, हे सद्गुण फार मोठ्या किंमतीचे आहेत यांत शंका नाहीं. ह्या बाबतींत बोलणें जितकें सोपें आहे तितकेंच हातांतून कृती घडून येणें कठिण आहे. नुसत्या दोन शब्दाच्या माफीवर कारागृहवास चुकवतां येण्यासारखा असूनहि माफी न मागायास प्रवृत्त होणें हें लहानसहान धैर्याचें काम नव्हतें. आणि त्यावेळीं मी मी म्हणणारे लोकहि प्रसंग आल्याबरोबर माफी मागून मोकळे झाले. माफी मागणें हें महापातक आहे असें नाहीं व टिळकहि असें समजत नसत. केव्हां आणि कशाकरितां माफी मागावयाची हा महत्वाचा प्रश्न आहे. जाणून बुजून प्रदर्शित केलेल्या मताबद्दल किंवा भाषेच्या कडकपणाबद्दल भीतीनें किंवा लोभानें माफी मागण्यास प्रवृत्त होणें हें त्यांच्यामतें अत्यंत हीनपणाचें लक्षण होतें, व पुढाऱ्या-

वर तर त्या बाबतींत फार मोठी जबाबदारी आहे असें ते नेहमी म्हणत असत. पण चुकीच्या ' फॅक्टस ' बद्दल माफी मागूं नये असें त्यांचें मत नव्हतें. १८८१ सालीं कोल्हापुर प्रकरणांत एका लबाड माणसानें आपल्या स्वतःच्या फायद्याकरितां एक खोटें पत्र तयार करून त्यांचे जवळ दिलें होतें व त्या पत्राच्या आधारावर केसरींतील लेखांत कांहीं विधानें करण्यांत आलीं होतीं. पुढें खटल्याच्या वेळेस त्या पत्राचा खोटेपणा नजरेस आल्यावर त्याबद्दल माफी मागण्यास ते तयार झाले. सरकारच्या आग्रहामुळें बव्र्यांना ती माफी स्वीकारतां आली नाहीं हा भाग निराळा. परंतु माफी न मागण्याच्या कामांत टिळक आग्रही असले तरी दुराग्रही खास नव्हते. एवढें ह्या उदाहरणावरून उघड दिसून येईळ. माफी न मागणें व आपल्या मताचा हट्ट धरून त्या करितां तुरंगांतले हाल सोसण्यास तयार होणें ह्यागोष्टी सामान्य नव्हेत परंतु महाराष्ट्रांत दुसऱ्याही कांहीं व्यक्ति आपल्याला अशा सांपडतील कीं, त्यांनींही अशा प्रसंगीं टिळकांइतकेंच धैर्याचें वर्तन केलें आहे. टिळकांना सोसावे लागले नाहींत असे हाल तुरूंगांत कांहीं मंडळीनीं सोसले आहेत परंतु त्यांनां आपण टिळकांची योग्यता देत नाहीं. कारण, माफी न मागणें, त्या करितां तुरूंगांत जाऊन अनन्वित हाल सोसणें किंवा कोणत्याही संकटाला निधडया छातीनें तोंड देणें एवढयाच गोष्टीवर टिळकांचा मोठेपणा अवलंबून नव्हता.

साधी राहणी आणि निर्व्यसनता हेहि टिळकांचे गुण कमी किंमतीचे नव्हते. चैन हा पदार्थ त्यांच्या मनाला कधीं शिवलाहि नाहीं. ते ज्या काळांत उदयास आले, त्यावेळीं ' मद्यप्राशन ' हा एक ' फॅशन ' चा प्रकार होऊन बसला होता. त्यांच्या मित्रवर्गांतली बरीचशी मंडळी ह्या व दुसऱ्या चैनीच्या व्यसनाला बळीं पडली होती. परंतु त्यांनीं ह्या बाबतींत आपलें वर्तन अत्यंत शुद्ध ठेवलें होतें. त्यांचा साधा पोषाख हा लोकांच्या डोळ्यांत इतका भरला होता कीं, अलीकडे ते कधीं कधीं होमरूलचें जरीकांठीं उपरणें त्याचे कांठ बाहेर काढून अंगावर घेत, त्यावेळीं लोक त्यांच्याकडे मोठ्या कौतुकानें पहात असत ! पण हे गुण सद्गुण असले तरी टिळकांना लोकमान्य बनवण्यास पुरेसे नव्हते.

वरील सर्वगुणांपेक्षां जास्त श्रेष्ठ असे त्यांचे दुसरे दोन मोठे सद्गुण होते. व त्यामुळेंच त्यांच्या इतर सर्वगुणांचें चीज झालें. ते दोन सद्गुण म्हणजे व्यवहार ज्ञान आणि निष्काम बुद्धि हे होत–स्वतःच्या फायद्याकरितां अमुक एक गोष्ट करावयाची हा विचारच त्यांच्या मनांत कधीं उद्भवत नसे. जें काम करावयाचें ते देशाकरितां. लोकांचें किंवा देशांचें हित ज्यांमध्यें असेल अशीच गोष्ट हातांत घ्यावयाची असा त्यांचा नेहमीं बाणा असे. त्यांचेवर मोठा आक्षेप असा आणण्यांत येत असे कीं, त्यांच्या मतांत किंवा वर्तनांत ' कन्सिस्टन्सी ' म्हणजे एकसूत्रता नसे. वेळ येईल त्याप्रमाणें ते आपली मतें बदलीत असत. व बोलल्याप्रमाणें कृति करण्याची वेळ

आल्यास कांहींतरी उडवाउडवी करून ते त्या प्रसंगांतून निसटून जात असत. वादा-करितां हा आक्षेप खरा आहे असें मानलें तरी आपण एक गोष्ट विसरतां कामा नये. ती हीच कीं त्यांच्या कोणत्याहि कृतींत स्वार्थाचा अंश नसे. टिळक झाले तरी मनुष्यच होते. त्यांच्याहि हातून कांहीं चुका झाल्या नसतील असें नाहीं. परंतु प्रत्येक गोष्ट ते देशहिताच्या बुद्धीनें करीत असल्यामुळें त्यांच्या चुकांना अर्थात्च तितकें महत्व दिलें जाणें शक्य नाहीं. कितीहि उलटसुलट रंगाच मणी असले तरी त्यांनीं देशहिताच्या एका सूत्रांत त्या सर्वांना ओंवलेले असल्यामुळें त्यांची एक सूत्रता कधींहि भंग पावली नाहीं. हेंच त्यांच्यावरील आक्षेपाचें खरें उत्तर आहे. निष्काम बुद्धीचे लोक साधारण लोकांत जरी न सांपडले तरी साधुसंतांत पुष्कळ सांपडतील. परंतु देशहित करण्याची बुद्धि त्यांचेमध्यें नसल्यामुळें त्यांची निष्कामबुद्धि आप्पलपोटेपणाची ठरली जाते. व यांतच टिळकांचा टिळकपणा होता–त्यांचें व्यवहारज्ञान या सर्व सद्गुणांच्या मंदिराला कळसाप्रमाण शोभणारें होतें–कोणत्यावेळेस कोणती गोष्ट करावयाची, आणि कोणत्या लोकांशीं कसें वागावयाचें या गोष्टीचा बरोबर अंदाज करण्याची कला जर त्यांचे अंगीं नसती, तर त्यांच्या बाकीच्या सद्गुणांना जितकी आली तितकी किंमत खात्रीनें आली नसती; 'जग कसें आहे' हें त्यांनीं बरोबर ओळखले होतें. त्यामुळें त्यांनीं आकाशांत कधींहि भराऱ्या मारल्या नाहींत. व त्यामुळेंच भलत्या गोष्टींचा पश्चात्ताप करण्याची पाळीहि त्यांचेवर कधीं आली नाहीं.

टिळकांचे हे नऊ सद्गुण नऊ रत्नाप्रमाणें शोभणारे होते. ह्या नवरत्नांचा समुच्चय म्हणजे टिळकांचा टिळकपणा. त्यांतील कोणतेंहि एक रत्न काढून घेतलें तरी त्या नव रत्नाच्या हाराची शोभा गेलीच म्हणून समजावे. साखरेची गोडी ही जशी साखरेपासून निराळी करितां येत नाहीं, त्याप्रमाणें टिळकपणाहि ह्या नऊ सद्गुणापासून निराळा करितां येणार नाहीं. एकाबाजूस. सद्वर्तन, धैर्य, करारीपणा आणि साधेपणा व दुसऱ्या बाजून विद्वत्ता, स्वार्थत्याग, निष्काम बुद्धि आणि व्यवहार ज्ञान हीं रत्नें ओंवून मध्यें देशभक्तीचे पदक घालून बनवलेला हा नवरत्नांचा हार टिळक भक्तांस अर्पण करून महापुरुषाच्या पवित्र नामोच्चरणानें पुनीत झालली ही लेखणी खालीं ठेवतों.

लो. टिळकांच्या आख्यायिका.

(लेखक—रा. रा. म. गो. अभ्यंकर).

लो. टिळकांची धारणाशक्ती दांडगी होती, त्यांनीं एकादें पुस्तक वाचलें म्हणजे पुढें कित्येक वर्षांनीं त्यावर त्यांतील अवतरणें ते सहज देऊं शकत. प्रि. आपटयांच्या संस्कृत कोशांतील निम्मे श्लोक मला पाठ आहेत असें ते म्हणत. त्यांच्या तीक्ष्णबुद्धीची मी एकच गोष्ट देतों. पंडित गट्टूलालजी मोठे शीघ्रकवी होतें. हे १८७६ सालीं डेक्कन कालेजांत आले असतां विद्यार्थ्यांनीं एकत्र जमून त्यांस कोणती समस्या घालावी यांचा विचार केला व 'ओतुना भक्षितः शिवः' (मांजरानें शंकराला खाल्ला) हा चरण तयार केला. पंडितांचे कविता करण्याचे इतर चमत्कार पाहिल्यावर त्यांस वरील समस्यापूरण करण्यास सांगितली व त्यांनीं ताबडतोब खालील श्लोक रचला:—

नवतीतमयं लिंगं पूजार्थं केनचित् कृतं ॥
हन्त तस्य प्रमादेन ओतुना भक्षितः शिवः ॥

या गोष्टीस चाळीस वर्षें झाल्यावर पंडित गट्टूलालजीविषयीं बोलणें निघालें असतां लोकमान्यानीं हा श्लोक म्हणून दाखविला.

संकट आलें असतां मन शांत रहाणें, व युद्धाचा प्रसंग येणार हें पहातांच आनंद होणें हे अशा धैर्याच्या दोन बाजू आहेत. लो. टिळकांची धैर्याविषयीं प्रत्येकानें स्तुती केली आहे. त्यांचीं दोन उदाहरणें मी देतों. ते म्हणाले:—' १८९७ सालीं मी दाजीसाहेब खऱ्यांचे बंगल्यावर उतरलों असतां रात्रीं ९॥ वाजतां एक युरोपीयन पो. सुपरिंटेंडंट आला व बाहेर बोलावून घेऊन १२४ कलमाखालचें वारंट त्यानें मला दाखविलें. मी त्यांस पांच मिनीटें थांवण्यास सांगून आंत गेलों व दाजीसाहेबांबरोबर त्या कलमासंबंधीं चर्चा केली. त्यांनीं प्रे. मॅजिस्ट्रेटचे बंगल्यावर जाऊन जामीनाचा अर्ज करावा व त्याचा निकाल काय होतो तो मळा तुरुंगांत कळवावा असें ठरवून मी दहांचे सुमारास पोलिसाबरोबर तुरुंगांत गेलों. जामीनाच्या अर्जाचा काय निकाल होतो, याची कोणाही आरोपीस विवंचना लागली असती व त्यास झोप आली नसती. परंतु मी १०॥ वाजतां तुरुंगांत गेल्याबरोबर अंथरुणावर निजलों व लगेच मला गाढ झोंप लागली. ११॥ वाजतां दाजीसाहेब आले, त्यावेळीं मी घोरत होतों व त्यांनीं दोन हांका मारल्यावर मी जागा झालों." संकटकालीं इतकें मन शांत ठेवणारा पुरुष खरोखरच विरळा.

प्लेगवर रामबाण औषधांच्या मोठमोठ्या जाहीराती इंग्रजी व मराठी वर्तमान पत्रांतून १८९९ साळीं फार येत असत, व त्यांतील भपक्याचीं वर्णनें वाचून पुष्कळ लोक फसत व तीं औषधें विकत घेत. यास सरकारनें कांहीं आळा घालावा म्हणून 'टाईम्स ऑफ इंडिया' मध्यें 'प्लेग नास्ट्रम्स' या मथळ्याखालीं मी एक पत्र प्रसिद्ध केलें होतें, तें या जाहीराती देणारांस फार झोंबलें. त्यापैकीं एकानें मला सॉलिसिटर मार्फत नोटिस दिली कीं:--' तुमचे पत्रांतील मजकुरानें आमचे अशीलाची बेअब्रू व नुकसान झालें आहे; तुम्ही माफी मागून आपला लेख परत न घ्याल तर तुमच्यावर फौजदारी व दिवाणीफिर्यादी करण्यांत येतील" ही नोटीस मिळतांच मी प्रसिद्ध झालेल्या जाहीराती, माझें पत्र व ती नोटीस घेऊन लो. टिळकांकडे गेलों, व पुढें काय करूं असा सल्ला विचारला. कागदपत्र वाचून ते हंसले व म्हणाले " म. गो ! या नोटीशीचें उत्तर असें द्या कीं, माझें लिहीणें अगदीं बरोबर आहे. तुमची जाहीरात लबाडीची आहे तुम्हांस काय वाटेल तें करा. यामुळें तुमचेवर खटला होऊन मॅजिस्ट्रेट कदाचित तुम्हांस दोषी ठरवील, परंतु तुम्ही हायकोर्टांत सुटाल. माझ्यावर हा प्रसंग आला असता तर मीही असेंच केलें असतें. " लोकमान्यांचें धैर्य माझें अंगीं नसल्यामुळें मी कमी धोक्याचा मार्ग स्वीकारला व नशीबानें मजवर माफी मागण्याची अगर फिर्यादीचा प्रसंग आला नाहीं.

"गीता रहस्य" तयार करण्यांत लो. टिळकांची आठ वर्षें गेलीं.इतकीं वर्षें आध्यात्म विषयाच्या विचारानें त्यांचें मन सुख दुःखादि द्वंदाचे बरेंच पलीकडे गेलें होते. प्रिन्हि कौन्सिलनें जगन्नाथ महाराजांचें दत्तविधान शाबीत धरल्यावर कांहीं दिवसांनीं ते एकटे असतां मी प्रश्न केला कीं, हा खटला तुमचेसारखा झाला, याचा तुम्हांस आनंद झाला कीं नाहीं व तो बुडाला असता तर तुम्हांस दुःख झालें असतें का ? ते म्हणाले, " खटला बुडाला असता तर मला दुःख झालें नसतें; परंतु तो मी जिंकला हें ऐकतांच चित्तांत आनंदाची उर्मी उठली. ती न उठण्याइतका मी स्थितप्रज्ञ अद्यापि झालेला नाहीं. "

लो. टिळकांचा दैवावर व पूर्वकर्मावर थोडा भरंवसा होता. ते एकदां म्हणाले " मी तीन वेळां तुरुंगांत गेलों; परंतु आक्षेपार्ह लेख माझ्या स्नेह्यांनीं लिहिले होते, व ज्याबद्दल स्तुती झाली ते लेख माझे हातचे होते. १८९७ सालीं शिवाजीचे उद्गार ही कविता तीन आठवडे कंपोज होऊन जागा नसल्यामुळें छापण्याची राहिली होती व भानूंचें व्याख्यानाच्या नोटा व ती एकाच अंकांत छापली गेली. या दोहोंमध्ये राणीसरकारचा जयजयकार हा माझा लेख प्रसिद्ध झाला होता. पूर्वजन्मार्जित कर्माचे या जन्मीं माझ्या स्नेह्यांनीं लिहीलेल्या लेखांबद्दल शिक्षा भोगून मला प्रायश्चित भोगावे लागलें एका दृष्टीनें पाहिलें असतां १९०८ सालीं मला शिक्षा देण्यांत ईश्वराचा चांगला

हेतू असावा. जॅकसन साहेबाचे खुनाचे वेळीं मी मोकळा असतों तर कटाचा प्रवर्तक म्हणून सरकारानें मजवर खटला केला असता व कदाचित मी दोषी ठरलों असतों. तसेंच माझी सहा वर्षांची शिक्षा १९१४ सालीं महायुद्ध सुरु होण्यापूर्वी संपली म्हणून बरें. युद्धाचे सुरवातीनंतर जर ती संपती तर कोणती तरी सबब लावून सरकारानें मला युद्ध संपेपर्यंत तुरुंगांत ठेविलें असतें. ”

ज्योतिष दृष्ट्या पाहिलें तर लो.टिळकांची कुंडली अगदीं सामान्य असून तींत एकहीं उच्चीचा ग्रह नाहीं. त्यांच्या वडिलांनीं त्यांचा जन्मकाळ बरोबर टिपून त्यावरून त्यांनीं केलेली कुंडली लो. टिळकांनीं मला एकदां दाखविली व म्हणाले, मला द्विभार्यत्व योग आहे असें वडिलांनीं मला सांगितलें. परंतु तसा संभव दिसत नाहीं. १९०० सालीं पुष्कळ ज्योतिषांस, त्यांनीं ‘ मला तिसऱ्यानदां तुरुंगांत जावें लागेल काय ? ’ असा प्रश्न केला होता व प्रत्येकानें नाहीं असा जबाब दिला होता. १९०८ सालीं खटल्याचा निकाल बरोबर सांगणारास मी १००रुपयांचें बक्षिस लावलें होतें. परंतु एकासही तो मांगतां आला नाहीं. लो. टिळकांचा आयुर्दाय ७२ वर्षें असें शेकडों ज्योतिष्यांनीं सांगितलें असून ते ६५ वे वर्षीं मेले. १९१५ सालीं मी त्यांस म्हणालों होतों कीं, पुढील वर्षीं तुम्हांस मृत्युयोग आहे. ते म्हणाले “ सध्याचे माझे प्रकृतीवरून मी पांच वर्षें मरत नाहीं अशी मी तुम्हांस हमी देतों. “ दुर्दैवानें ज्योतिषांचें म्हणणें खोटें ठरून लो. टिळकांचेंच खरें ठरलें.

विधायक कां विध्वंसक ?

[रा. रा. ल. व. भोपटकर, एम्. ए., एल् एल्. बी.]

लोकमान्य लोकश्री बळवंतरावजी टिळक हे हयात असतांना यांच्या कार्यक्रमासंबंधानें असा एक नेहमीं आक्षेप घेण्यांत येत होता. कीं, त्यांच्या सर्व चळवळी विध्वंसक स्वरूपाच्या असून त्यांत घटनात्मक असें कांहींही नव्हतें. हा आक्षेप अनेकांनीं अनेक दृष्टींनीं खोडून काढलेलाच आहे. माझ्या समजुतीप्रमाणें ब्रिटिश राज्य येथें स्थापन झाल्यापासून जर कोणत्या एखाद्या हिंदी देशभक्तानें एखादें प्रचंड विधायक कार्य केलें असेल, तर तें लोकमान्यांनींच होय. लोकमान्यांनीं खादा कारखाना काढलेला नसेल, किंवा एखादा समाज आस्तत्वांत आणिलेला नसेल, परंतु ज्यांची वाणी व लेखणी शेंकडों कारखाने व समाज

प्रसवण्यास समर्थ होती त्यांनीं विध्वंसना पलीकडे दुसरें कोणतेंही कार्य केलें नाहीं, हें म्हणणें धाडसाचेंच होय. परकीय सत्तेच्या दडपणाखालीं महाराष्ट्राचें मन ढिसूळ व अंतःकरण कमकुवत बनत चाललेलें होतें, तें मन व तें अंतःकरण पूर्वीप्रमाणें कणखर व तेजस्वी करण्याच्या कार्यास• विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं प्रारंभ केला व त्यांत त्यांना बरीच यशःप्राप्ति झाली. परंतु त्यांची अवतार समाप्ति वयाच्या अवघ्या बत्तिस वर्षांतच झाली. शास्त्रीबोवांनीं महाराष्ट्राची दृष्टी अंतर्मुख करून जनतेंत स्वाभिमानाचें व स्वदेशाभिमानाचें बीजारोपण केलें, हिंदी राष्ट्रीयत्वाचा ते प्रभात तारा होत ! त्यांच्या हातून गळून पडलेली राष्ट्रीयत्वाची ज्योत लोकमान्यांनीं आपल्या हातांत घेऊन व ती स्वार्थत्याग करारीपणा व धिटाई या सद्गुणरूप तेलानें सतत प्रज्वलित करून, त्यांनीं महाराष्ट्रांतील कोनाकोपऱ्यांतच नव्हे तर हिंदुस्थानांतील सर्व ठिकणीं लोकांचीं अंतःकरणें नव्या ध्येयांनीं, विचारांनीं व भावनांनीं उद्दीपित केलीं व तेथें स्वतंत्रतादेवीची प्रस्थापना केली. लोकमान्यांनीं कारखाने उभारले; परंतु ते दृश्य स्वरूपाचे नसून अदृश्य अशा आत्मविश्वास देशाभिमान इत्यादि सद्गुणांचे उभारले. आणि लोकमान्यांनीं समाज स्थापन केले. परंतु ते नेभळट कार्यक्रम करणाऱ्या इसमांचे नसून, नोकरशाहींशीं दोन हात करण्यास सदैव सज्य असलेल्या बाणेदार देशभक्तांचें होत ! लोकमान्यांचें लोकमान्यत्व यांतच आहे, व त्याचें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत जें अजरामर होईल, तें या कामगिरीमुळेंच होय ! परंतु वरवर जरी विचार कला तरी त्यांनीं पुष्कळ संस्था स्थापन केल्याचें आढळून येईल. केसरी व मराठा हीं वर्तमानपत्रें, गणपत्युत्सव, शिवाजीउत्सव, स्वराज्यसंघ इत्यादि संस्था त्यांच्या घटनात्मक बुद्धीचीं फळें होत, व या संस्था ढळढळित नजरेसमोर असतांना जर कोणास अद्याप वरील आक्षेप घ्यावयाचाच असेल तर त्याच्या हेकट स्वभावाची व तिर्यग्बुद्धीची कींव करणेंच भाग पडेल.

कोलापुरी संगीत चिवडा.

शेरास १४ आणे रत्तलास सवा रुपया.

पत्ताः—एन्. डी. छत्रे.

कांदेवाडी मुंबई, नं. ४.

लो० टिळक आणि राष्ट्रीय शिक्षण.

लेखक—नाथानुज.

'सरकारी शाळांतून जें शिक्षण मिळतें तें हुषार पण नेभळट नोकर तयार करण्याकरितां आहे. राष्ट्रीय शील, उमेद, किंवा उद्योग वाढविण्याकरितां नाहीं हें आम्हीं अनेक प्रसंगीं सांगितलेंच आहे. वास्तविक म्हटलें म्हणजे हें काम खाजगी शाळांनीं कराबयास पाहिजे. पण त्याही शाळा सरकारनें आपल्या कह्यांत घेतल्या आहेत. तेव्हां आतां **अगदीं स्वतंत्र व सरकारच्या कधींही कह्यांत न जाणारी** युनिव्हर्सिटी काढल्या खेरीज गत्यंतरच नाहीं असें झालें आहे'-केसरी १४-११-१९०५

'मला मिळालेलें ज्ञान मराठींत मिळालें असतें तर हें सर्व ५२ वर्षांचें ज्ञान २५ व्या अगर ३० व्या वर्षींच मला मिळालें असतें. **या इंग्रजी भाषेमुळें सर्व वर्षें फुकट जातात.** राष्ट्रास परकी भाषेंत शिक्षण देणें म्हणजे त्यास खच्जी करणें आहे.'

टिळकांचें सोलापूरचें व्याख्यान २७–२–१९०९

स्वराज्याचे आद्य प्रवर्तक लोकमान्य टिळक यांनीं ५।६ वर्षांचे अवधींत 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या महामंत्राचा उपदेश जनतेला केला, व मरणोत्तर सर्वीकडून स्वराज्य–काल–कारण म्हणून धन्यवाद मिळविले, या सर्व गोष्टींचा सरळ अर्थ करावयाचा म्हणजे, लोकमान्य हे व्यापक अर्थानें, राष्ट्राचे खरे नेते, मार्गदर्शी किंवा यशस्वी शिक्षक होते असाच केला पाहिजे. त्यांनीं, १८५७ पासून सरकारच्या स्वार्थी दडपणाखालीं चिरडून जाऊन, स्वत्व व स्वाभिमान यांना मुकून, स्वकीय हक्कांच्या जाणीवेला पारखे झालेल्या, व मुस्कटदाबीमुळें मुके झालेल्या जनतेला, आपल्या धडाडीनें खडबडून जागें करवून, स्वतःच्या आचरणानें जुलमी राजसत्तेच्या आत्यंतिक छळालाही न जुमानतां, ध्येय संपादनार्थ निर्भयपणें पुढें सरकण्याचें राष्ट्रीय शिक्षण देऊन, आज हिंदी प्रजा बोलकी केली आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे लोकमान्य हेच प्रत्यक्ष राष्ट्रीय शिक्षण होय असें वाटूं लागतें. लोकमान्य म्हणजेच औद्योगिक आणि वैज्ञानिक शिक्षणाचे अभावीं होणारी देशाची तळमळ असें भासूं लागतें. लोकमान्य म्हणजेच धार्मिक व राजकीय शिक्षणाचे आधारस्तंभ असें कबूल करावें लागतें. लोकमान्य म्हणजेच शिवजयंत्युत्सवाचे रूपानें अवतरलेलें इतिहाससंशोधन होय असा भास होतो. स्वदेशीचे रूपानें अर्थशास्त्र, स्वराज्याचे रूपानें राजकारण, गीतारहस्याचे रूपानें राष्ट्रधर्म, व त्यांच्या इतर सर्व व्यापक चळवळींच्या रूपानें राष्ट्रीय शिक्षणाचें विराट स्वरूप सामर्थ्यानें आपल्या समोर उभें रहातें. पण लोकमान्यांचें आयुष्य या व्यापक राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार करण्यांतच खर्च झालें असलें तरीं या महानुभाव लोकसंग्राहकाच्या सार्वजनिक

जीवितक्रमाचा आरंभ संकुचित शालागृह–निवासी राष्ट्रीय शिक्षणाचे संगोपनांतच झाला ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

१८८० च्या जानेवारीमध्यें, मोरोबादादा वाडयांत, न्यू इंग्लिश स्कूल या नांवांची जी शाळा स्थापन करण्याचें श्रेय, आणखी एक दोन स्नेह्यांबरोबर कै. चिपळूणकर व टिळक यांनीं संपादन केलें, त्या शाळेवद्दल, निदान चालकांच्या डोक्यांमध्यें, राष्ट्रीय शिक्षणविषयक बऱ्याच महत्वाच्या कल्पना घोळत असाव्या हें उघड दिसतें. १८८२ मधील डॉ. हंटर यांच्या शिक्षण कमीटीपुढें प्रि. आपटे यांनीं दिलेली साक्ष व आपटे, आगरकर, टिळक व नामजोशी या चौघांच्या सहीनें सदर साहेबांस, न्यू इं. स्कूल तर्फे दिलेलें मानपत्र वाचलें म्हणजे ही नवीन निघालेली शाळा कांहीं 'नेभळट नोकर' निर्माण करण्याचा निमसरकारी कारखाना नसून, खरोखर लोकहिताच्या दृष्टीनें प्रचलित शिक्षण क्रमामध्यें योग्य त्या सुधारणा करण्याकरितां, सरकारची निष्कारण ढवळाढवळ चुकवून आपल्या विचारांप्रमाणें राष्ट्रहित साधण्याच्या हेतूनें, आत्मविश्वासाचे जोरावर संस्थापित केलेली शिक्षणसंस्था होती हें स्पष्ट होतें. प्रथम अनदानींत, कांहीं वेळपर्यंत सरकारचें धोरण अशा तऱ्हेच्या विचारांनां पोषक होतें. व त्यावेळीं डेक्कन कॉलेज ही या नवीन संस्थेचे ताब्यांत दण्याचीं सरकारची तयारी होती व त्याबद्दल बोलणेंही झालेलें होतें. ही गोष्ट जगजाहीर आहे. याच विषयीं ७ नोव्हेंबर १९०५ चे केसरींत टिळक लिहितात–" खासगी शाळा म्हणजे प्रत्येक बाबतींत सरकारी शाळांचें अनुकरण करणाऱ्या शाळा नव्हेत, तर सरकारी शिक्षणांत जी उणीव आहे अथवा सरकारी शाळेंत ज्या गोष्टी शिकविता येत नाहींत किंवा शिकवीत नाहींत, त्या गोष्टी विद्यार्थ्यांस शिकविण्याकरितां, देशांतील सुशिक्षित वर्गांनीं स्वार्थत्याग करून खाजगी शाळा काढलेल्या असतात. ही गोष्ट सरकारास १८८२ मध्यें पूर्ण माहिती होती:–जाणून बुजून खाजगी शाळांस उत्तजन देण्याचा क्रम सरकारनें चालू ठेविला; इतकेंच नव्हे तर, खाजगी शाळेच्या शिक्षणक्रमांत ज्यास्त स्वातंत्र्य असावें हीहि गोष्ट सरकारनें प्रांजलपणानें कबूल केली होती. व तदनुसार सामाजिक, धार्मिक व राजकीय बाबतींत सरकारी वळणापेक्षां निराळें वळण राखण्याच्या कटाक्षानेंच मद्रास कडील वगैरे शाळा कॉलेजें बरींच यशस्वी झालीं. या वेळीं टिळक सरकारी ग्रँटच्या फारसे विरुद्ध नव्हते व ज्या गोष्टींत सरकारचें व आपलें पटत नाहीं तेवढया बाबतींत काय कमी मिळेल तशी ग्रँट घेऊन इतर स्वातंत्र्य कायम राखण्यांस टिळक नाराज नव्हते. व गेल्या डिसेंबरांतील, ज्ञान प्रकाशनें दिलेल्या राजीनाम्यांतील गुप्त मंजूषाच्या रूपानें, टिळकांच्या मानपत्राच्या वेळीं उपस्थित केलेल्या शुष्कवाद प्रसंगीं, त्यांच्या विरुद्ध आणलेले आक्षेप यावरील त्यांच्या मनोवृत्तीसीं ताडून पहातां विशेष दोषास्पद आहेत असें म्हणतां येत नाहीं.

सरकारची ग्रँट व त्यांचा असह्य दाब यांची जाणीव १९०१ च्या युनिव्हर्सिटी कमिशनच्या पूर्वी तितकी तीव्रतेनें झाली नसल्यास नवल नाहीं.

पण पुढें जसजसा सरकारचे या धोरणामध्यें फरक पडूं लागला, व या अनिष्ट फरकाचें दृश्य फल १९०१ चें युनिव्हर्सिटी कमिशन व तदनुरोधानें १९०२ ची कर्झन-नशाही मुस्कटदाबी अवतीर्ण झालेली लोकांनीं पाहिली, तसतसें लो. टिळक प्रभृति मंडळीनीं स्वतंत्र शिक्षणाचा पुरस्कार करण्याकरितां कंबर बांधली.

१९०५ चे सुमारास बंगालमध्यें राष्ट्रीय शिक्षणाची एक मोठी चळवळ चालू झाली. मुंबईकडील जनतेमध्यें ही चळवळ प्रसिद्ध करण्याचें काम लोकमान्यांनी केलें. डे. ए. सोसायटीच्या आजन्म सेवकत्वाचा १८९० मध्यें राजीनामा देऊन, लोकमान्य वर्तमानपत्रांकडे सर्वस्वीं लक्ष देण्याला मोकळे झाले होते. १८९५ मध्यें ते नामदार होऊन त्यांनां आतां स्वाभाविक आत्मविश्वास आला होता. आता ते शिवजयंत्युत्सवासारखीं सार्वजनिक कामें हातांत घेण्यास पुढें सरकत होते. १९०५ मध्यें नामदारींतूनही मुक्त झालेले टिळक शिक्षणाचा प्रश्न जोरानें हातांत घेण्याला समर्थ होते, व त्यांनीं हो चळवळ यशस्वी करण्याचें कंकण बांधलें. सरकारच्या बदललेल्या धोरणामुळें रा. टिळकांच्या शिक्षणविषयक विचारामध्यें क्रमशः क्रांति घडली होती, व ते वर उध्दृत केलेले विचार व्याख्यानांतून व केसरींतून लोकां पुढें मांडूं लागले होते.

शिक्षणाचे बाबतींतील कर्झन शाही देशाच्या पचनीं पडणें अशक्य होतें; व १९०६ च्या कलकत्याच्या कांग्रेसनें, कै. डॉ. दादाभाई नौरोजींच्या हस्तें आपल्या गळ्यामध्यें जो चार रत्नांचा हार घालून घेतला त्यांमध्यें राष्ट्रीय शिक्षणाचा समावेश केला होता. ही माळ फार जलदीनें बहुधा विकारवश मनानें गुंफली गेल्यामुळें, त्यावेळीं तरी, स्वदेशी, स्वराज्य व बहिष्कार यांचे संगतीत या राष्ट्रमण्याला दृष्ट लागेल हें नव्यांचे लक्ष्यांत आलें नाहीं. पण अखेरीस बहिष्कार या विकारी व स्वराज्य या राजहंसी हिऱ्यांच्या जोडीला असलेला हा शिक्षणावतंस सरकारला असह्य होऊन राष्ट्रीय शिक्षणाचे अव्याहत प्रवाहामध्यें अकालीं खो घातला गेला हें सर्वत्रांस माहिती आहेच. तीन चार वर्षांचा होऊन नुकताच बाळसें घेऊं लागणारा हा बाल सरकारच्या समिता ॲक्टोला, केवळ गैरसमजानें, १९१० मध्यें बळी गेला.

राष्ट्रीय शिक्षणाचे जनक, प्रवर्तक व हितचिंतक या तीन क्रमावतारी पायऱ्यांनां लोकमान्यांच्या शिक्षण विषयक कार्याचा उल्लेख करणें शक्य आहे असें वाटतें. या राष्ट्रपुरुषाच्या मनोवृत्तींमध्यें राष्ट्राच्या अवश्यकते प्रमाणें फरक होत गेलेला सर्व टिळकभक्तांसही कबूल आहे. तसा विचार केला असतां १८८० ते १८९० पर्यंत लोकमा-

न्यांचे आयुष्य शिक्षणप्रवण होतें, १९०५ ते १९०८ पर्यंत ते शिक्षणाचे पुरस्कर्ते होत व १९१४ पासून पुढें ते केवळ हितचिंतक होते, राष्ट्रीय शिक्षणाचे विचारांनीं त्यांच्या मनामध्यें बरीच खालची जागा मिळत असे असें प्रस्तुत लेखकाला वाटतें.

१८८० ते १८९० हा काल टिळक शिक्षक होते. त्यावेळीं ते एका शिक्षण संस्थेचे संस्थापक व चालक होते. त्या दहा वर्षांमध्यें शिक्षणाबद्दलचे विचार, म्हणजे जीवित कर्तव्याचे विचार अशा हक्कानें टिळकांचें सर्व चित्त व्यापून टाकीत होते. आजन्म सेवकांनीं आंगलें सर्व सामर्थ्य संस्थाकारणीं लावावें अशा कठोर, करारी, जोस्विट पंथाचे टिळक चहाते होते. व अखेरीला अशाच मुद्यांवर न पटल्यामुळें १८९० मध्यें या संकुचित शिक्षणाला राम राम ठोकून व्यापक शिक्षणामध्यें मन घालण्याचा टिळकांनीं हित-कारी निश्चय केला.

त्यानंतर अधुनिक युगांतील चळवळीचें आद्य अधिष्ठान जीं वर्तमानपत्रें व सार्वजनिक व्याख्यानांची कला या साधनांचा पुरता अभ्यास करून त्यांना पूर्ण कार्यांत आणण्यामध्यें १८९० ते साधरणपणें १९०५ मर्यंत काळ घालविला असें म्हणण्यास हरकत नाहीं. शेवटीं शेवटीं १९०१ चे कमिशन व नंतरचें सरकारी धोरण यांवर टीकाकरून अनेक संस्मरणीय लेखांचे सहाय्यानें राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना अत्यंत लोकप्रिय करून सोडिली.

१९०६ जूनमध्यें महाराष्ट्रशिक्षण वीर प्रो. विजापुरकर यांनीं कोल्हापुर येथें समर्थ विद्यालय काढलें. व ऑगस्टमध्यें लो. टिळक व डॉ. देशमूख, रा. ब. चिंतामणराव वैद्य रा. दाजी आबाजी खरे व प्रो विजापुरकर या प्रसिद्ध व्यक्तीचें शिक्षण प्रसाराकरितां महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळ स्थापन झालें, अर्थात् लोकमान्य मंडळाचे अध्यक्ष होते 'खाजगी कॉलेजांनां लोक आश्रय देतात तो खाजगी संस्था सरकारी कॉलेजांच्या नकला व्हाव्या म्हणून नव्हें तर, सरकारी शिक्षण संस्थांतून राष्ट्र हिताच्या बाबतींत कोणतेंही खरें शिक्षण मिळणें शक्य नाहीं म्हणून होय' असा खंबीर आत्मविश्वास आपल्या उत्तेजक भाषणांनीं महाराष्ट्रांत संचारावयास लावून फंड वगैरे लवकर उभारून १९०८ च्या सुमारास समर्थ विद्यालय त्याच्या मालकीच्या जागीं अधिष्ठित झालें व लोकमान्यांच्या आवडीचें शिक्षण सुस्थितींत येऊन पडलें. याच सालीं झालेली लोकमान्यांची बार्शी, व सोलापूर येथील व पूर्वीच्या वर्षी बेळगांवची भाषणें प्रसिद्ध आहेत धार्मिक शिक्षण, मातृभाषेंतून अध्ययन, औद्योगिक व वैज्ञानिक शिक्षण व राजकारणाचें शिक्षण हे आपल्या शिक्षणाचे विशेष आहेत असें ते सांगत असत. 'धर्म शिक्षण सरकार देऊं शकत नाहीं व ते परधर्मी असल्यामुळें त्यानें तसें करणें इष्टही नाहीं' राजकारण भावी तरुण पिढीला अवश्य समजलें पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. 'देशासंबंधें विचार करण्याचें शिक्षण तर आमचेकडे मुळींच मिळत नाहीं. स्वतंत्र देशांत अशी स्थिति नाहीं.' अमेरिकेंत ज्याप्रमाणें ४ थ्या किंवा ५ व्या इयतेंत त्यांचा

जाहीरनामा शिकविला जातो तसाच आपल्या प्रजाहक्काचा मूलाधार राणीचा जाहीरनामा हे सरकारचें वचन आपल्या विद्यार्थ्यांना तितक्याच लहानपणीं माहित व्हावें असें ते म्हणत. आपला देश उद्योगधंद्यांत मागें पडला आहे. तर जर्मनीनें वगैरे आपल्या देशांत औद्योगीक शिक्षणाचा प्रसार करून आपली प्रगति करून घेतली तशी हिंदुस्थाननें करून घेण्या करितां 'सर्व बाजूंनीं उपयुक्त असें शिक्षण देण्या करितां राष्ट्रीय शाळाच काढल्या पाहिजेत' असें त्यांचें स्पष्ट मत आहे 'आपणास पाहिजे काय ? राज्य बरें आहे की वाईट आहे, हिंदुस्थानचा भाग्योदय होत नाहीं तो कशानें होईल–हिंदुस्थान दरिद्री कां ? ट्रान्सवालांत आमचे हाल कां होत आहे ?' याचें ज्ञान मिळालें पाहिजे. 'आपल्या हक्कांचे ज्ञान मिळावें, या हेतूनें टिळकांनीं या चळवळीला चालन दिलें होतें. असें या कारागृह–पूर्व–कालाचें धोरण होतें. सरकारच्या घातुक धोरणाचा प्रतिकार करावा, राष्ट्राच्या भावी पिढीचे आधार स्तभ देशविषयक वस्तुस्थितीचे ज्ञाते निपजावे, म्हणून या कालामध्यें लोकमान्यांनीं राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार केला. अंतिम ध्येयमूर्तीचें एक साधन म्हणून लोकमान्यांचें लक्ष शिकगाकडे होतें असें या कालांत स्पष्ट दिसतें. यावेळीं लोकमान्यांची दृष्टी लोक शिक्षणाच्या संकुचित मार्गापलीकडे स्वैर संचार करण्याच्या बेतांत होती. सरकार ढोळ्यांत तेल घालून बसलें होतें.आणि १९०८ मध्यें महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष कारागृहवासांत पडले ! १९०९.मध्यें प्रो.विजापुरकर कोल्हापूरकरांनीं गोत्यांत आणले. व लगेच समिती ॲक्टान्वये समर्थ विद्यालय बंद पडलें. राष्ट्रीय शिक्षणाला १९०६ त मिळालेली संगत भोंवली. १९१४ मध्यें लोकमान्य सुटून आले. त्यावेळीं ८ वर्षें तुंबून राहिलेल्या राजकारणाला ऊत आला. कॉग्रेस मधील समेट पुरा होऊन स्वराज्याचा प्रश्न लोकमान्यांनीं उत्साहानें हातीं घेतला. राष्ट्रीय शिक्षणाचें मूर्तिमंत स्वरूप म्हणून समजलें जाणारें समर्थ विद्यालय दोन्हीं रक्षकांचे गैरहजेरींत गैर समजाला बळी पडलें होतेंच. त्याला ४ वर्षें झालीं होतीं. प्रो. विजापूरकरांच्या अजिंक्य आशावादाशिवाय त्याच्या पुनरुज्जीवनाबद्दल कोणालाही खात्री नव्हती. प्रत्यक्ष लोकमान्य निराशेनें उदासीन झाले होते. यामुळें मृतकाष्ठाला पाणी घालण्याचा अव्यापारेषुव्यापार सोडून देऊन ते स्वराज्याचें दोहन करण्याचे उद्योगाला लागले. या थोडयाच अवधींत त्यांचें राजकारण अनेक दृष्ट्या भाग्यशाली झालें हें कोणाला सांगावयास पाहिजे असें नाहीं.

या शेवटच्या सहा वर्षांमध्यें लोकमान्यांनीं राष्ट्रीय शिक्षणाकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं. ते सुटून आल्यानंतर ३।४ वर्षांनीं समर्थ विद्यालय पुनः, सरकारचा गैर समज दूर होऊन, १९१८ मध्यें पुनर्जन्म मिळवितें झालें. भविष्यकालामध्यें बलिष्ठ भवितव्यता अशा रीतीनें प्रो. विजापूरकरांनां त्यांच्या आवडत्या विद्यालयाचा प्रेमळ आहेर करणार हें न कळल्यामुळें, पुनर्जन्मापूर्वी

व तदनंतर ही कांहीं पूर्वग्रहदूषित कारणांनीं लोकमान्यांचे हातून नवीन समर्थ विद्यालयरूपी राष्ट्रीय शिक्षणाला एक दोन वेळां मदत होण्याचे ऐवजीं थोडाबहुत अडथळा झाला असला तरी, त्यांच्या कर्तबगारीनें सरकारचें धोरण व दृष्टिकोण या मध्यें झालेल्या बदलाचा फायदा यानूतन संस्थेला—लोकमान्यांच्या आवडत्या मानस-बालकाला—खात्रीनें झाला आहे, होत आहे व निश्चयानें होणारही आहे असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

राष्ट्रीय शिक्षणाबद्दल सहानुभूती टिळकांचे मनांत अखेरपर्यंत वसत होती हें सांगणें म्हणजे सूर्याजवळ प्रकाश असतो हें सांगायला लागण्याइतकेंच हास्यास्पद आहे. न्यू इंडियाचे विनंतीवरून लिहिलेल्या लेखांत ते म्हणतात ' राष्ट्रीय शिक्षणाचा परकी सरकारचे संबंधांत विचार केला तर तें एक स्वराज्य मिळविण्याचें साधनच होय. स्वराज्याची मागणी करणारा कोणीही गृहस्थ राष्ट्रीय शिक्षणाचा उत्साहानें पुरस्कार केल्याशिवाय रहाणारच नाहीं ?

टिळकांच्या राष्ट्रीय शिक्षणावरील सर्व कल्पना एकत्र करणें तितकें सुलभ नाहीं. त्यांच्यामतें त्या शिक्षणानें, विद्यार्थ्यांनां स्वराज्याची कल्पना आली पाहिजे; राष्ट्रीय आचार, विचार यांचा ठसा त्यांच्या मनावर स्पष्ट उमटला पाहिजे; स्वभाषेंतून स्वधर्म, स्वदेशाचा इतिहास, स्वतःच्या वाङ्मयाचें संपूर्ण ज्ञान वगैरे प्राप्त झाल्यानें एक प्रकारचें सत्व निर्माण झालें पाहिजे. राष्ट्रीयगरजा, आकांक्षा आणि राष्ट्रीचें आजचें सामर्थ्य, संभाव्यता यांची पुरोपूर माहिती मिळाली पाहिजे. आणि या सर्वांचे योगानें भिक्षांदेहीं न करणारा करारीपणा, स्वावलंबन. देशाभिमान, व त्याबरोबरच स्वार्थत्याग वगैरे ' राष्ट्रीयगुण' यावे. दुसऱ्याचा बंदा न होतां स्वतंत्र चरितार्थ चालवितां येण्याकरितां वैज्ञानिक ज्ञान मिळावें. व हें सर्व शिक्षण बालपणींच मिळावें परकी भाषेचा निरर्थक श्रमवांचावा. अशा उत्तम कल्पनांनीं लोकमान्यांचें राष्ट्रीय शिक्षण नटलेलें होतें.

त्यांची आवडती संस्था आजही याच धोरणावर त्याच त्यांच्या खंद्यावीराकडून चालविली जात आहे. प्रो. विजापूरकरांचें तळेगांव दाभाडें येथील नवीन समर्थ विद्यालय बदललेल्या परिस्थितींत चिरायु होऊन अनंत कालपर्यंत टिळकांचें नांव व टिळकांचे विचार चालवील अशी आशा करण्यास, टिळकांच्याच प्रयत्नांनीं, पुष्कळ जागा आहे.

या राष्ट्रीय महापुरुषाचें चरित्र म्हणजेच राष्ट्रीय शिक्षणासारख्या अनेक चळवळींचा सांगोपांग इतिहास होय. लो. टिळकांचें आयुष्य हें एका अर्थीं त्यांच्या सर्व कृत्यांच्या विरोध कांशीं लढण्यांत घातलेलें आयुष्य होतें. त्यांच्या अनेकपक्षी कर्तृत्वाचे अनेक आक्षेपक होते. त्यामध्यें ही राष्ट्रीय शिक्षणाची चळवळही आक्षेपकांनीं वेगळली नव्हती. लोकमान्यांच्या आशीरवादानें व आरंभीं त्यांच्या नेतृत्वानें पवित्र झालेली ही चळवळ चिरंतन व्हावी हीं सदिच्छा प्रत्येक टिळक भक्ताला उत्कटतेनें

असलीच पाहिजे. व तशा निश्चयानें प्रेरित झाल्यावर टिळक आपल्या आक्षेपानें काय उत्तर देत असत हेंही सर्व राष्ट्रीय शिक्षणाभिमानी लोकांनीं लक्ष्यांत बाळगणें अवश्य आहे.

ते म्हणत असत–खाजगी शाळांवर सरकारचा दाब ठेवण्याचें मुख्य कारण म्हणजे शिस्तरक्षणाची कळकळ होय असें सांगण्यांत येतें. ' पण राष्ट्रीय शाळेंत आम्हीं तरी विद्यार्थ्यांनां चोऱ्या करा म्हणून शिकविणार आहों काय ? सामान्य लोक नोकरीच्या पाठीस लागतात. ते ' राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थ्यांस नोकरी कशी मिळणार ?' असा आक्षेपवजा प्रश्न विचारीत असतात. त्यावर टिळकाचा जबाब ठरलेला आहे ' सरकारी शाळेंत अभ्यास करून परीक्षा दिलेल्या लोकांनां नोकरी मिळेल हें खरें. परंतु खरें पाहिलें तर या नोकर होऊं घातलेल्या लोकांनां अन्य धंदा करण्याची पात्रता नसते एवढेच नाहीं तर तशी स्वतंत्र धंदा पहावा ही उत्सुकताही नसते. आणि पास होणाऱ्या सगळ्याच लोकांनां नोकऱ्या देण्याची सरकार तरी हमी कोठें घेतें ? **स्वतःच्या हिमतीवर पोट भरण्याचें सामर्थ्य आलें पाहिजे.** आणि तसें राष्ट्रीय शिक्षणानें अंगीं येणार नाहीं तर तें राष्ट्रीय शिक्षणच नव्हे. जर्मनी, अमेरिका जपान इ. ठिकाणीं इतर शिक्षणाबरोबर उद्योग धंद्यांचें शिक्षण देण्यांत येतें तें मीं राष्ट्रीय शिक्षण समजतो. '

दुर्दैवानें टिळकांच्या स्वतःच्या आयुष्य क्रमांत व देशाच्या परिस्थितींत असे खडतर प्रसंग आले कीं राष्ट्रीय शिक्षणांतलें, त्यांच्या नूतन १९०७ नंतरच्या स्वतंत्र ' राष्ट्रीय शिक्षणांमधील, ' फार थोडें व्यक्त स्वरूपांत आज पहावयास मिळत आहे. टिळकांनीं त्यावेळीं ही चळवळ घेतली नसती तर तिला त्यावेळीं आलेलें विस्तृत स्वरूप खास आलें नसतें. समर्थ विद्यालय बंद झालें त्यावेळी कोणाही राष्ट्र भक्ताला त्याचे बद्दल अभिमानच वाटावा अशा भाग्यशालीं जोमांत तें होतें. मध्यंतरींचे आवांतर, अकल्पित व कांहीं अंगीं आपल्यावर आपणहून ओढून घेतलेल्या गैर समज विशिष्ट कारणांनीं या चळवळीचा अकालीं मृत्यु आला नसता तर आजपर्यंत लोकमान्य टिळकांच्या इतर चळवळीं बरोबरच हीही सर्वव्यापी होऊन राहिली असती. लोकमान्यांनां ही चळवळ सर्वव्यापी करण्याची महत्त्वाकांक्षा होती एवढें आपण लक्ष्यांत ठेवावयाचें आहे. अगदीं आरंभीं उद्धृत केलेल्या टिळक-सूत्रांमध्यें स्वतंत्र युनिव्हर्सिटी पाहिजे असें टिळकांनी स्पष्ट सांगितलें आहे. हिंदु युनिव्हर्सिटी बहुतेक भरभराटींत येत आहे. मुसलमानांची युनिव्हर्सिटी झालीच आहे म्हणावयाची मद्रासकडे मागाहून अगदी नव्यानें आरंभ होऊन स्तुत्य उपक्रम व विस्तारही फार जलद झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. लोकमान्यांचा महाराष्ट्र टिळकांचे नांवाचें महाराष्ट्रीय विश्वविद्यालय स्थापन करून, त्यांचें स्मारक करील काय ?

राष्ट्रीय शिक्षण.

लोकमान्यांचें राष्ट्रीय शिक्षणावरील प्रेम अलोट होतें. निखळ तात्विक वादाचे प्रश्नच ते चिकाटीनें हातीं घेत असत एवढेंच नव्हे तर, तत्सदृश किंवा तत्प्रवण अशीं कोणतीही संस्था त्यांना आढळली तरी तिच्यावरील आक्षेपकांना उत्तर देण्यास ते तयार असत. बनारसचें सेंट्रल हिंदु कॉलेज थिआसफीनें चालविलें आहे एवढ्याचवर बरेच लोक त्याचा विरोध करीत असत. लोकमान्यांनीं त्याकरितां १९०३ चे सुमारास केसरींतून लेख लिहून थिऑसफीची हिंदुवर्माची तरफदारी, त्यांच्या सेंट्रल हिंदुकॉलेजचें राष्ट्रगीत वगैरे गोष्टींचेंही मोठ्या उत्साहानें समर्थन केलेलें आहे.

एकाकाळीं तर लोकमान्य राष्ट्रीय शिक्षणाचा पहिला प्रयत्न सुटल्यावर दुसऱ्या व्यापक प्रमाणावरील प्रयत्नाला भक्कम मदत देण्याच्या विचारांत होते. १९०५ च्या बनारसच्या कांग्रेसच्या वेळींच मालवीयजींचें व टिळक व प्रो. विजापुरकर यांचें बोलणें झालें. त्यामध्यें मालवीयजींनीं आपली कल्पना बोलून दाखवून काम करणाऱ्या माणसांचा अभाव आहे असें कांहीं ते बोलले. त्यावरून टिळक व प्रो. विजापुरकर या उभयतांनीं प्रारंभीं तीन वर्षेंपर्यंत शिक्षकाचें काम करण्याचें कबूल केलें. टिळकांचीं इतर सार्वजनिक कामें आतां पुष्कळच पसरलीं होतीं. असें असूनही आपले सर्व व्यवहार ३ वर्षेंपर्यंत बंद राखण्याला कबूल व्हावें या एकाच गोष्टीवरून टिळकांचें राष्ट्रीय शिक्षणावरील त्यावेळचा भरवसा व प्रेम व्यक्त होतें.

यानंतर प्रत्यक्ष काम करण्याचा प्रसंग लोकमान्यांना आला नाहीं. पण न्यू इंडियाकरितां लिहिलेल्या लेखांतील उध्दृत केलेल्या वाक्यांवरून १९१४ नंतरही त्यांच्या शिक्षण प्रेमाची कल्पना सहज होण्या सारखी आहे. वरील सेंट्रल हिंदु कॉलेज प्रमाणेंच, त्यांच्याच हातानें संगोपन झालेल्या व अकालीं मृत्युनंतर पुनरुजीवनामुळें अधिकच लोकादरास पात्र झालेल्या महाराष्ट्रीय नवीन समर्थ विद्यालयाच्या बाबतींत उल्लेख करावयाचा म्हटला तर या विद्यालयाचे नूतन अध्यक्षांनां लोकमान्यांनीं अगदीं नक्त्याच लिहिलेल्या पत्राचा निर्देश करावयास हरकत नाहीं. हल्लींचें नवीन समर्थ विद्यालय आमच्या पूर्वीच्याच समर्थ विद्यालयाची पुनरावृत्ति असून आमच्याच मतांप्रमाणें व पूर्वीच्याच सर्व तत्त्वांवर चाललेलें आहे अशी माझी खात्री आहे. व म्हणून या विद्यालयाबद्दल माझी सहानुभूति व कळकळ तिळमात्रही कमी झालेली नाहीं. अशा अर्थाचें पत्र लोकमान्यांनीं ४।६ महिन्यापूर्वीच लिहिलें होतें असें म्हटलें म्हणजे त्यांच्या प्रियचळवळींतील एक महत्वाची पण अप्रसिद्ध ऐतिहासिक गोष्ट सांगितल्या सारखें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. पण दुर्दैवानें या राष्ट्रीय पुरुषाच्या अंगीकृत चळवळीच्या इतिहासांतील ही गोष्ट शेवटचीच व्हावयाची होती !

मातृभूमीचा आजन्म सेवक

कै. लो. बाळ गंगाधर टिळक

1920

कै० लो. टिळकांना अर्पिलेली

स्मृति-तिलांजलि.

[लेखक:—प्रो. **वामन मल्हार जोशी**, एम्. ए.]

शिवाजी, रामदास, विष्णुशास्त्री चिपळूणकर, जॉन्सन वर्क, टिळक, गोखले, यांच्यासारख्या थोर विभूतींजवळ पांच मिनिटें बोलण्यास सांपडलीं तर एवढ्याश्या वेळांत देखील तार्किक बुद्धीला चालना देणारें व अंत:करणवृत्तींना शुद्धतर करणारें उच्च शिक्षण किती तरी मिळण्यासारखें असतें. शास्त्रीय ग्रंथांत किंवा वक्तृत्व पूर्ण व्याख्यानांत ज्या गोष्टी समजत नाहींत त्यांचा अशा मुलाखतींत एकदम असा उलगडा होतो कीं तर्काला किंवा हृदयाला जें समाधान पाहिजें असतें तें मिळून जिवाला कृतार्थता वाटते. एका सुभाषितांत असें म्हटलें आहे कीं,

यास्तेषां स्वैरकथास्तान्येव भवानी शास्त्राणि

पण मी म्हणतों कीं, या थोर विभूतींच्या स्वैरकथांची योग्यता शास्त्राहून देखील अधिक आहे. कारण ग्रंथांत बद्ध झालेलें शास्त्र हें पुष्कळ वेळां निर्जीव असतें, त्याच्यांत शंका निवृत्तीला सुलभ साधन नसतें, स्फूर्ति मिळण्याचा संभव फारच कमी असतो व ज्या गोष्टी वाणीच्या व तर्काच्या पलीकडच्या असतात तेथें तर शास्त्रा-ग्रंथांना हातच टेकावे लागतात. विभूतिसमागमाची गोष्ट याहून निराळी आहे. विभूतींच्या एका प्रेमळ शब्दानें किंवा साभिप्राय दृष्टिघातानें किंवा मार्मिकस्मितानें किंवा मौनानें पुष्कळ वेळां

भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यन्ते सर्व संशयाः ।

" हृदयांतली गांठ तुटते व सर्व संशय फिटतात " यांत कांहीं शंका नाहीं.

माझ्या हृदयांतल्या कांहीं कांठी अशाच रीतीनें तुटलेल्या आहेत. एक गांठ टिळकांविषयींच होती. त्यांच्याविषयीं माझ्या मनांत आदरबुद्धिच नव्हे तर पूज्य बुद्धि वसत होती व आहे. पण हृदयांतल्या एका कोंपऱ्यांत अशी एक गांठ बसली होती कीं टिळक हे कितीहि बुद्धिमान्, विद्वान्, देशाभिमानी, स्वार्थत्यागी असले तरी त्यांची प्रकृति (शारीरिक नव्हे तर मानसिक प्रकृति) तर्कप्रधान व कठोर असावी, मनाचें मार्दव त्यांच्यांत बरेंच कमी असावें असा माझा समज होता. ' मराठा ' ऑफिसमध्यें एक वर्षभर काम केल्यावर हा समज दृढ होऊं लागला होता. परंतु त्यानंतर एके दिवशीं-शनिवारीं रात्रीं अकरा बाराच्या सुमारास-' मराठ्यांचीं प्रुफें तपासण्याकरितां मी ऑफिसमध्यें गेलों असतां ते सहज तेथें आले आणि त्यांच्याशीं त्यावेळीं जें संभाषण झालें त्यावरून माझी अशी खात्री आहे कीं लोकोत्तर साधुसंतां-प्रमाणें टिळकांना देखील ' मऊ लोण्याहून आम्ही देवदास । कठीण वज्रास भेदूं

ऐसे ॥ 'असें म्हणण्याचा यथायोग्य अधिकार होता. इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलतां बोलतां जेथें मी बिऱ्हाड करून राहत होतों त्या वाडयाच्या म्हणजे शनिवारांतील तांव्यांच्या वाडयाबद्दलच्या गोष्टी निघाल्या. या वाडयाचा असा कांहीं योगायोग आहे कीं पुण्यांतील कांहीं मोठमोठया व्यक्ति येथें केव्हांना केव्हां तरी राहिलेल्या आहेत. टिळक, आगरकर, गोखले, श्रीधरपंत सदाशिव करंदीकर, शंकरराव लवाटे इत्यादीकांना या घरानें आपल्या छत्राखालीं स्थान दिलेलें आहे. या वाडयाची व तेथील बोळाची गोष्ट निघाल्यावर ओघाओघानें तेथें कांहीं दिवस टिळकांशेजारींच राहत असलेल्या त्यांच्या जिवलग स्नेह्यासंबंधानें, म्हणजे आगरकरांसंबंधानें, गोष्टी निघाल्या व टिळकांनीं आगरकरांना सुधारक कोणत्या परिस्थितींत व कोणत्या कारणास्तव काढावा लागला हें सर्व सांगितलें. तांव्यांच्या वाडयांतील वास्तव्याच्या व आगरकरांच्या जुन्या आठवणी जागृत झाल्यावर, सहसा भावनांना वश न होणारे टिळक, थोडेबहुत देहभान विसरले व आगरकरांविषयीं बोलतांना तर त्यांचें हृदय भरून येत होतें. त्यावेळेस ते काय बोलले हें मला स्पष्टपणें आठवत नाहीं, पण एवढें स्पष्ट आठवतें कीं, आगरकरांचें आणि त्यांचें वर्तमानपत्रांत किती जरी वांकडें दिले तरी टिळकांच्या हृदयाच्या अगदीं आंतल्या गाभ्यांत आगरकरांविषयीं प्रेम व आदर यांशिवाय दुसऱ्या कशाला स्थान जर असतें, तर त्यावेळीं जे माझ्याशीं ज्या रीतीनें ज्या स्वरांत, ज्या कळकळीनें, ज्या उमाळ्यानें बोलत होते तसें बोलणेंच शक्य नव्हतें. टिळकांना मी त्या वेळेपर्यंत भावनावश झालेले कधीं पाहिलेले नव्हते, पण त्यावेळीं त्यांचे हृदय फारच उचंबळून आलेलें दिसलें व त्या हृदयानें डोळ्यांच्याद्वारें आपल्या दिवंगत संवगडयाला जलदान केलें ! गोष्ट क्षुल्लकच आहे पण थोर विभूतींच्या बाह्य आचरणाच्या द्रवशून्य मरुप्रदेशांत स्नेहरसपूर्ण कोमलतेची सरस्वती कशी गूढ स्वरूपांत वसत असते हें माझ्या त्या प्रसंगानें चांगलेंच निदर्शनास आलें.

आगरकर, गोखले वगैरे लोकांशीं टिळकांसारख्या मोठमोठया लोकांचें भांडण तरी कां व्हावें हा प्रश्न माझ्या मनांत वारंवार येत असे. कुत्सितपणा, मत्सर, अनुदारता इत्यादि कारणें अशा उदाहरणांत लागू पडत नाहींत. मतभेद होणें शक्य आहे पण मतभेदामुळें हृदयें कां कलुषित व्हावींत हा माझ्यापुढचा प्रश्न होता, व मी एकदां टिळकांशीं बोलतां बोलतां हा प्रश्न काढला, तात्त्विक दृष्ट्या थोडेंसें विवेचन केल्यावर गंभीर स्वरानें ते मला जें म्हणाले त्याचा आशय असा कीं, " वामनराव, हा प्रश्न केवळ युक्तिवादाचा नाहीं. हा प्रश्न अनुभवाचा आहे. ज्याला ज्याला म्हणून जगांत कांहीं कार्य करावयाचें असतें त्याला आपल्या प्रतिपक्षांचें मन मोडणें प्राप्त होतें. आराम खुर्चीवर बसूनच ज्याला विचार करावयाचा आहे त्याला कोणाचें मन मोडण्याचा प्रसंग येत नाहीं व तो पोकळ पोक्तपणाच्या व तात्त्विक सौजन्याच्या

हजारों गोष्टी सांगूं शकतो. पण आपल्या अंगीकृत कार्याला अडथळा करणाऱ्या, किंबहुना त्या कार्याची नरडी दाबणाऱ्या, प्रतिपक्षाशीं झुंजतांना मनाशीं समतोलपणा राखणें कोणालाहि कठीणच जातें. आपणांला अत्यन्त प्रिय व पूज्य असलेलें कार्य जीवित-संशयांत जो आणतो त्याच्याशीं सख्य राखणें अशक्य नसलें तरी फार कठिण आहे. आपल्याकडचाच हा अनुभव नाहीं तर सगळीकडचा हा अनुभव आहे. तुम्ही आपलेपणा धरून एखादें काम केलें असलेंत तर तुम्हांलाहि असा अनुभव आला असेल व पुनः असें काम करूं लागा म्हणजे तोच अनुभव पुनः येईल.—" आणि तत्पूर्वीच्या व तदनंतरच्या माझ्या अनुभवाच्या व कार्याच्या अल्प आणि आकुंचित क्षेत्रांत मला या गोष्टीची सत्यता पटलेली आहे. धक्काधकीच्या मामल्यांत न शिरणाऱ्यांचें शालोचित पांडित्य काय, किंवा त्यांची सौजन्याची ऐट काय किंवा पोकळ पोक्तपणा काय-सगळीं सारख्याच योग्यतेचीं आहेत. He never made any friends and who never made any enemies-मित्रत्व म्हटलें म्हणजे कोणाचें तरी शत्रुत्व आलेंच-अशा आशयाची जी इंग्रजी म्हण आहे ती पुष्कळच मननीय आहे.

टिळकांच्या लेखांत प्रतिपक्ष्यांना असह्य असें तेज असे, हें कोणालाहि नव्यानें सांगावयास नकोच. सांगोपांग विचार, बिनतोड युक्तिवाद, मुद्देसूद व सरळ मांडणी, सुबोध व कोटिबाज भाषा, इत्यादि गुणांचें मी वर्णन केलेंच पाहिजे असें नाहीं. लेख लिहिण्यापूर्वी त्या त्या विषयावरची हरतऱ्हेची माहिती मिळविण्यांत ते बराच काळ दवडीत असत हेंहि पुष्कळ लोकांना ठाऊक असेलच. पण एखादा अपरिचित व कठीण विषय लोकांना चांगला कळावा, तो त्यांना पटावा, त्यांच्या मनांत तो ठसावा एतदर्थ प्रसंगोचित असे आटपशीर, सुटसुटीत शब्द नवीन बनविण्यांतही थोडाबहुत काळ दडवणें ते कमीपणाचें समजत नव्हते, इतकेंच नव्हे तर हें आपलें कर्तव्य आहे असें ते मानीत, हें कांहीं लोकांना जरी ठाऊक असलें तरी येथें नमूद करण्यास हरकत नाहीं. त्यांच्या सुधारची व प्रागतिक प्रतिपक्षाचें या गोष्टीकडे अक्षम्य दुर्लक्ष होतें व आहे अशी माझी समजूत आहे. गीतारहस्यांतील तत्वविवेचनांत त्यांना कांहीं नवीन शब्द बनवावे लागले.पण हे सर्वच शब्द प्रयत्नाशिवाय त्यांना सुचले—ते त्यांच्या विद्वत्ते मुळें किंवा बुद्धिवैभवामुळें त्यांच्या जिव्हाग्रीं येऊन बसले असें जर कोणी मानीत असेल तर तें अगदीं साफ चुकीचें आहे. " गीतारहस्यांतील कांहीं कांहीं शब्दांकरितां मला दोन दोन- चार चार दिवस घालवावे लागले आहेत " असें ते एकदां मजजवळ बोलले. लेखक म्हणून ज्यांना जगापुढें यावयाचें आहे त्यांनीं ही गोष्ट ध्यानांत धरली तर त्यांचें हित होण्याचा संभव आहे. पण याहून महत्वाची एक गोष्ट आहे, आणि ती ही कीं ज्याविषयांवर आपणांस लिहावयाचें त्या विषयाबद्दल आपणांस इतकी आस्था

आणि कळकळ असली पाहिजे कीं त्यासंबंधानें बोलतांना किंवा लिहितांना आपण त्याच्याशीं क्षणभर तरी तन्मय होऊन गेलें पाहिजे. लेख लिहितांना टिळक कित्येक वेळां तन्मय होऊन जात याचा एक चमत्कारिक अनुभव मला एकदां आला.

मद्रासच्या कायदेकौन्सिलपुढें आलेल्या एका विषयासंबंधानें 'मराठ्याकरितां स्फुट लिहावयाचें होतें. त्या संबंधानें मला माहिती देण्याकरितां व विचाराची दिशा दाखविण्याकरितां ते ऑफिसांत आल्यावर आमची थोडीबहुत त्या विषयावर चर्चा झाली; पण माझ्या मंदबुद्धीमुळें म्हणा, मला विचाराची ती दिशा चांगलीशी पटेना, व आमचा थोडासा वादविवाद झाला. माझी समजूत घालीत बसण्यापेक्षां स्वतःच स्फुट लिहून टाकलेलें बरें असा विचार करून ते लवकरच निघून गेले व कांहीं वेळानें मी त्यांचेकडे तें स्फुट मागण्याकरितां गेलों. ते त्यावेळीं आपल्या लेखकाला तेंच स्फुट तोंडानें सांगत होते व लेखाचा प्रवाह प्रतिपक्ष्याचें म्हणणें खोडून काढण्याच्या भर रंगांत आलेला होता.

'स्फुट लिहून झालें का ?' असें मी विचारलें असेल नसेल, तोंच त्याविषयांसंबंधानें मला मूर्तिमंत प्रतिपक्ष समजून ते इतक्या उत्साहानें, जोरानें व आवेशानें किंबहुना संतापानें, बोलूं लागले कीं माझें वादात्मक जीवित त्या विषयापुरतें व त्या वेळेपुरतें तरी मूर्छित झालें. मद्रासच्या कायदेकौन्सिलांत बिल आणणारा बाजूला राहिला, पण त्याच्यावरच्या आणि त्या बिलावरच्या सगळ्या रागाची आग क्षणभर माझ्यासारख्या गरिबाला सहन करावी लागली ! सांगण्याचा मतलब एवढाच कीं विषयाशीं थोडेबहुत मानानें त्यांची अशी तन्मयता होत असे.

या कारणाची जोड विद्वत्व, कुशाग्रबुद्धित्व इत्यादि कारणांस मिळाल्यामुळेंच त्यांच्या लेखांमध्यें, प्रतिपक्षांना तापदायक होणार तेज दृग्गोचर होत असे.

\+ \+ \+ \+

ही स्मृतितिलांजलि त्यांच्या आत्माकडे पोंचती होईल काय ? माझ्या हातून त्यांचे अनेक लहान मोठे अपराध घडले असतील; त्यांबद्दल क्षमा मागण्याची संधि ईश्वरानें दिली नाहींच. पण त्यांच्या आत्म्याला इह जगतांतील गोष्टी कळत असतील व पोंचत असतील तर त्यांनीं मला क्षमा करून प्रेमानें अर्पिलेल्या या स्मृतितिलांजलीचा स्वीकार करावा व सदैव कृपादृष्टि ठेवावी एवढें लिहून हा लहानसा लेख संपवितों.

लोकमान्याचा एक संवाद.

[लेखक—रा. रा. आप्पाजी विष्णु कुळकर्णी]

लोकमान्य टिळक यांचे खासगी संवाद नेहमीं उत्साहजनक व उद्बोधक असत. त्यांत ऐकणाराला कांहीं तरी नवी माहिती मिळावयाचीच. लोकांची विचारशक्ति जागृत करून विचारांना चक्रीन वळण लावण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. अशा प्रकारचे कांहीं संवाद मी पूर्वी "लो. टिळक यांचीं गेलीं आठ वर्षें १९००–०८" या पुस्तकांत दिले आहेत. आज तशाच प्रकारचा एक नवीन संवाद स्मरणानें येथें देत आहे. " गीतारहस्य" प्रसिद्ध झाल्यानंतर लोकमान्यांच्या भेटीला मी एकदां गेलों होतों. बहुधा तो दिवस रविवारचा असून ता. १९।९।१५ ही असावी. त्याचेळीं " लोकशिक्षण" मासिक पुस्तकाचे संपादक कै. रा. रा. जनार्दन विनायक ओक व साताऱ्याकडील वकील रा. रा. अष्टपुत्रे यांच्याशीं ' गीतारहस्यां'तील कांहीं सिद्धांतासंबंधानें चर्चा चालली होती. प्रश्नोत्तरेंही बरींच झालीं. त्यावेळीं लोकमान्यांनीं जे विचार प्रगट केले त्यांचा आशय पुढें देतों:--

लोकमान्य०--गीता ही चातुर्वर्ण्यकरितांच आहे असें नाहीं, तर ती सर्व वर्णांकरितां आहे; किंबहुना मानवजातीकरतां ती आहे असें म्हटलें तरी चालेल. मनुष्याचें वर्तन अति उच्च दर्जाचें कसें असलें पाहिजे याचेंच तात्विकदृष्ट्या विवेचन करण्याचा गीतेचा हेतु आहे. श्रीकृष्णाचे वेळीं चातुर्वर्ण्याची पद्धत प्रत्यक्ष पुढें होती, म्हणूनच तिची त्यानीं गीतेंत संगती लाविली. समाजांत जी वर्णव्यवस्था अमलांत असते, तिचेंच निरीक्षण करून मनुष्य त्यापासून चांगले वाईट सिद्धांत ठरवीत असतो. आणि तुम्हीं कोठेंही जा, तेथें कोणत्याना कोणत्या तरी प्रकारची चातुर्वर्ण्यासारखी अगर तशाच धर्तीवरची वर्णव्यवस्था तुमच्या दृष्टीस पडेल.

प्रश्न–भगवद्गीतेंत ज्या प्रकारची चातुर्वर्ण्याची पद्धत सांगितली आहे तशी जेथें नाहीं तेथें गीता काय म्हणणार ? व तेथील समाजास उत्तम प्रकारचीं नीतिबंधनें कोणतीं ठरणार ?

उत्तर–चातुर्वर्ण्याची व्यवस्था ज्या ठिकाणीं नव्हती असे प्रांत आर्यांचे वेळीं होते. अफगाणिस्थानचेंच उदाहरण घ्याना. तेथें ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशा प्रकारची इकडील समजुती प्रमाणेंच कोठें वर्णव्यवस्था होती ? पण ही व्यवस्था नसली आणि जरी त्यांना पूर्वी म्लेंछ हें नांव देत असत, तरी त्यांच्याकरितां म्हणून कांहीं

तरी नीतीचीं उच्च तत्वें पाहिजेतच. आणि सर्वांनांच लागू पडतील अशीं उच्च नीतितत्वें आमच्या प्राचीन धर्मांत असल्यामुळें तो धर्म किंवा त्यांतील तत्वज्ञान व्यापक स्वरूपाचें झालें. अहिंसा, सत्य, अस्तेय, सर्वभूतहित, अशा प्रकारचीं सर्वसाधारण तत्वें कोणत्याही समाजास लागू पडतात; व तेवढींच घेतलीं तरी बस्स आहेत.

प्रश्न-मोक्षाला कोण पात्र आहे ? चातुर्वर्ण्यांतील एकाद्या वर्णांतच मनुष्य जन्मलेला असला पाहिजे कीं तो कोठेंही जन्माला येवो ?

उत्तर-ज्याच्या मनाची शुद्धावस्था झाली तो मोक्षास पात्र झाला. मग तो ब्राम्हण असो, क्षत्रिय असो शूद्र असो किंवा कोणीही असो. आतां पूर्वसंस्कार म्हणून कांहीं आहे. त्याप्रमाणें पाहिलें तर तात्विकदृष्ट्या शूद्राचा ब्राह्मण होण्यास वेळ लागेल. व मनुष्य ब्राह्मण जातींत जरी जन्माला नाहीं आला-आणि ब्राह्मण जातींतही जन्माला येऊन तो जर भ्रष्ट झालेला असेल तर ब्राह्मणजातींत आला म्हणण्यांत तरी काय अर्थ आहे ?-तरी मनाची पूर्ण शुद्धावस्था झाली कीं, त्याला मोक्ष मिळालाच पाहिजे. आतां ही शुद्धावस्था येण्यास अनेक जन्म लागतील किंवा कोणी उपजतच या जन्मांत शुद्ध असूं शकेल. अहो, कोणत्याही समाजांत कोणत्याही वेळीं कमजास्त दर्जाचे लोक असतातच. श्रुतींच्या वेळीं जो समाज होता तसाच कांहीं पुढें राहिला नाहीं. अर्थात् श्रुतीनंतर ब्रह्मसूत्रांत त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीचा त्यांनीं समावेश केला; व पुढें गीतेच्या वेळीं त्या कालाच्या स्थितीचा विचार करून व्यापक रीतीनें सर्वांचा समावेश करतां येईल. अशारीतीनें त्यांतील विवेचनाची व सिद्धांताची मांडणी करण्यांत आली. शूद्र, स्त्री, चांडाल, पापयोनी यांपैकीं कोणीही असो, मन शुद्ध होऊन माझा आश्रय केला कीं, " तेऽपि यांति परांगतिम् " असेंच भगवंतांनीं म्हटलें आहे.

प्रश्न-प्रवाह पतित कर्म करणें योग्य म्हणतां. पण एखाद्याचा धंदा जन्मापासून चोरी करण्याचाच आहे किंवा ठग वगैरे जातींत जन्मलेला मनुष्य म्हणेल कीं, चोरी-करणेंच माझें काम आहे. मग असा मनुष्य मुक्त होईल का ?

उत्तर-मनाची शुद्धता झाल्याशिवाय कांहींएक होणार नाहीं. आतां मनाची शुद्धता झाल्यावर एखादा योग्य प्रसंग प्राप्त झाला म्हणजे मग मनुष्याला त्याप्रमाणें वागलेंच पाहिजे. नाहीं तर समाजाची घडी बिघडेल. भीष्मांना असा प्रसंग नव्हता का आला ? एका पक्षास मिळून कर्तव्य करणें त्यांना भाग झालें. लॉर्ड रॉबर्टसचेंच उदाहरण घ्यांना. बोअरयुद्ध करूं नये असें त्यांचें मत होतें. पण राष्ट्र युद्धाला तयार झाल्यावर आपल्या राष्ट्राचा हुकूम त्यांना मानणें भाग पडून कर्तव्य करावें लागलें.

' अलौकिक पुढारी '

[लेखक:–रा. रा. म. दा. टेंबें एम्. ए. एल् एल् बी.]

' Educate, Agitate and organise '

LOK. TILAK'S MANIFESTO.

' उत्तिष्ठ, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत । ' कठोपनिषद्

लोकमान्य टिळक हे एक अद्वितीय पुढारी होऊन गेले, याबद्दल त्यांचे मित्र व चहाते आणि प्रतिस्पर्धी यांचें एकमत आहे. गेल्या शंभर वर्षांत त्यांच्या सारखा पुढारी हिंदुस्थानांत निपजला नाही असें रँग्लर परांजपे म्हणतात. तर ना. कामत हे त्यांना सर्व हिंदी पुढाऱ्यांत प्रथमस्थान देतात. हें स्पृहणीय पद लोकमान्यास कसें प्राप्त झालें, त्यांच्या अलौकिक पुढारीपणाचें बीज कशांत आहे हें येथें थोडक्यांत सांगावयाचें योजिलें आहे.

टिळकांच्या लोकमान्यतेस त्यांची अपूर्व देशभक्ति, त्यांचा स्वार्थत्याग, त्यांची निष्कामकर्मनिष्ठा, साधी रहाणी व उच्च विचारसरणी हीं सर्व कारण आहेतच. पण एवढ्यामुळेंच त्यांचें इतर पुढाऱ्यांपासून वैशिष्ट्य सिद्ध होत नाहीं. इतर लोकनायकांचे ठिकाणीं सुद्धां हे गुण कमीअधिक प्रमाणानें वसत आहेत. किंबा लोकशाहीच्या नेत्यांचे ठिकाणीं वरील गुणांपैकीं एक अथवा अनेक गुण वास करित असल्याशिवाय त्यांचें पुढारीपण व्यर्थ होय. टिळकांना ' अनभिषिक्त राजा, ' ' राष्ट्रसूत्रधार, ' लोकमान्य ' वगैरे विशेषणें लावण्यांत येतात तीं त्यांच्या उच्च ध्येयामुळें तर खरींच, पण तें ध्येय व्यवहाराच्या आटोक्यांत आणून तें गांठण्याची जी त्यांची प्रयत्न पद्धति तिजमुळेंच त्यांचें ' अद्वितीयत्व ' सिद्ध होतें. टिळक हे खरे लोकनायक (Tribune of the poeple) होते. तशी त्यांची बुद्धि ही शोधक होती. ते जन्म सिद्ध पुढारी होते. अशा जन्मतःच पुढारीपण गाजविण्यास अवतरलेल्या शोधक बुद्धीच्या पुढाऱ्यास इतरांनीं ' चोखाळलेले मार्ग विशेष पसंत नसावे, व त्यानें आपला असा निराळाच मार्ग काढावा हे त्यांच्या कल्पकतेस (originality) साजेसेंच झालें. टिळक हे जन्मसिद्ध पुढारी असल्याकारणानें त्यांनीं दुसऱ्याचें अनुकरण करावें हें शक्यच नव्हतें, तर आपला पूर्ण विचारांतीं ठरविलेला मार्ग त्यांनीं पत्करिला व सर्व हिंदी जनतेस आपल्या पावलावर पावलें टाकीत येण्यास भाग पाडलें असें एका आंग्ल-हिंदी पत्रानें त्यांजविषयीं म्हटलें आहे तें यथार्थ आहे.

ब्रिटिश अंमल इकडे सुरू झाल्यापासून अनेक लोकनायक होऊन गेले. त्यांनीं पाश्चात्य राज्यपद्धतीचेंज्ञान आपल्या इतर भावंडांस करून देण्याचे प्रयत्न केले, पण त्यांचें क्षेत्र अगदीं संकुचित होतें. ज्यांना अगोदरच इंग्रजी शिक्षण मिळालें आहे व ज्यांना पाश्चात्य चालीरीतीची थोडीशी माहिती आहे, अशा सुशिक्षित समाजामध्येंच केवळ त्यांनीं आपली चळवळ चालविली. त्यामुळें अशी असंगति होऊं लागली कीं, जे इंग्रजी शिकलेले नव्हते किंवा जे निवळ अक्षरशत्रू होते, त्यांना हे आपले शिकलेले पुढारी काय म्हणतात हें कळत नसे. आपले ज्ञातीबंधु आपणास राजकीय हक्क मिळावे म्हणून सरकाराजवळ मागणी करीत आहेत याचें त्यांना ज्ञान नव्हतें. आतां हे सर्व पुढारी आपल्या अज्ञ देशबांधवांच्या हिताकरतांच झटत होते, व हिंदीलोकांचा दर्जा ब्रिटिश प्रजाजनांच्या दर्जाशीं समान व्हावा हीच त्यांची खटपट होती याबद्दल तिळप्राय शंका नाहीं. पण पुढारी व जनता यांची तोंडमिळवणी होत नसे, पुढाऱ्यांची भाषा जनतेला समजत नसे. जनतेला आपणांस काय पाहिजे हें पुढाऱ्यांस सांगतां येत नसे. पुढारी इंग्रजींत बोलणार तर जनतेला आपल्या मायभाषेवांचून दुसरी भाषा माहीत नाहीं. पुढारी फक्त कांहीं प्रमुख शहरांमध्यें चळवळ करणार तर जनता शहरापासून शेंदोनशें मैल लांब राहणारा, पुढाऱ्यांच्या चालीरीति भिन्न व सुधारलेल्या तर जनता अज्ञ व गांवढळ. अशा परिस्थितींत पुढारी व जनता यांची भेट न झाल्यास आश्चर्य नाहीं. याचा परिणाम असा होई कीं, आमचे हितशत्रू जे कांहीं आंग्लहिंदी बंधु त्यांनीं अशी कोल्हेकुई करण्यास सुरुवात केली कीं, हिंदीसमाजाचे खरे कैवारी हे मूठभर शिकलेले लोक नसून सहा हजार मैलांवरून आलेले आंग्लो इंडियन हेच-हिंदुस्थानांतील असंख्य मूकजनांचे (dumb millions) खरे कैपक्षी होत. या आरोपांत विशेष अर्थ नव्हता हें झालेंच. तरीपण वरील परिस्थितींत अशा तऱ्हेचा आरोप आमचे हितशत्रूंकडून येण्यास जागा होती एवढें बरीक खरें आहे.

लो. टिळकांनीं राजकारणाच्या आखाड्यांत उडी टाकिली आणि ही सर्व परीस्थिति पार बदलली. हिंदी लोकांची सध्यांची परिस्थिति कशी आहे, हल्लीं राज्यपद्धति कशा तऱ्हेची आहे, तींत दोष काय आहेत व ते नाहींसे कसे करावयाचे वगैरे गोष्टी हिंदी लोकांस त्यांचेकडे जाऊन, त्यांच्यांत मिळून मिसळून त्यांना समजावून देणें हें काम टिळकांनीं आपल्या आंगावर घेतलें. टिळक हे लोकांत वागलेले, वावरलेले व त्यांच्याचकरितां केवळ अवतरलेले 'lived and moved and had being ') असे पुरुष होते. हिंदी राजकारण लोकांस समजून देणें व 'सकळजनांस शहाण करून सोडणें' हें राष्ट्रीय कार्य त्यांनीं अंगिकारिलें. बहुजनसमाज हा एकाद्या पर्वताप्रमाणें अचल असतो. टिळकांनीं पाहिलें कीं, जर जनतेंत जागृति उत्पन्न करावयाची तर आपण होऊन महंमदाप्रमाणें जनतेकडे गेलें पाहिजे, जनता आपलेकडे येईल ही आशा व्यर्थ होय. शिवाय लोकांस नवीन परिस्थितीचें ज्ञान करून द्यावयाचें

तर तें त्यांच्या मातृभाषेंतून दिलें पाहिजे. लोकांच्या आकांक्षा, त्यांचे ग्रह, त्यांच्या मनोभावना, त्यांच्या चालीरीति यांना योग्य तो मान देऊन त्यांचे पाऊल एकसारखें पुढेंच पडेल अशी परिस्थिति उत्पन्न करणें म्हटलें म्हणजे पुढाऱ्याचें आंगीं कल्पक-बुद्धि, प्रतिभा व मनुष्य स्वभावाचें ज्ञान अवश्य लागतें.हें सर्व गुण टिळकांचे ठिकाणीं होतें, हें त्यांच्या निरनिराळ्या ठिकाणच्या व्याख्यानाच्या मोहिमीवरून सिद्ध होतें. पूर्वी लोकपक्षाचा पुढारी जन्मांत कधींहि लाभ नसेल अशा ठिकाणीं जाऊन टिळकांनीं लोकशिक्षणाचें कार्य बजाविलें आहे. पूर्वीचे पुढारी फारतर जिल्हाच्या ठिकाणीं दृष्टीस पडावयाचे. पण तेंच टिळक हे पांचपन्नास झोंपडया मिळून झालेलें एकादें खेडेगांवहि आपल्या कार्यक्रमांत वगळत नसत. आजपर्यंत झालेल्या लोकनायकांत टिळकाइतका हिंदुस्थानांत निरनिराळ्या भागांत फिरलेला पुढारी दुसरा नाहीं. या प्रवासानें त्यांना हिंदीसमाजाचें पूर्ण ज्ञान झालें होतें. याप्रमाणें हिंदी जनतेची नाडी आपले हातांत धरून कोणतेंहि नवीन कार्य पत्करिण्यास तें केव्हांहि मागें घेत नसत. त्यांनीं एकदां जें पाऊल टाकिलें तें केव्हां व कोणत्याहि सबबीवर परत घेतलें नाहीं. त्यांची जनतेशीं बोलण्याची भाषा म्हणजे त्यांची जन्मभाषाच होय. परभाषेंत तें अगत्यावांचून बोलत नसत. लोकांस हल्लींच्या परिस्थितीचें शिक्षण द्यावयाचें तर तें त्यांच्या भाषेंत त्यांना समजेल अशा सोप्या शब्दांत त्यांच्याच घरगुती दाखल्यानीं दिलें पाहिजे म्हणजे त्यांना पटेल, एरव्हीं पटणार नाहीं. लहान मुलांप्रमाणेंच अज्ञसमाजाची ग्रहण शक्ति कमी असते तेव्हां शिकलेल्या लोकांपुढें आपण जसें बोलतों तसें त्यांजपुढें बोलून त्यांना कळणार नाहीं हें प्रथम लो. टिळकांनीं ताडलें. समाजामध्यें व पुढाऱ्यामध्यें त्यांच्या शिक्षणाच्या तफावतीमुळें जो भिन्नभाव वाटतो, जो परकेपणा माजतो तो दूर करून बहुजन समाजास आपल्या पोटांत घेऊन आपल्या विषयीं विश्वास उत्पन्न करून दिल्यावांचून पुढाऱ्यांची व जनतेची योग्य रीतीनें तोंड मिळवणी व्हावयाची नाहीं हें टिळक जाणून होते. अज्ञसमाजांत जाऊन त्यांचेंच दाखले देऊन त्यांना आपल्या राष्ट्रीय कार्याकडे वळविण्याचें प्रचंड काम टिळकां इतके दुसऱ्या कोणत्याहि हिंदी पुढाऱ्यानें केलें नाहीं. याबद्दल दोन तीन उदाहरणें देतों म्हणजे या बाबतींत टिळक व इतर पुढारी यांजमधील अंतर कळून येईल. एकादा आंकडेशास्त्री शिकलेला व शहरामध्येंच वावरलेला पुढारी हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें वर्णन करतांना असें म्हणेल ' हिंदुस्थानांतील तीस कोटि प्रजेपैकीं चार कोटि प्रजेस एक वेळच जेवून गुजराणा करावा लागतो असें वुइल्यम सर हंटर साहेब म्हणतात, आंत अशिक्षित लोकांस तो हंटरसाहेब आणि ती त्याची सहा कोटि प्रजा यांचें ज्ञान काय होय ? याबद्दल त्या लोकांस असें विचारिलें कीं तुम्हांस रोज वेळेवर चतकोर भाकरी तरि मिळते काय ? कीं त्यांना हा प्रश्न लागलाच पटतो व ते माना डोलवं लागतात. लो.टिळकांची आपण ज्या समाजामध्यें

बोलतों त्या समाजास आपले पोटांत घेऊन त्यांज मध्यें आपल्या विषयीं विश्वास उत्पन्न करण्याची शैली कुवक्ष अपूर्व होती. या बद्दल मी स्वतः पाहिलेंला असा एक दृष्टान्त देतों. लो. १९१७ च्या उन्हाळ्यांत सातारा जिल्हापैकीं लिंब गोवयास गेले होते. तेथें त्यांनीं एक स्वराज्यावर व्याख्यान दिलें. समाज दोन तीन हजार असेल. तो बहुतेक सर्व अशिक्षित शेतकरी वर्गातीलच होता. हे लोक टिळक म्हणजे कोणी देवमाणूस आहे व तो आपल्याशीं प्रत्यक्ष बोलायचासुद्धां नाहीं व राजाप्रमाणें केवळ ' अदृष्य ' (unapproachable) असावयाचा अशी मनाची पक्की समजूत करून घेऊन आलेले. त्यांचे चेहऱ्यावर भीति व आदर याची छटा दिसत होती. टिळकानीं आपल्या भाषणास आरंभ केला. मी त्यांचे जवळच मेजाशीं बसलेलों असल्यामुळें त्यांचे शब्द स्पष्ट ऐकावयास मिळून त्याचा समाजावर काय परिणाम झाला हें पहावयास मिळालें. टिळक म्हणाले–' मी कोणी मोठा माणूस आहे असें तुम्हीं समजूं नका तुम्ही जसें काबाडकष्ट करून पोट भरतां तसा मीहि कष्ट करूनच पोट भरतों. तुम्हीं नांगर घेऊन जमीन नांगरतां तर मी लेखणी घेऊन खडें घाशी करितों तुमच्या माझ्या कपडयांतहि फरक नाहीं. तुम्ही खादीची बंडी घालतां तर मीहि तसाच अंगरखा घालतों, तुम्ही डोक्याला मुंडासें गुंडाळतां तसें मीहि माझे डोक्यावर मुंडासें टेवितों. फरक इतकाच कीं तुम्ही खेडेखांवात रहात असल्यामुळें तुमचें मुंडासें जरासें मळकट असेल तर माझें तुमच्यापेक्षां कांहींस स्वच्छ असेल. ' एवढी प्रस्तावना झाली तोंच सर्व शेतकरीं समाजानें आपल्या माना डोलवून लोकमान्यांच्या म्हणण्यास आपली पसंति दाखविली. याप्रमाणें टिळकानीं श्रोतृवर्गास आपल्याशीं तादात्म्य पावण्यास लावून त्यांना त्यांच्याच भाषेंत कुणबट दृष्टांतानींच स्वराज्याची कल्पना पटवून दिली. अशा रीतीनें जो समाजव्याख्यानापूर्वी भीत्यादरानीं प्रेरित होऊन दूर राहिला होता तोच व्याख्यानानंतर लोकमान्याशीं एक जीव झाला. हीच प्रचीति टिळकांच्या प्रत्येक ठिकाणच्या दौऱ्याची होत असे यामुळें बहुजनसमाज टिळकांना आपला कैवारी, मित्र, देशिक असें मानीत. पृथ्वीवर कोठेंहि जाऊन पहा अशिक्षित समाज हा कृतज्ञ असतो. आपल्या हक्काकरितां कोण खरोखर भांडत आहे हें तो तत्काळ ओळखतो व त्या माणसाबद्दल कृतज्ञता प्रगट करितो. लो. टिळक हेच आपले खरे नेते आहेत, तेच आपली बाजू घेऊन सरकारशीं भांडतात व तेच संकटसमयीं आपले कैपक्षी आहेत हे जनतेनें आज कित्येक वर्षांच्या अनुभवानें ताडिलें आहे. टिळकांचें लोकमान्यत्व यांतच आहे. ज्याप्रमाणें बहुजनसमाजाला टिळकांनीं वळोवेळीं मदत केली आहे त्याप्रमाणेंच जनतेनेंहि लोकमान्यांच्या संकटसमयीं त्यांजबद्दल आपली सक्रिय सहानुभूति दाखविली आहे. अशी टिळकांची व जनतेची परस्पर सहकारिता होती.

लो. टिळकानीं बहुजनसमाजांत प्रचलित राजकारणाचें ज्ञान होण्यास जितका हातभार लाविला आहे तितका दुसऱ्या कोणत्याहि हिंदी पुढाऱ्यानें लाविला नसेल. किंबहुना खेडेपाडीं राजकारण बळावण्यास टिळकच कारण होत. ज्या कल्पना नुसत्या ऐकूनहि माहीत नव्हत्या त्या लोकमान्यानीं खेडवळ बंधूंस पूर्ण परिचयाच्या करून देऊन त्या आंगीं पचविण्याची धमक उत्पन्न केली आहे. दहापांच वर्षांमागें 'स्वराज्य' या शब्दाचा अर्थहि कोणास माहीत नव्हता पण तोच शब्द आतां हिंदुस्थानांत लोकांच्या तोंडीं झाला आहे. स्वराज्य शब्द उच्चारणें म्हणजे ब्रिटिशराज्याविरुद्ध मोठा गुन्हा करणें होय असें पूर्वीं समजलें जात असे तेंच आतां स्वराज्याची कोणी गुढी उभारिली तरी त्याचा हात धरण्यास कोणी येणार नाहीं. याचें सर्व श्रेय लो. टिळकांच्या आत्यंतिक श्रमांसच दिलें पाहिजे. त्यानीं आपल्या आयुष्यभर, स्वराज्याचा जो लढा चालविला त्याचें फळ आतां त्यांच्या देशबंधूंस मिळण्याचा योग आला आहे. लोकमान्यानीं जरी स्वतः डोळ्यानीं स्वराज्य स्थापन झालेलें पाहिलें नाहीं तरी आपल्या उच्चासनावरून त्यानीं त्याचें भाकीत केलें आहे. व तें खरें झाल्यावांचून रहावयाचें नाहीं. लोकांनीं खटपट करण्याचें मात्र सोडतां कामा नये.

टिळकांच्या अलौकिक मान्यतेचें आणखी एक कारण म्हणजे त्यांची कार्यक्षमता हें होय. कोणचाहि राजकीय अगर दुसरा प्रश्न एकदां हातीं घेतला म्हणजे तो तडीस नेल्यावांचून विश्रांति म्हणून घ्यावयाची नाहीं असा त्यांचा बाणा होता. 'न हि श्रांतस्य ऋते सख्याय देवः,' श्रम केल्यावांचून देवांशीं सख्य जडत नाहीं, हें वचन त्यांचें आवडतें होतें. गीतारहस्य याच उद्देशानें त्यांनीं लिहिलें आहे. त्या ग्रंथास ते 'कर्मयोग शास्त्र' म्हणतात त्यावरून त्यांची मनोभूमिका चांगली कळून येते. त्यांनीं लोकशाही पक्षाचें जें जाहीर पत्रक प्रसिद्ध केलें आहे त्यांतहि त्यांचा जनतेस अशीच शिकवण आहे--' Educate, agitate and organise ' म्हणजे लुसऱ्यांस शहाणे करा, चळवळ करा पण ती संघरूपानें करा. कोणालाहि प्रचलित राजकारणाचा विषय ते इतर मुत्सद्याप्रमाणें बैठकीवर बसून (armchair politician) फावल्यावेळीं वादविवादाकरितां घेत नसत, तर राजकारण हें त्यांच्या आयुष्याचें ध्येय होतें. राष्ट्रीय सभेला जावयाचें तें वर्षांतूनएक आठवडा आपलें पांडित्य व वक्तृत्व जगापुढें दाखविण्याकरितां नसून तेथें जे ठराव पसार होतील ते अमलात आणून देशाचें पाऊल पुढें पडेल अशी परिस्थिती उत्पन्न करावयाची, यासाठीं होय, हें ते जाणून होते. प्रथम प्रथम त्यांचा पक्ष राष्ट्रींयसभेंत कमजोर होता म्हणून त्यांना राष्ट्रीय सभा कार्यक्षम करितां आली नाहीं. पण जेव्हां १९१६ सालीं लखनौस त्यानीं राष्ट्रीयसभा आपल्या पूर्णपणें कबजांत आणिली तेव्हांपासून तिचे पूर्वीचें केवळ बावदूकपणाचें स्वरूप जाऊन ती कार्यशील बनली. राष्ट्रीय सभा वर्षाचे अखे-

रीस जे ठराव पास करील त्यांचा अंमल देशांत सर्व ठिकाणीं व्हावा, जनतेस त्याचें शिक्षण मिळावें व राष्ट्रीयसभा ही खरोखर लोकसभा Parliament आहे असें सिद्ध व्हावें म्हणून टिळकानीं ठिकठिकाणीं, जिल्हा निहाय कॉंग्रेस कमिट्या, तालुका कॉंग्रेस कमिट्या वगैरे स्थापण्यास लोकांस उत्तेजन दिलें. शिवाय राष्ट्रीय सभेचें कार्य व उद्दिष्ट स्वतंत्रपणें लोकांत फैलवावें, म्हणून त्यानीं स्वराज्य संघ स्थापिला व त्याच्या अनेक शाखा देश भर उत्पन्न झाल्या. स्वराज्याबद्दलची त्यांची खटपट व चिकाटी पाहिली तर असें म्हणावें लागतें कीं, लोकमान्यानीं अर्धशतकाचें कार्य अवघ्या दोनतीन वर्षांत घडवून आणिलें. हीच कार्यक्षमता त्यांचे इतर व्यवसायांत दिसून येतें आणि हेंच त्यांच्या आयुष्यांतील यशाचें बीज होय आणि केवळ याचमुळें ते लोकमान्यतेस चढले.

लोकमान्य हे पूर्ण कर्मयोगी होते. त्यांचें सर्व आयुष्य म्हणजे कर्मयोगाचा एक जिवंत दाखला होता. गीतारहस्य वाचतांना ठिकठिकाणीं असें वाटतें कीं, लोकमान्य हे स्वतःचें चरित्र–स्वतःचा अनुभव–त्यांत सांगत आहेत कीं काय ? ' असंतोषः श्रियो मूलं । ' या चरणाचा त्यांनीं असंतोष हा सर्व भावी उत्कर्षाचें, प्रयत्नाचें, ऐश्वर्याचें व मोक्षाचेंहि बीज आहे ' (पृ. १०९) असा गीतारहस्यांत जो अर्थ केला आहे तो त्यांच्या चरित्रावरून तंतोतंत खरा ठरतो. वरील वचन हें त्यांच्या आयुष्याचें ध्रुपद आहे. राजकारण करणारे तेवढे सर्व क्षत्रिय होत, मग जातीनें ते कोणीही असोत. तेव्हां राजकीय चळवळींत संतुष्टपणा केव्हांहि उपयोगी नाहीं. जेवढें मिळेल तेवढें पदरांत घेऊन बाकीच्याबद्दल एकसारखी चळवळ चालविली पाहिजे. संतुष्टपणा हा क्षात्रवृत्तीचा नाशक आहे. तेव्हां सतत एकसारखी चळवळ चालूं ठेवा ही लोकमान्यांची शिकवण प्रत्येकानें ध्यानांत ठेवून त्यांचें कार्य पुढें चालू ठेविल्यास त्यांचें ऋण फेडल्यासारखें होईल.



लो. खापर्डे. लो. बा. गं. टिळक.

शेवटचें दर्शन

स्वर्गस्थ लो. बाल गंगाधर तिलक, (पुना).
THE LATE BAL GANGADHAR TILAK
Born. 23-7-1856. Died 1-8-1920.

उषःकाल-माला. ऑगस्ट १९२०

लोकमान्यांचे निधन.

लेखक:—रा. रा. श्रीधर बळवंत टिळक.

"Nature might stand up
And say to all the world, 'this was a man'!"

Shakespear.

" What a pity is it–
That we can die but once to serve our country!"

Addison.

रविवार ता. १ आगष्ट १९२० रोजीं लोकमान्य टिळकांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली! स्वराज्य प्राप्त्यर्थ हिंदुस्थानचा साम्राज्य सरकारशी गेली ४० वर्षे सतत जो झगडा चालू आहे त्यांत आजपर्यंत लहान सहान कित्येक प्यादी हारवली परंतु येवढा मोठा मोहरा मात्र पूर्वी कधीही इरेस पडला नव्हता. स्वराज्य अद्याप दूरच आहे; इतकेच नव्हें तर ते लवकर हस्तगत होण्याची तूर्त तरी कांहींएक चिन्हें दिसत नाहीत. आणि स्वराज्य मिळेपर्यंत नेहमींच वेळ आणिबाणीची राहणार ही गोष्ट निर्विवाद आहे. अर्थात अशा ऐन अडचणीच्या वेळीं लोकमान्यांच्या सल्लामसलतीस आपण आंचवलो हे राष्ट्राचे केवढे दुर्भाग्य! होवून चुकली, आतां धीर सोडून काय उपयोग? हा झंगडा असाच दृढनिश्चयानें, नेटानें व एकजुटीनें पुढें चालूं ठेविणें हे देशांतील तरुण पिढीचे कर्तव्य होय. एरव्हीं देशाच्या अभ्युदयाची गोष्टच बोलावयास नको. लोकमान्यांच्या चळवळीचे लोण शेवटच्या पाटींत शक्य तितक्या लवकर पोचविल्याखेरीज आपला तरणोपाय नाहीं. लोकमान्यांचे डोळे त्यांच्या पश्चात आपण काय करतो इकडे अद्यापही लागून राहिलेले आहेत.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

हे लोकमान्यांच्या तोंडचे अखेरचे उद्गार होत. याचा सरळ अर्थ असा कीं, आपण आपले कर्तव्य बजावण्यांस चुकलो तर लोकमान्य, हातीं घेतलेले अवतारकृत्य शेवटास नेण्याकरितां या आपल्या हातभागी हिंदुस्थानांत पुनः जन्मास येणार.

स्वराज्य मिळविणें–आणि तेही शक्य तितके लवकर मिळविणें हे एकच अढळ ध्येय लोकमान्यांनीं स्वतःचें आयुष्यांत एकनिष्टपणानें डोळ्यापुढें ठेविले होते. त्यांनीं जो मंत्र कंठ खानें लोकांस शिकविला तो हा कीं, स्वराज्यप्राप्त्यर्थ देशांत व देशाबाहेर ' चळवळ करा !' "चळवळ करा ! अर्थात् त्यांचे शिकवणीप्रमाणें आपण वागले पाहिजे. १९०८ सालीं त्यानां शिक्षा झाली त्या प्रसंगानिमित्त येथील ' सन्मित्र-समाज ' मेळ्यानें कांहीं पद्यें छापून प्रसिद्ध केली होती. त्यांतील लोकमान्यांच्या अखेरच्या निरोपाचे पद्य अद्याप माझे कर्ण रन्ध्रांत घुमत आहे. थोडाबहुत फेरफारकरून मी ते खालीं देण्याची परवानगी घेतो:—

साहचर्ययुत स्वराज्य सेवा । करा, तयास्तव मृत्युहि सेवा ।
निरोप माझा आहे सर्वां । बागाल अशा मार्गानें ॥ १ ॥
निरोप माझा आहे सकलां । वृद्ध असा मीं समजा मुकला ।
गाडा वेगें पुढता ढकला । रुतलेला परवशतेनें ॥ २ ॥
मी सेवित मृत्यु सुखानें । धैर्यानें । शांतमनें । हो प्रगती या आशेनें ॥ध्रु०

लोकमान्यांच्या गुणवर्णनाचा हास्यास्पद प्रयत्न मी करूइच्छित नाहीं. याचे कारण एकतर माझी पढत मूर्खांत गणना होईल अशी भिती वाटते, व दुसरें असें कीं साक्षात् देवी सरस्वती जरी दौत लेखणी घेवून बसली आणि या विस्तृत वसुंधरेच्या पृष्ठभागावर एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत लोकमान्यांचे प्रशंसा पत्रक समग्र लिहून काढण्याचा तिनें चंग बांधला तरी देखील तिला आपला पराभव स्वमुखानेंच, कबूल करावा लागेल. अशा रीतीनें प्रत्यक्ष सररस्वतीलाही जेथें हात टेकावे लागण्याचा संभव तेथें माझी काय कथा ? हे विचार मनांत आले म्हणजे असें वाटतें, वाहवा ! खरोखर एकट्या लोकमान्यांनीच आपल्या जीविताचे सार्थक केले! एक सुभाषितकार म्हणतो:—

स जीवति यशो यस्य कीर्तिर्यस्य स जीवति ।
अयशोऽकीर्ति संयुक्तो जवन्नपि मृतोपमः ॥ १ ॥

अर्थातच लोकमान्यासारख्या कांहीं थोडया अद्वितीय थोर विभूती वगळल्या कीं बाकीं आपण सर्व केवळ मृतप्राय आहोत हे सिद्ध होते.

महात्म्यांच्या व सत्पुरुषांच्या चरित्रापासून काय बोध घ्यावा या विषयीं जगांत पाश्चिमात्य व पौर्वात्य कवींचे ऐकमत्य आहे. मी दोन्ही वाङमयांतून येथें एकएकच उतारा उद्धृत करतो:—

" Lives of Great men all remind us,
We can make our lives sublime,
And departing leave behind us
Footprints on the sands of Time."

Longfellow;

तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया करावी ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावें ।
परि अंतरीं सज्जना नीववावें ॥ १ ॥

श्रीसमर्थ रामदास.

लोकामान्यांचे देहावसान झाल्यला सारा एक महिना लोटला.–लवकरच लोकमान्यांच्या अस्थी भगवति भागीरथीच्या पावन प्रवाहांत विलीन झाल्या ! या अस्थींचा निरोप घेतानां लाखो लोकांची अंतःकरणें भरून येवून 'कण्ठस्तम्भित बाष्प वृत्तिकलुष चिन्ताजडं दर्शनम्' अशी स्थिति झाली. किंबहुना तसे न झाले तरच आश्चर्य ! वर्डस्वर्थ' कवी म्हणतो कीं, हा–मनुष्यस्वभाव आहे:—

"Men are we, and must grieve when even the shade,
Of that which once was great is passed away."

लोकमान्यांचे निधनानें राष्ट्राचे अपरिमित नुकसान झाले ही गोष्ट सूर्य प्रकाशा इतकी स्पष्ट आहे. परंतु ही राष्ट्रीय दृष्टी घटकाभर बाजूला सारून माझे परमपूज्य तीर्थरूप मला सोडून गेले हा विचार मनांत आला कीं, प्रभू रामचंद्राप्रमाणें गतकालिन स्मृतिचित्र अंतश्चक्षूं पुढें उभे राहून 'ते हि नो दिवसा गतः' असें ह्मणण्याचा कठीण प्रसंग मजवर ओढवतो. ''या जगांत आतां मी पोरका झालो' या एकाच हृदयविदारक विचारानें मन विषण्ण होते, संसार असार भासूं लागतो व आपणही त्यांच्या चितेत उडी घ्यावयास पाहिजे होती असें वाटूं लागते. हाय ! हाय ! केवढा हा दुःखाचा डोंगर मजवर कोसळला. लोकमान्य ! आपण मंडालेच्या खडतरं तुरुंगवासांतून बंधमुक्त होवून परत आल्यावर आज सहावर्षें आपल्या चरणाची मी हातून घडेल तशी बरी वाईट सेवाचाकरी केली. आपल्या सहवासांत जेवढें तास गेले तेवढें वजा केलें ह्मणजे बाकीचे आयुष्य भुमिभार भूतच समजले पाहिजे. अभिमानास्पद गोष्ट काय ती तेवढीच आपले अंतःकरण मोठे म्हणून माझ्या चुक्या सांभाळून घेतल्यास आपले पश्चात् आतां मी करूं तरी काय ? अथवा दुसरें तिसरें काय करणार ?

सतां केनापि कार्येण लोकस्याराधनं व्रतम् ।
यत्पूरितं हि तातेन मां च प्राणश्च मुञ्चता ॥

आतां पर्यंत शेकडो लोकांकडून दुखवटयाची पत्रें व तारा आल्या. आमच्या दुःखाबद्दल अशा तऱ्हेची सार्वत्रिक सहानुभूति दशदिशानीं प्रकट व्हावी हा केवळ लोकमान्यांच्या थोरवीचाच महिमा होय. अशा तऱ्हेच्या सहानुभूतीस पात्र होण्यासारखे सद्गुण आमचे अंगीं यावे येवढीच त्या जगन्नियन्त्याचे चरणी माझी अखेरची नम्र विनवणी आहे.

"लोकमान्य गेले!"

(कवि—रा. रा. दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी)

मंदाक्रांता

मोहव्यापी क्षणभर निजे हिंदमाता निशीथीं,
तारा तारापति धनपटीं झांकुनी तोंड घेती;
अंभोदांचा गगनिं भरला शब्द तों दुःखजन्य–
'गेला बाई ! प्रियकर तुझा लाडका लोकमान्य ! ॥ १

ज्यातें अंकीं कटिवरि कधीं घेउनी खेळवीलें.
यन्नामाचा जप तव मुखीं कौतुकें नित्य चाले,
आशा होती वसत हृदयीं हाच फेडील पांग–
आतां कोणावर दिन तुझे हाय ! जातील सांग ! ॥ २

ज्या काळानें अजवरि तुला दुःखपंकांत नेलें,
लावी तोची अदय करण्या पांढरे आज डोळे;
मागें लागे तव अवदशा कैंवि सोडील पाठ !
दुःखाब्धीची विषम उठते भव्य एकेक लाट ! ॥ ३

आजी पूर्वक्षितिजिं मुख कां दाविना बालसूर्य !
आलें राया ! कळुन सगळें ओढवे नष्टचर्य !
आल्या लाटा जरि जलधिला मोठमोठ्या विशाला,
अन्या वार्ता श्रवणकटु तो काय बोलेल बोला ! ॥ ४

राष्ट्रीयांचा अधिपति निजे रुग्णशय्यीं ज्वरानें,
तारायंत्र-ध्वनि 'कडकडा' ऐकती लोक कानें,

दुर्दैवाची कट कट पुरी बाधली आर्यलोकां !
"एसाखाची अशुभ असते दुष्ट-वाचा विलोका" ! ५

पुण्यक्षाणी तत्र तनुवरी टाकि मुंबापुरीच्या,
विख्याता या उभय भगिनी सत्य एका जिवाच्या;
'बाळा! बाळा !' करित रडती मुक्तकंठें विलापी
"ना येई हो ! भरुन जगतीं कालहानी कदापि !" ६

पंजाबाची धरणि विकला हुंदके देत आली !
वैदर्भीय क्षिति तर निघे हात लावून भाळीं !
झालें साध्वी—हृदय तरिहि गुर्जरीचें दुभंग !
बंगालीनें तर परिसुनी टाकिलें हो निजांग ! ॥ ७

प्रांताप्रांतीं शहर शहरीं जाहल्या शोक-शाला !
प्रत्येकाच्या हृदयिं शिरला दुष्ट हा एक भाला
कोणी मृत्युंजय जप करा, कीं अनुष्ठान घाला,
"येणारा तो चुकत नसतो मृत्युचा तीव्र घाला !" ॥ ८

स्वर्गीं गला शिवनृप यदा राज्यसंपादणारा
केवीं नेत्रांतुनि निखळल्या तैं महाराष्ट्र-धारा,
कैशीं झालीं अमित हृदयें दग्ध शोकानलानें,
होई ज्ञात स्थिति सकळिकां आजच्या कल्पनेनें ! ॥ ९

जेव्हां अंतीं हर ! हर ! कुरुक्षेत्र रक्तांत न्हालें
तेव्हां लाखों तरुणविधवा-जीव दुःखीं बुडाले;
होई तो ! स्त्री पुरुष गणती आजची तीस कोट !
एका बाळास्तव गळतसे एवढा अश्रुलोट ! ! १०

नानावर्णी विकल जनता बोलते हाय ! तोबा !
ठेवी कष्टें कर कटिवरी पंढरीचा विठोबा !
आश्चर्यानें स्वमुखिं जडली अंगुली रुक्मिणीची !
दुःखें वक्रा गति दिसतसे चंद्रभागा तनूची ॥ ११

एका खांबावरिच सगळी द्वारका सत्य होती,
एका कृष्णावरति मथुरा भार टाकून होती;
हा ! हा ! त्याच्या वरहि करि हा काळ घोर प्रहारा !
आतां झाला अगदिं उघडा सर्व येथें पसारा ! ! १२

' ये ये काळा ! उचल ! ' म्हणती त्रासले जे जिवातें
दुःखी कष्टी जरठ जन कां थोडके येथ होते ?
कोषागारांतिल उचलिला नेमका कोहिन्र !
लाधायाचा फिरुन कसला ! फाटतें हाय ऊर ! ! १३

राहे रत्नागिरि नगर जें भव्य रत्नाकराशीं–
तेथें रत्न प्रकटुनि खुले हिंदभूच्या गळ्याशीं;
देवा ! देवा ! मणि असुनियां कौस्तुभाचा गळ्यांत
त्याच्या पेक्षां अधिक गमला काय ? नेलें नभांत ? १४

यत्कीर्तीचा परिमल दिशा मोहितो हो ! दहाही,
पुष्पें त्याच्यावर उधळिलीं यांचें आश्चर्य नाहीं !
घांसी लोकांस्तव तनु सुखें चंदनाच्या परीस
काष्टें त्याला उचित असतीं चंदनाचीं चितेस ! ॥ १५

स्वर्गीं नेतां बसवुन तयां देववैमानिकांनीं
मागें मागें असतिल अहा ! नेत्र पाहात दोन्हीं !
तन्नामाचा गजर गगनीं थोर झाला असेल !
नेत्रें झालीं असतिल तदा निर्जरींचीं विलोल ! ॥ १६

दादाभाई असतिल तिथें गोखले नामजोशी–
तो गोपाळा प्रियतम सखा, वंद्य ते विष्णुशास्त्री–
मागें ज्यांच्यावर विबुध ते भार टाकून जाती,
तेही आले 'टिळक' म्हणुनी त्यांस वाटेल खंती ! १७

विद्वानांचा अधिप, विबुधश्रेष्ठ लोकाग्रणी जो,
आकाशींचा गुरु चमकुनी ज्यास चित्तांत लाजो,
येवो लाटा हृदय-पटलीं दुःखशोकादिकांच्या,
यद्धैर्याचा हिमगिरि न तो स्थान सोडावयाचा ! १८

स्वार्थासाठीं ध्रुव तपकरी, तो ध्रुवस्थान लाभे,
या बाळाचें जन-तप बघे काळजी त्यास बाधे;
माझ्या स्थानीं करिल वसती काय हा पुण्यवान !
पहा हिंदी-विगति चिर तूं पाहिना लोकमान्य ! १९

चिंता रात्रंदिन शयनिं वा भोजनीं एक ज्यांतें—
साम्राज्यांतर्गत तरि मिळो राजता भारतातें !
कांहीं थोडी सुखकर तपः सिद्धि येतां फळाला
योगी गेले टिळक निघुनी देवलोक स्थळाला !!! २०

तो सोन्याचा दिवस अजुनी जों न ये तोषवाया,
तों दुःखाची पसरि रजनी दाट अंधार वायां !
ज्ञानी किंवा असतिल, कुणी मोठमोठे विरक्त;
राया ! तुह्मां सम परि तुम्हीं एकटे देशभक्त ! २१

बोलायाचा अवधि, उघडे भारताचे खजीने !
युष्मच्छब्दें विविध जमतीं शक्तिमंत स्वसैन्यें !
सम्राटांच्या समचि सकलां भासलां पूज्यमान !
राजत्वाचा मुकुट नव्हता मात्र देदीप्यवान ! ॥ २२

जेव्हां शत्रूवर चमकलें लेखणी-खड्ग युद्धीं,
धीमंतांच्या विमुख बनल्या जाहल्या थक्क बुद्धि,
कर्णामध्यें अजुन उठते गर्जना केसरीची,
स्वारी नाहीं दिसत पण ती भव्य पंचाननाची ! २३

स्वातंत्र्याचें तरुणहृदयीं लाविलें बोज त्याला
नाहीं आला बहार अजुनी कोंवळ्या पल्लवांला,
तों गेले ना टिळक करुनी त्याजलागीं उन्हाळा ?
संरक्षोनी करिल पुढती कोण संगोपनाला ! २४

हे पुण्यात्मे जर निपजते आमुच्या जन्मदेशीं,
राजत्वाच्या उचलुन तयां स्थापितों सत्पदाशीं
संलक्षोनी वदति हि परद्वीप वासी मुखानें.
" द्यावें रत्ना जनन उदरीं हिंदमाताच जाणें. " २५

' होते कैसे ' तिलक ' निधडे निश्चयी राष्ट्रकार्यीं–
वाचा आधीं ' तिलक ' उलटे; अर्थ नामांत राही.
घेती ना जे ' कलति कधिंही हिंदसेवा-स्वधर्मीं
कर्मीं कारागृह जरि तरी सज्ज ते राष्ट्रकर्मीं ! २६

होते का हो ! टिळक अबला–शिक्षणचे चहाते ?
अस्पृश्यांची कळकळ शिवे काय त्यांच्या मनातें ?
सम्राटाच्या विषयिं विमल प्रेम का त्यास राहे !
या प्रश्नांचें प्रतिवच सरें " होय. " हें एक आहे ! २७

श्रीकृष्णाचा अवनिं घडला बालकृष्णावतार,
गीता–तत्वें निशद कथिलीं, ज्यांत वेदांत–सार;
ज्यांनीं ज्यांनीं विभुती बघितली, ऐकिली कंठवाणी,
तो तो प्राणी गहिंवरुनिया आपणा धन्य मानी ! २८

दुःखाश्रूंचे नयनयुगुलीं वाहती पूर ज्यांचे
त्यांच्या देहीं रुधिर उसळो वंद्य या पूर्वजांचे !
या काळाला हटवुन अहा ! त्यांतुनी राजभक्त
यावे नाना टिळक पुढती देशसेवा प्रसक्त ! २९



लोकमान्य.

B. A. P. Works.

लोकमान्य टिळक गेले !

[लेखक—डॉ. नारायण दामोदर सावरकर.]

होय ! लोकमान्य टिळक कायमचें निजधामाला गेले. सबंद आयुष्यभर विरुद्ध परिस्थितीशीं तुमुल युद्ध करून लोकमान्य टिळक हे ज्या शिबिरांतून या जगांत अवतरले होते त्या शिबिरांत अंतर्धान पावले. गेल्या चाळीस वर्षांमध्यें हिंदी राजकारणाच्या आकाशांत चैतन्याची वीज लवविणारा हा मेघ मृत्यूच्या पडद्याआड होऊन कायमचा दिसेनासा झाला. आतां पुन्हां कांहीं लोकमान्यांचें तें धन गर्जित त्या रेमार्केटच्या मैदानांत, त्या शांतारामाच्या चाळींत, त्या राष्ट्रीय सभेच्या मंडपांत, अथवा हिंदुस्थानच्या कोणत्याहि कोपऱ्यांत ऐकूं येणार नाहीं. धन्य आमची कीं आम्ही तें धनगर्जित ऐकलें ! हे डोळे धन्य झाले कीं त्या राष्ट्रपुरुषाची ती सांवळी मूर्ति डोळेभरून पाहिली ! धन्य या शरीराची कीं अत्यल्प कां होईना, परंतु त्या महाभागाची मृत्युशय्येवरची सेवा याला घडली !

असे पुरुष वारंवार होत नसतात. असे पुरुष प्रत्यक पिढीला लाभत नसतात. ते कालाकालाचे ठायीं अव्यवस्थित कालाचें नियमन करण्याकरतां निर्माण होतात. ' अमक्या कालीं तें झालें ' असें कालाच्या नांवावर तें ओळखलें जातांनां स्वतःच्या नांवानें ते काळाला ओळखावयास लावतात. ' रामचंद्राच्या काळीं ' ' श्रीकृष्णाच्या काळीं ' ' शिवरायांच्या काळीं ' ' लोकमान्यांच्या काळीं ' असा यांच्या नांवानें कालनिर्देश होऊं लागतो. अत्यंत चंचल व आपल्या प्रवाहांत सर्व वस्तुमात्राला धुवून विस्मृति पंथाला नेणारा काल या असल्या विभूतींपुढें नतशीर्ष होतो व त्यांच्या नांवाचा मोर्तब आपल्या मस्तकावर धारण करतो !

लोकमान्यांच्या सबंद आयुष्यांतील प्रत्येक गोष्ट अशी होती कीं जी कालाच्या प्रवाहाच्या विरुद्ध त्यांनां करावी लागलीं पारतंत्र्याच्या विषसेवनानें सर्व जनता ही मरणोन्मुख झालीं होती व राष्ट्राच्या आस्तित्वाचें निदर्शक गुण जे स्वाभिमान, राष्ट्रप्रेम, पौरुष यांचा पत्ताहि कुठें लागत नव्हता. ब्रिटिशसत्तच्या जोखडाखालीं हिंदभूची मान अडकली गेल्यापासून प्रत्येक हिंदपुत्र राज्यकर्त्यापुढें आपली मान नमविण्यांतच धन्यपणा मानीत होता. हांजी हांजी खोर पणालाच मानसन्मान मिळत होता. स्वतःच्या क्षुल्लक स्वार्थाकरतां अमुल्य मानवी आयुष्य खर्च करून गडगंज संपत्ति मिळविणें व सरकारची वाहवा मिळविणें हें आयुष्यांतलें परमोच्च ध्येय समजलें जात होतें. मनुष्याला कांहींतरी एक देशभूमि असते, तिचें कांहींतरी कर्तव्य असतें; तिच्या मानरक्षणा करतां स्वतःचें शिरकमलसुद्धां फुलाप्रमाणें तिच्या पायीं अर्पण

करावयाचें असतें; धनदौलत, भूमातेच्या वैभव संपादनाकरतां धुळीला मिळवावी लागते; अत्यंत प्रिय असा देह भूमातेच्या कर्तव्यप्राप्तीकरतां कर्तव्याच्या सहाणेवर चंदनाप्रमाणें उगाळावयाचा असतो; ही कल्पनाहि लोकमान्यांच्या प्रथम काळीं थोडेसें अपवाद वगळून कोणाच्या डोक्यांत शिरली नव्हती. महर्षि रानडे, व भविष्य कथन करणारे विष्णुशास्त्रि चिपळुणकर यांनीं या नवयुगाची प्रथम ललकारी फोडली विष्णुशास्त्रांनीं तर आपल्या लेखणीच्या अग्रभागीं विद्युतेजाचें अधिष्ठान करून त्यां सुप्तमहाराष्ट्राला धक्के देऊन भानावर आणले. अशा जागृत झालेल्या, परंतु किंकर्तव्यतामुढ बनलेल्या, एकाद्या वाटसरू वांचुन केविलवाण्या झालेल्या पांथस्या प्रमाणें त्यावेळीं महाराष्ट्राची स्थिति होती. अशावेळीं लोकमान्य हे अग्रेसर झाले व शतमुखांनीं विनिपाताला जाणारा हा देश शतमार्गानीं थोपवून धरण्याकरता कृतनिश्चयांनीं कर्तव्यरणांत घुसले.

ते जें एकदां तेव्हां–चाळीस वर्षांपूर्वी–ह्या कर्तव्यरणांत घुसलें ते अगदीं परवा पर्यंत मृत्यूनें त्यांना उचलून नेईपर्यंत त्याच कर्तव्यरणांत तुमुलयुद्ध करीत होते. यौवनामध्यें हा एकटा अभिमन्यू चक्रव्याहात मध्यम वयामध्यें हा एकटा अर्जुन संसप्तकांच्या गोटांत, वार्धक्यामध्यें हा एकटा सप्तक्षपाती भीष्माचार्य शत्रूंच्या अभित सैन्यांत निर्भय संचार करीत होता. सरकारचे वज्राघात, स्वजनांचा कृतघ्नपणा, हाडवैऱ्यांचें गुप्त हल्ले, प्रतिपक्षाची अखंड टीका, शरीरावर रोगांचें हलें, वार्धक्याचा अंमल यांपैकीं एकहि गोष्ट किंवा या सर्व गोष्टींचा एकजुटीचा एक समयावच्छेदें झालेला हल्ला लोकमान्यांनां कर्तव्यरणांतून परामुख करावयास समर्थ झाला नाहीं. फार काय सांगावें या तुमुलकंदनांत वर सांगितलेल्या शत्रुसमुहाला व संकटपरंपरेलाच या वीराचे तडाके सहन करतां करतां नाकीं नऊ आणावें लागलें !

आणि लोकमान्यांच्या ह्या स्वजनेद्धाराच्या मोहिमेलाच नौकरशाही व तिचे बगलबच्चे 'विध्वंसक कार्य' असें नांव देतात. आणि हेहि एकप्रकारें खरेंच आहे ज्या नौकरशाहीचा पिंड या भूमीच्या मिराशीवर एकसारखा पोसला गेला त्या नौकरशाहीची निरास लोकमान्यांच्या झगडयानें, पुनरपि लोकांची लोकांना मिळणार होती. मग नौकरशाही व तिच्या बलावर पुष्ट झालेलें तिचे बगलबच्चे यांच्या स्वार्थाचें हें विध्वंसन नव्हे काय ? होय; आम्ही मोठया अभिमानानेंच कबुल करतों कीं लोकमान्य हे नोकरशाहीच्या अरेरावीचे विध्वंसक होते. स्वजनांमध्यें स्वतःच्या देशाबद्दल, स्वतःच्या राजकीय हक्कांबद्दल जें अज्ञान वसत होतें त्याचें लोकमान्यांनीं विध्वंसन केलें व 'म्हणून तें विध्वंसक' होते. विध्वंसन हे नेहेमीं दोन प्रकारचें असतें. एक विधायक विध्वंसन व दुसरें विध्वंसक विध्वंसन यांपैकीं प्रथम प्रकारचें विध्वंसन हें अवश्य असते असएव कर्तव्यप्राप्त म्हणून प्रशंसनीय ठरते. ज्या शेतामध्यें उत्तम पीक काढावयाचे

आहे, तें शेत प्रथम उखळून, निखंदन काढावें लागतें सर्व केरकचरा जाळून टाकावा लागतो. हें एक प्रकारचे विध्वंसनच असतें. परंतु, हें विध्वंसन विधायक विध्वंसन असतें म्हणून ते अत्यंत योग्य असतें. शेत पिकास आल्यावर, पिकें धान्याच्या भारानें व वाऱ्याच्या लहरींनीं किंचित्नत होऊन डोलूं लागल्यावर, हिरव्यागार पालवीची बहर डोळ्यांनां अपरिमित आनंद देऊं लागल्यावर, जर त्या शेताचें कोणी दुष्टानें विध्वंसन केलें तर तें विध्वंसन मात्र 'विध्वंसक विध्वंसन' होईल व म्हणूनच तें गर्हर्य, निंद्य व राक्षसी ठरेल.

लोकमान्यांनीं यांपैकीं कोणतें विध्वंसन केलें ? त्यांनी नौकरशाहीच्या अनियंत्रित सत्तेला कसून विरोध केला. त्यांनीं नौकरशाहीच्या दुष्कृत्यांचीं कठोर वृत्तीनें छाननी केली. त्यांनीं नौकरशाहीच्या जुलमाचा निरास करण्याकरितां भगीरथ प्रयत्न केले. व यालाच नोकरशाही व तिच्यावर आपला योगक्षेम चालवीत असलेलें तिचे सांगेलागे लोकमान्यांनां विध्वंसक अशी संज्ञा देऊन तिरस्कार दर्शवीत आहेत. आमचा या अकलेच्या कांद्यांना व स्वार्थांध विवेकभ्रष्टांनां असा सवाल आहे कीं जर जुलमाचा प्रतिकार केला नाहीं तर तुम्हीं तुमच्या स्वतःच्या देशांत जिवंत रहावयाला तरी पात्र ठराल काय ? अनियंत्रित सभेला नियंत्रित करणें, अरेरावीला लोकमतानुवर्ती बनवणें याच्यामध्यें ना तुमच्या राष्ट्राचा आजपर्यंतचा जन्म गेला ? आणि या पृथ्वीवरील असें कोणतें राष्ट्र आहे कीं त्यांनीं हा झगडा केला नाहीं ? तुमच्या स्वतःच्या देशांत हॅम्डन्, क्रॉमवेल यांनीं काय केलें ? तुम्ही चार्लस् राजाशीं व जेम्सशी कसलें वर्तन केलें ? हें कार्य विध्वंसक होतें नां ? मग तुमच्या बापजाद्यांनीं तें कां केलें ! व जर तें निंद्य आहे तर मग तुम्हीं आजहि त्यांचें गोडवे गाण्यांत स्वतःला व स्वतःच्या राष्ट्राला कां धन्य मानून घेतां ! याचें उत्तर तुम्हीं द्या म्हणजे तेंच उत्तर हा विध्वंसनाचा आरोप लोकमान्यांवर करतांना जर कांहीं सदसद्विवेक बुद्धि जागृत ठेवावयाची असेल तर-लज्जेनें तुमच्या तोंडावर कालिमा चढवील. तुमच्या राष्ट्रांत जें अवश्य व न्याय्य तेंच या हिंदराष्ट्रांतहि अवश्य व न्याय्य. कारण तुमच्या देशासारखाच मानघन हिंददेश आहे.इतकेंच नव्हे तर सुधारणेचें व समाजाचे प्राथमिक धडेहि ज्यावेळीं तुम्हांला माहित नव्हते व तुमचा लोकसमूह ज्यावेळीं केवळ पशूंच्या कळपांप्रमाणें इतस्ततः भटकत होता, त्यावेळीं ह्या हिंदराष्ट्रामध्यें समाजसंस्था, राजसंस्था, परिणतीच्या उच्च स्थितीला जाऊन पोंचलीं होती. तेव्हां, कालाच्या नियतीनें तुमच्या राष्ट्राचा पोंहरा भरत आहे, याच्या मदानें मत्त होऊन तुमच्या राष्ट्राला कालीमा आणील असा हा दिमाख दाखवितां कोणाला ?

आणि वादविवादाकरतां क्षणभर असेंहि जरी घेऊन चाललें कीं लोकमान्य विध्वंसक पद्धतीचें पुरस्कर्ते होते, तरी त्याबद्दल जबाबदार कोण आहे ? याचा विचार ह्या नोकर

शाहीनें व तिचा उदो ' ' उदो ' करणाऱ्या ' इतरेजनांनीं ' कधीं केला आहे काय ? आमच्या पुराणकाळच्या राजनीतींत अशी कल्पना असे कीं, प्रजेमध्यें दुर्गुण, दुराचार माजणें, हें राज्यकरणाऱ्याच्या अपात्रतेचें फळ आहे. प्रजा जर सुवर्तनी नसेल तर त्याचें खापर राजाच्या मस्तकावर फोडलें जात असे. अशा दृष्टीनें विचार करणारे तत्त्ववेत्ते पाश्चात्यराजशास्त्रांमध्येंहि आहेतच. तेव्हां या दृष्टीनें विचार केला तर काय आढळून येतें ? राज्यांमधले चोर,दरवडेखोर यांच्या चोरीची व दरवडेखोरीची जबाबदारीसुद्धां जर राजाच्या माथीं येतें तर मग ज्या राज्यपद्धतींत लोकमान्य टिळकांसारखीं अद्वितीय बुद्धिवान् माणसें 'विध्वंसक' पद्धति अंगिकारतात त्या राज्यपद्धतीबद्दल काय निर्णय ठरेल ? जेथें बुद्धिवान्, अभिजात सुशिक्षित माणसें राजपद्धतीचा धिःकार करतात, त्या राज्य पद्धतीबद्दल काय निर्णय होईल. ' लोकमान्य टिळक यांनां जर विध्वंसक कार्य करणें भाग पडलें तर याबद्दलची जबाबदारी कोणाच्या वाटेला जाईल ? अर्थात् नौकरशाहीच्या; लोकमान्य टिळक जेव्हां जन्मले तेव्हां जर हिंदुस्थान स्वराज्य मंडित असतें तर मग लोकमान्यांनीं हाच विध्वंसनाचा मार्ग आक्रमिला असता काय ? अमेरिकेनें क्युबा बेट पंधरा वीस वर्षांच्या अवधीमध्यें स्वराज्याच्या हक्कदानाला पात्र ठरविलें व त्यास ' स्वराज्य ' दिलें. तसेंच जर इंग्रज सरकारनें, क्युबापेक्षां अनेक पटीनें संस्कृतींत व दानतींत श्रेष्ठ असलेल्या ह्या हिंदुस्थानला स्वराज्य पंधरावीस वर्षांतच दिलें असतें तर लोकमान्य काय तरीहि विध्वंसकच बनले असते ? आमचें स्वराज्य १८१८ सालीं नष्ट होऊन हा हिंदुस्थान देश इंग्रज सरकारचे ताब्यांत गेला. त्या नंतर उणी पुरीं पस्तीस चाळीस वर्षें होऊन गेलीं व मग लोकमान्य टिळक १८५६ मधें जन्माला आले. जर इंग्रजांनीं एवढया अवधींत अमेरिकेप्रमाणें केलें असतें तर एका स्वराज्याच्या ऐवजीं दोन राज्यें ते हिंदुस्थानला देऊं शकले असते ! मग लोकमान्य हे तरीहि विध्वंसक बनले असते काय ? कधींहि नाहीं. त्यांच्या तत्त्वज्ञान प्रसवणाऱ्या बुद्धिमत्तेनें आजपर्यंत सर्व बुद्धिमंतांपासून अगोचर राहिलेलें तें ' स्थिरचर व्यापुनि अवघें ' ' दशांगुळें ' उरणारें ब्रह्म, कदाचित् धांडोळुन काढलें असते. गणिताच्या पिंजऱ्यामध्यें, खगोलामधील अनेक नक्षत्रांचे राघु पकडून ठेवलें असते, आर्यांच्या प्रथमच्या वसतिस्थानाकडे प्रयाण करून त्यांच्या सिद्धांताला बळकटी देणारे प्रत्यक्ष पुरावे त्यांनीं शोधून काढले असते. या सर्व व्यवसायांनां दूर ढकलून त्यांनां ' खटनटासी खटनट ' असें राजकारण करावें लागलें याची जबाबदारी नौकरशाहीच्या अरेरावी राज्यपद्धतीशिवाय दुसरी कुणावर पडते ! काय ! लोकमान्यांनां वकीलीच्यां धंद्यावर गडगंज संपत्ति मिळवितां येत नव्हती ! काय ? त्यांनां मऊ मऊ गाद्यांवर सुखशय्या आवडत नव्हती व म्हणून कां ते कारागृहांतल्या रकटयावर निद्रा घेत पडले ? काय, त्यांनां घरचें सुग्रास अन्न मानत नव्हतें. व म्हणून कां ते तुरुंगांतील कांजी आणि भाकरी खावयास तेथें गेले ! त्यानां गायकवाडवाड्यासारख्या लोभनीय इमल्यामध्यें गुदमरत होतें व म्हणुन कां ते

तुरुंगांतल्या कोठडीमधील हवा खाण्यास उत्सुक झाले ? यांपैकीं त्यांनां झालें तरी काय ? याचें उत्तर लोकमान्यांना विध्वंसक म्हणणारे शहाणे बहादुर देऊं शकतील काय ? ह्या देशाला परायत्तता आली, निर्धनता आलीं, सर्व प्रजा कंगाळ बनली, सुवर्णभुमि स्मशानवत् झाली. सर्व हिंदी लोक स्वराज्यविहीन असलेले गुलाम बनले आणि ही स्थिति आवती भोंवतींपाहून लोकमान्य अधीर झाले, देशप्रेमानें गहिंवरून गेले व तारुण्याच्या प्रथम समाजामध्येंच त्यांनीं देशाकरतां फकिरी अंगिकारली महिन्याचे तीस तीस हजारहि मिळविण्याची हिंमत असतांना भूमातेच्या या सेवकानें केवळ तीस रुपायांत आपला व कुटुंबाचा गुंजारा करण्याचें निश्चय कंकण बांधलें व सर्व वैयक्तिक सुख भोगेच्छेला भस्म करून देशा करतां अविरत कष्ट सहन करण्यास हा मातृसेवक सिद्ध झाला. अशा तपस्व्याला 'विध्वंसक मार्ग' केवळ आवड, केवळ चैन म्हणुन कां पाहिजे होतें ? त्यांनीं पतित झालेली भूमाता उद्धरण्याकरतां आपले विशाल बाहु पुढें केले. या त्यांच्या पवित्र कार्यामध्यें जे जे आडवे आले–मग ते नौकर शाहींतलें असोत कां 'कुऱ्हाडीचे दांडे' असोत–त्यांना त्यांनीं निर्घृणतेनें निवटुन काढले. यांत अपवित्र काय झाले ? यांत तिरस्करणीय काय झालें ? आज जीं नौकरशाहीं व तिचे सागेलागे लोकमान्यांच्वा कामगिरीला नाकें मुरडीत आहेत त्याचें कारण आहे. कारण त्यांच्या नाकाला लोकमान्यांच्या कामगिरीनें झणझणीत मिर्च्या लागलेल्या आहेत, व त्यांची तिडीक डोक्यापर्यंत जाऊन तें डोकें ठिकाणावर राहीनासें झालें आहे. व इतक्यांवरच कांहीं नौकरशाहीची मानखंडणा थांबली नाहीं. तर कित्येक वेळेला आपली मुरडलेलीं नाकेंच मुठींत धरून या नौकरशाहीला व तिच्या दिलजान दोस्तानां लोकमान्यास शरण चिठ्ठी द्यावी लागसी आहे. ह्यांचें प्रत्यंतरच कुणाला पाहिजे असेल तर ज्या टाइम्सनें लोकमान्यांच्या मृत्यूच्या दुसऱ्याच दिवशीं नाक वर करून दुगान्या झाडण्याचा प्रयत्न केला, त्याच टाइम्सचें तेंच नाक, लोकमान्यापुढें एकदां नव्हें तर दोन वेळां घासावें लागल्यामुळें कोणत्याहि किडा मुंगीला त्यावरून जाववास सपाट वाट झाली होती हें आठवलें म्हणजे बस् आहे.

लोकमान्यांच्या विध्वंसक कार्याची ही अशी उपपत्ती आहे. तेव्हां तरुण महाराष्ट्रानें लोकमान्यांच्या शत्रुंच्या ह्या काव्याला फसूं नये. ज्यावेळीं देश अवनत झालेला असतो त्यावेळीं त्याला उद्धारावयास प्रयत्न करीत असतांनां, जर कुणाशीं विरोध, झगडा, करावा लागला तर तें अपरिहार्य आहे असें समजून समय प्राप्त कार्य केलेंच पाहिजे. एकाद्या दगडांतून सुंदर देवाची मूर्ति निर्माण करतांना टाकीचे घाव हे घातलेच पाहिजेत व त्याच्या योगानें जर कांहीं कपळे, चिपा उडाल्या तर त्याहि उडविल्याच पाहिजेत त्या शिवाय देवाची सुंदर मूर्ति कशी निर्माण होईल ? म्हणून तरुण पिढीनें त्यांच्यापुढें स्वराज्यदेवीची सुंदर मूर्ति घडविण्याचें जें अत्यंत उदात्त

कर्तव्य प्राप्त झालें आहे तें करण्यास, व यशस्वी रीतीनें करण्यास, लोकमान्यांचें ध्येय पुढें धरलें पाहिजे. लोकमान्यांचें सर्व आयुष्य व त्या आयुष्यघडाला प्रत्येक क्षण म्हणजे झगडा, निकट, स्वसुखाचा होम, ज्याला लोकमान्यांचें प्रिय आचारावयाचें असेल त्यानें केवळ त्यांचा जयजयकार करून भागावयाचें नाहीं; त्यानें केवळ भाटाप्रमाणें स्तुतिस्तोत्रें गाऊन भागावयाचें नाहीं, किंवा त्यांच्याकरतां व खालीभर अश्रू गाळून, या एखाद्या वृक्षालाहि उन्मळून पाहील असे दीर्घ सुसकारे सोडूनहि भागावयाचे नाहीं. तरुण भारता ! जे कांहीं अश्रुमोचन निसर्गाच्या तडाक्यामुळें तुझ्या डोळ्यांतून झालें असेल तें पुरें झालें–आतां त्या तुझ्या तरुणाच्यां जोमानें तेजस्वी झालेल्या नेत्र युगुलामध्यें अश्रूंची गर्दी होऊं देऊं नकोस तर निश्चयांचीं चमके उत्पन्न होऊं दे. लोकमान्य ज्या लढाईंत, ज्या झगडयांत पडले तोंं झगडा तसाच पुढें रेटण्यास आतां तुझे तारुण्याच्या जोरानें स्फुरणारें बाहू तूं उभारले पाहिजेस. तरुण भारता ! कोणाचीहि स्तुति निंदा ऐकूं नकोस; तुझें स्वराज्य, तुझा जन्म सिद्ध हक्क मिळविण्याकरितां तुझी चालणारी कार्याची ललकारी सर्वांनां ऐकूं येऊं दे. लोकमान्यांवर तुझें प्रेम, भक्ती ही कां आहे ? कारण त्यांनीं ह्या भारतभूवर प्रेम, भक्ती केली म्हणून तर मग आतां तूंहि ह्या तुझ्या देशभानेवर अलोट प्रेम कर, अचल भक्ती ठेव म्हणजेच लोकमान्यांना खरा संतोष होईल. लोकमान्यांनीं ह्या भूमातेच्या सुखसंपादनाकरतां कोणतेहि सुख इच्छिलें नाहीं. तरुण भारता! तूंहि तसाच हो. भूमातेचें वैभव संपादनाकरतां लोकमान्यांनीं कोणत्याहि स्वार्थाचा होम करण्यास कसर केली नाहीं तूंहि तसेंच कर. लोकमान्यांनीं स्वराज्य होमरूल संपादनाकरतां प्रचंड झगडा आरंभिला व प्रत्येक संकट, प्रत्येक तुरुंगवास प्रत्येक निंदा स्तुति कःपदार्थ समजून केवळ भूमता व तिचें वैभव याच गोष्टी अखंड ध्यायिल्या. तूंहि तसेंच कर, तूंहि तसेंच आचर. म्हणजे ते लोकमान्य व ही भूमातादोघेहि तुला मंगल आशीर्वाद देतील व त्या बळावर तुझा जन्म सिद्ध हक्क जें स्वराज्य–होमरूल–तें 'याच देहीं, याच डोळां' पहावयास, अनुभविण्यास सांपडेल यांत तिलप्राय शंका नाहीं.

नवसुमनांजलि.

कोण हें अमंगल वदलें । ' लोकमान्य सोडुनि गेले !
कटु शब्द कर्णि हे पडले । जणुं लोहच तापविलेलें
हृत्कासार–स्नेहजला । सळसळुनि उमाळे आले
तें जल उष्णाश्रुरुपानें
वाट फोडि नेत्रमुखानें
कोमेजुनि गेलीं वदनें
शून्यत्व हृदिला आलें । जग सर्व तिमिरमय झालें! ॥ १

तिलक हा हिंदमातेच्या । भालावर चमकत होता
निज तेजें भारत-गगनीं । तळपला जणुंदुजा सविता
सौभाग्यचिन्ह हें मिरवी । धरुनि ती गर्व मनिं मोठा
तों घालुनि अवचित घाला
शोक-डोहिं लोटुनि तिजला
तो भाल-तिलक हा ! पुसिला
कैसा त्या निर्दय कालें ! काय तया यांत मिळालें ? १

शोभली आर्य भूकंठीं । देशभक्त सन्मणिमाला
तारकागणों शशि जैसा । देतसे अमुप शोभेला
चमकला स्वतेजें तैसा । हा बालमेरुमणि मधला
परियुक्त अशुभ कार्याला
जी मध्यरात्रिची वेळा
यम-तस्कर साधुनि आला
तोडुनि त्या सन्मणिमाले । मेरुमण्यातें त्या हरिलें ! २

ऐनभरीं तारुण्याच्या । अर्पियलें जीवित देशा
स्थापियल्या शिक्षणसंस्था । स्वाभिमान निर्मिति ऐशा
'केसरी' 'मराठा' पत्रें । उपजविति आत्मविश्वासा
आक्रमुनी हिंदुस्थाना
देउनि अमित व्याख्याना
उमजविली स्वराज्यतृष्णा
मुखिं बिंदु पडाया आले । तों झडप घातला कालें ! ३

अद्वितीय बुद्धि जयांची । तोड नसे तिस जगतांत
भांडार आर्यसंस्कृतिचें । संशोधुनि त्या वेदांत
' आर्टिक स्थान वेदांचें , ' ओरायन ' लिहिले ग्रंथ
पाहुनियां बुद्धिमता ती
पंडित मानी डोलविती !
जाहली त्रिखंडीं ख्याती
दुर्दैव अतां ओढवलें । नव शोधां जग हें मुकलें ! ४

हें राष्ट्रचि माझें घर ही । भावना जयांच्या चित्तीं
सकल हिंदि जनतेवरती । बंधुपरी धरिली प्रीती
देशहितासाठीं अपुल्या । स्वार्थावरि लोटिलि माती
भोगिलें शरिर कष्टांला
त्या कारागृहवासाला
सोशिलें कुजन-निंदेला
काया-वाणि-मन-धन सगळें । निज राष्ट्रचरणिं अर्पियलें! ६

कारागृहिं दिन कंठातां । स्वजनांचें हित चिंतियलें न च ।
न च पर्वा निज देहाची । करितां, निजजनहितिं रतले ।
कर्तव्य पराङ्मुख राष्ट्रा । कर्तव्यपरायण केलें
योगेश्वर कृष्णें फिरुनी
हें टिळक-स्वरूप धरुनी
भूवरती या अवतरुनी
गीतेचें रहस्य कथिलें । निजधामा पुनरपि गेले ! ॥ ७

देशास्तव झटुनी झटुनी । काया ही जर्जर झाली
परि चिंता निज देहाची । आत्म्यानें नच त्या त्यजिली
बहु जीर्ण देहयष्टी ही । रोगांनीं निर्बल केली
यास्तव हा गेले त्यजुनी
नव देहिं अतां संचरुनी
येतील भूवरी फिरुनी
हेतु जे राहिले अपुरे । करितील पूर्ण ते सगळे! ॥ ८

देह जरी नष्ट जहाला , लोकमान्य टिळक न गेले !
ठेविले तयांनीं अपुले । तेहतीस कोटि हे चेले !
हर्तिसहासनिं सर्वांच्या । आधिष्ठित होउनि बसले !
सोडितील तेथुनियां जीं
देशभक्तिचीं कारंजीं
चेतना स्वराष्ट्रामाजी उपजवितिल-
आशांकुर हे 'बाळकृष्ण'-हृदयीं फुटले !

कै. बाळ गंगाधर टिळक.

विलायतेत गेलेलें डेप्युटेशन.

लोकमान्यांचे हस्ताक्षर.



London 1st October
1919

Dear Sir

Please accept my warmest thanks for your kind message of congratulations and good wishes on the occasion of my 64th birthday. God grant that I may yet deserve it by my work. Believe me

Yours very sincerely
B. G. Tilak

"श्री" लंडन, १ आक्टोबर
१९१९

कृ. सा. नि. नि. साष्टांग नमस्कार
पत्राच्या असंगी आपण स्मरणपूर्वक
जो प्रेमाचा निरोप मला पत्रद्वारे पाठवि-
ला त्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी
आहे. या प्रेमाला अनुलक्षून अधी सोन्या
हातून काही देशसेवा घडून गेली असेल तिच
परमेश्वरापाशी माझी प्रार्थना आहे. कळावे
लोभ असावा हे विनंति. आपले
बाळ गंगाधर टिळक.

लोकमान्यांचें शेवटचें दर्शन.

असे. १९१६ सालीं त्यांची चाळीस हजाराच्या जमानतीच्या खटल्यांतून हायकोर्टानें मुक्तता केल्यावर केसरींत ' टिळक सुटले, पण पुढें काय?' असा जो एक सणसणीत व कर्तव्यप्रेरक अग्रलेख प्रसिद्ध झाला आहे तो देखील त्यांच्या हृदयांत घोळणाऱ्या उपरिनिर्दिष्ट प्रश्नाच्या अनुरोधानेंच लिहिला आहे. कै. टिळक जें कार्य करीत होतें तें त्यांच्यापुरतेंच असून त्यांचा गौरव करण्यांत आपलें कर्तव्य संपलें अशी त्यांच्या हयातींत लोकांची एक सार्वत्रिक समजूत झाली होती, पण त्यांनीं जें खडतर देशसेवेचें व्रत अंगिकारलें होतें, तें त्यांच्याकरितां नव्हतें, सगळ्या जनतेसाठीं होतें आणि एका व्यक्तीचा पराक्रम कितीही अचट असला तरी तें सिद्धीस जाणें शक्य नव्हतें याची जाणीव सामान्यतः जनतेमध्यें केव्हांही दिसून आली नाहीं. १९०६ सालीं मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या वार्षिक संमेलनांत अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना कै. टिळकांनीं प्रत्येक मानवी जीवात्मा स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा अशा तीन कर्तव्यांचीं ऋणें डोक्यावर घेऊन जन्मास येत असतो असें म्हटलें आहे. लो. टिळकांनीं आपल्या चौसष्ट वर्षांच्या आयुष्यक्रमांत या तिन्हीं ऋणांची स्वतःपुरतीं फेड केली; त्यांनीं १८८० सालच्या सुरुवातीस राष्ट्रसेवेचें कंकण हातांत बांधलें व तें ब्रीद परिस्थितीची उलथापालथ झाली असतांही मरणाच्या क्षणापर्यंत पाळलें. वेळोवेळीं प्रसंग पडून त्यांनीं जनतेस कर्तव्य ओळखण्याबद्दल इशारती दिल्या, ' पण जनतेनें आपल्या या लाडक्या अग्रेसराचा इतमाम वाढवून त्याचें कोड कौतुक करण्यापलीकडे स्वतःवरची जबाबदारी फारशी सिद्धीस नेलेली नाहीं. आतां त्यांच्या मरणानें हानीचा चटका जनतेस बसूं लागला आहे व ह्मणूनच त्यांच्या चरित्राचें अद्भुतरम्य कथानक डोळ्यांपुढें आणण्याची खटपट सुरू झाली आहे. उषःकाल मालेचा खास टिळक अंक हा एक त्या खटपटींतलाच भाग आहे.

आमचें वरील विवेचन पाहून आमचे कित्येक वाचक सद्यःस्थितीकडे बोट दाखवून आमच्या ह्मणण्यांतील सत्यतेबद्दल साशंक होतील हें आह्मांस ठाऊक आहे. आज जिकडे तिकडे वृत्तपत्रें दरदिवशीं नवीं नवीं बाहेर पडत आहेत, १८८० सालापेक्षां १९२० सालांत महाराष्ट्रामध्यें नानाविध संख्या अस्तित्वांत आलेल्या आहेत, कॉंग्रेसच्या प्रतिनिधींची संस्था सालोसाल वाढत आहे, स्वराज्य संघाच्या शेकडों शाखा लोकांच्या राजकीय जागृतीची अभिवृद्धि करीत आहेत, असें असून सुद्धां टिळकांच्या हयातींत लोकांनीं आपलें कर्तव्य बजावलें नाहीं असा त्यांजवर आरोप करणें अनुचित नव्हे काय ? हा प्रश्न सकृद्दर्शनीं जितका निरुत्तर स्वरूपाचा दिसतो तितका तो विचारान्तीं गुंतागुंतीचा वाटत नाहीं. टिळक दोन साप्ताहिकांचे संपादक होते, पण आजला दैनिकांचें संपादकत्व गाजविणारांची संख्या दोन हाताच्या बोटांना मोजवणार नाहीं, हें खरें असलें तरी टिळकांच्या दोन साप्ताहिकांत व विशेषतः केसरींत जें विद्वत्तेचें तेज चमकत होतें त्याची बरोबरी स्वभाषेंतल्या एकही दैनिकाला

अथवा साप्ताहिकाला करवणार नाहीं अशी आमची खात्री आहे व आमच्या वाचकांसही त्याबद्दल मुद्दाम खुलासा करून सांगायला नको. हा मुद्दा स्वयंसिद्ध आहे. टिळकांमध्यें कित्येक लोकोत्तर गुण होते यांत संशय नाहीं, पण केसरी-मराठ्याचें संपादकत्व हे त्यांच्या लोकोत्तर गुणांत जमा करणें योग्य नाहीं. प्रत्येक वृत्तपत्राच्या संपादकाला 'माझे अंगीकृत कार्य माझ्या क्लेशांनींच उत्कर्षाच्या पंथास लागेल' असे बाराव्या वर्षीं शिक्षा होण्याचीं चिन्हें दिसल्यावर न्यायाधीशापुढें निधड्या छातीचे उद्गार काढतां येणार नाहींत, पण रोजचें अथवा आठवड्याचें आपलें वृत्तपत्र केसरीप्रमाणें जोमदार, स्फूर्तिदायक विचारांनीं सजवून देशसेवा करणें कोणत्याही संपादकाला कठिण नाहीं. मात्र टिळक आपल्या केसरीकरितां जेवढी मेहेनत घेत होते तितकी मेहेनत करून विषयाची माहिती वाचकांना सादर करण्याची खबरदारी घेतली पाहिजे. टिळकांनीं केसरीच्या अग्रलेखांकरितां पुरेशी माहिती मिळाली नाहीं म्हणून दोन तीन आठवडेपर्यंत असे लेख प्रसिद्ध करण्याचें लांबणीवर टाकल्याचे दाखले त्यांच्या चरित्रग्रंथांतून पहावयास सांपडतात. १९०८ सालीं रशियाच्या राज्यस्थितीवर त्यांना लेख लिहावयाचें होतें तेव्हां त्यांनीं इंग्रजी दैनिकांतून अथवा मासिकांतून वाचलेल्या वाङ्मयावर भिस्त न ठेवता रशियासंबंधीं इंग्रजी भाषेंतले पंधरा सुप्रसिद्ध ग्रंथ आपल्या जवळ गोळा केले होते असें रा. कुळकर्णी यांच्या 'टिळकांचीं गेलीं आठवर्षें' या पुस्तकांत लिहिलेलें आहे. १८९० पासून १९०८ पर्यंतच्या संपादकीय कारकिर्दींत त्यांनीं विद्वत्ताप्रचुर लेख केसरींत प्रकट केले ते केवळ स्वयंभू बुद्धिमत्तेच्या जोरावर केले नाहींत; मूळच्या कुशाग्र बुद्धिमत्तेवर दीर्घ व्यासंगाचें संस्कार ते देत असल्यानेंच त्यांना महाराष्ट्र वाङ्मयांत आपल्या साप्ताहिकाच्या द्वारें अमूल्य भर टाकतां आली. त्यांच्या ग्रंथनिष्पत्तीची गोष्ट अशीच आहे. त्यांनीं प्रत्येक ग्रंथाची परिपूर्णता कित्येक वर्षांच्या परिश्रमानंतर केल्याचें आपणांस दिसून येतें. कोणत्याही विषयाचा अभ्यास करूं लागलें ह्मणजे त्याच्या यथायोग्य आकलनासाठीं कित्येक आनुषंगिक विषयाचें परिशीलन करावें लागतें. या आनुषंगिक विषयांचा फारसा विचार न करतां अनुमान धपक्यानें आपला अभ्यास चालविणारांची संख्या बहुधा व्यासंगी माणसांत विशेष आढळते. टिळक मार्गीतल्या अडचणी शिल्लक न ठेवतां आपलें प्रत्येक कार्य शेवटास नेत असत. त्यांनीं ही संवय लहानपणापासूनच आपल्या स्वभावांत पक्की रुजविली होती. अडचणींचा पुरा फडशा पाडल्याचें मनाला समाधान झाल्याशिवाय पुढें पाऊल टाकावयाचें नाहीं असा त्यांचा बाणा होता व यामुळेंच ते नानाविध विद्वानांबरोबर ज्ञानार्जनांच्या दृष्टीनें वादविवादास सदैव उत्सुक असल्याचें दिसत असे, किंबहुना 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' या वचनास अनुसरून ते पुष्कळदां मुद्दाम वादग्रस्त प्रश्न उकरून काढण्यासही मागें पुढें पहात नसत अशी त्यांची ख्याति आहे. अर्थात् त्यांच्या बुद्धिमत्तेला जीं अष्टपैलू विद्वत्तेचीं उज्वल फळें लागलीं त्याचें कारण दैवाची देणगी नसून त्यांनीं

परिश्रम पूर्वक केलेली बुद्धिमत्तेची मेहेनत मशागत हेंच होय. याच अंकांत रा. गुरुजी यांनीं आपल्या आठवणींत आगरकरांपाशीं बोलण्याचा संकोच वाटत नसे, पण टिळकांपुढें टिळक तोंडांतून जें अक्षर उच्चारतात त्यांत सत्यांश असतो अशी सार्वत्रिक समजूत होती, या समजुतीचें मूळ त्यांच्यावर ईश्वरी कृपा प्रसाद होता हें नसून त्यांनीं प्रत्येक शब्दोच्चाराला आधार मिळण्याकरितां केलेला उद्योग हें आहे. त्यांनीं आणीबाणींच्या प्रसंगीं असामान्य धैर्य दाखविलें आणि ' लोकात्तराणां चेतांसि कोहि विज्ञातुमर्हति ' असा धन्योद्गार जनतेच्या तोंडून वदविला, याचेंही बरेचसें श्रेय त्यांनीं संपादिलेल्या ज्ञानाकडेच देणें वाजवी आहे. त्यांनीं जन्मांत कधीं वायफळ विचारांमध्यें काळ दवडला नाहीं, आणि ज्याचे विचार लटपटित नसतात त्याला प्रतिपक्षाकडून पराभव होण्याची भीति सहसा असणें शक्य नाहीं.इंग्रजींत Courage of Conviction ह्मणतात, ती मनोवृत्ति निर्दोष विचारांशिवाय अस्तित्वांत येत नाहीं. आपले विचार योग्य आहेत, सयुक्तिक आहेत, त्यांच्यामागें सत्याचा भरपूर भरभक्कम पाठिंबा आहे अशी ज्याच्या मनाला पूर्ण खात्री असते, त्यालाच त्या विचारांचें समर्थन ' सत्यमेव जयति ' या सुभाषितास अनुसरून प्रतिकूळ परिस्थितींतही करण्याची दिक्कत वाटत नाहीं. ज्याचे विचार अपरिपक्व असतील त्याला आपल्या मतांची स्थिरता कायम ठेवतां येत नाहीं, मग स्वतःच्या विचाराविषयीं स्वतःचें मन खात असल्यास प्रतिपक्षासमोर छाती ठोकून ' शेंडी तुटो कीं, पारंबी तुटो ' अशा निर्धारानें सांगण्याचें धैर्य कोठून येणार ? तो प्रतिकूळतेचे आघात बसूं लागतांच डगमगतो आणि स्वमतप्रतिपादनाच्या बुडाशीं खंबीर आधारांची वाण भासत असल्यामुळें वादाच्या अथवा वाक्संग्रामाच्या प्रसंगीं माघार घेण्याशिवाय त्यास गत्यन्तरच उरत नाहीं. टिळकांचा त्यांच्या प्रतिपक्षाला बिलक्षण दरारा वाटत होता हें सुप्रसिद्ध आहे. टिळकांनीं केलेली गोष्ट पसंत नसल्यासही त्यांच्या वाटेस जाण्याचें साहस चांगल्या ' मी मी ' म्हणणाऱ्या प्रतिपक्षीय लढवय्यांना करवत नसे; न जाणो टिळकांच्या वाटेस गेलो तर हात दाखवून अवलक्षण उघडकीस आणल्याचा अतिप्रसंग घडेल असें त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना व कित्येकदां शत्रूंनाही वाटत असे; पत्रिकेंत त्यांच्या ग्रहांची रचना शत्रुन शक्र होती हें त्यांच्या दराऱ्याचें कारण नाहीं. ' सत्याय मितभाषिणाम् ' असें कालिदासानें एक रघुवंशीयराजांचें महात्म्य-लक्षण सांगितलें आहे. टिळकांचा सार्वजनिक कार्यांतील व्याप वाढून अनावर होईपर्यंत ते मितभाषीं होते असा पुरावा आढळतो. सार्वजनिक कार्यांची साधक बाधक चर्चा करण्यांत त्यांच्या आयुष्याचा अखेरचा भाग फार मोठ्या प्रमाणामध्यें गेला. चोवीस तासांमध्यें त्यांना आवश्यक विश्रान्तीपेक्षां जास्त काळ एकान्तवास बिलकूल मिळाला नाहीं. त्यांच्या घरांत जेव्हां जावें तेव्हां माणसांचा गर्दी असा देखावा सदैव बिनचूक दृष्टीस पडत होता; तथापि जेव्हां ते सार्वजनिक कार्यांत त्यांना शेवटच्या दिवसांप्रमाणें अहर्निश मन घालावें लागत नव्हतें तेव्हां त्यांनीं

आपला फुरसतीचा वेळ बौद्धिक व्यवसायांत घालविला. आमच्या या अंकांत रा. गुरुजी यांनीं आपल्या आठवणींत हा मुद्दा जराशा निराळ्या पण अत्यंत मार्मिकरीतीनें विशद करून दाखविला आहे. टिळकांशीं बोलावयाचें झाल्यास पंचाइत पडायची अशी एक आख्यायिका देऊन आगरकरांच्या उत्तरानें टिळकांच्या चारित्र्यावर प्रकाश पाडला आहे. टिळक आपला वेळ फुकट न दवडण्यासाठीं जपतात व या त्यांच्या स्वभावामुळें त्याच्याजवळ लघळपणा करणें कोणालाही दुरापास्त वाटतें असें आगरकरांनीं उत्तर दिलें होतें. यावरून टिळकांनीं आपल्या चरित्राला त्यांनीं प्रथमपासून कशी शिस्त लावली होती याची माहिती मिळते. सार्वजनिक कार्यांमधील हजारों भानगडींची गुंतागुंत मागें असतांही मंडालेच्या कारागृहवासांत कै. टिळकांना आपलें चित्तावधान सहज तात्विक ग्रंथांच्या व्यासंगांत अडकवून टाकतां आलें व प्राप्तपरिस्थितींतच शक्य तेवढें मन निश्चिंत कसें करतां येते याचा त्यांनीं धडा घालून दिला. मोठ्या माणसांचें मन कदाचित् उपजतच लोकोत्तर गुणांनीं युक्त असेल. पण विचारांच्या अंकुशानें ते मनाला आपल्या ताब्यांत ठेवतात, ही गोष्ट नाकबूल करतां येण्यासारखी नाहीं. त्यांचा थोरला मुलगा मरण पावला त्यावेळीं त्यांचें हृदय दुःखानें करपलें होतें; जगांतील सर्व माणसांप्रमाणें पूत्राच्या मृत्यूनें त्यांचें मन शोक व्याप्त झालें होतें,. कित्येक वेळा त्यांच्यासारख्या महाविचारी व धोरणी माणसालाही पुत्रानें इहलोक सोडल्याचें भान राहिलें नाहीं व पुत्रनिधनानंतर एक महिना लोटला असतांहि त्यांनीं आपल्या पुत्राला नेहमींच्या रिवाजास अनुसरून हाक मारली आणि नंतर त्यांच्या मरणाच्या स्मरणानें अश्रु गाळले अशी हकीकत रा. कुळकर्णी यांनीं दिली आहे. सामान्यतः मरणवियोगाच्या दुःखांनीं माणसावर जो परिणाम घडतो तो त्यांच्यावरही घडत होता अशी खात्री पटण्याला ही हकीकत पुरेशी आहे, पण दुसरीं माणसें पुत्रमरणानें हाय खाऊन जगांतून उठलीं असतीं व टिळकांवर त्या दुःखाचा पगडा विशिष्ट मर्यादेपलीकडे बसला नाहीं हाच त्यांच्यांतला व इतरांतला फरक आहे. असा फरक आपोआप होत नाहीं, सांसारिक दुःखापेक्षां देशसेवेचीं कर्तव्यें अधिक महत्त्वाचीं आहेत यांची ओळख त्यांनीं आपल्या अंतर्यामांत बुजूं दिली नाहीं व ही 'सुखदुःखें समेकृत्वा' या तत्त्वाचा मूर्तिमंत साक्षात्कार पटविणारी वृत्ति जन्मतः त्यास मिळालेली नव्हती, त्या वृत्तीच्या संपादणीकरितां त्यांना खडतर प्रयत्न करावे लागले आणि संकटाच्यावेळीं त्यांनीं या वृत्तीला प्रत्यक्ष कृतीनें दृढत्व आणलें असें त्यांच्या लोकोत्तरत्वाचें रहस्य आहे.

ज्या वेळीं सगळें जग गाढ निद्रेंत मग्न असतें त्यावेळीं महात्मे आपल्या आयुष्यांतील मोठमोठाल्या कार्यांची तयारी करीत असतात अशा अर्थाचें एक इंग्रजींत काव्यसुभाषित आहे. 'या निशा सर्व भूतांना तस्यां जागर्ति संयमी' याचा वरच्या इंग्रजी सुभाषितांतल्या व्यावहारिक अर्थाप्रमाणेंच अर्थ लावतां येईल.

लोकांना आपल्या कर्तव्याची ओळख नसते व ते ज्या परिस्थतींत जन्माला येतात, किंवा कर्तबगारीच्या ढिलाईमुळें ज्यांना प्राप्तपरिस्थितींतच सुख मानून दिवस कंठण्याची आवड वाटते, त्यावेळीं महापुरुष आपल्या भावीकार्याच्या विचारांत दंग असतात. ना. गोखले एकदां वरिष्ठ कायदेकौन्सिलच्या कामाकरितां गेले असतां त्यांचा सोबती शेजारच्या खोलींत टाराटूर निजला आणि दुसऱ्या दिवशीं कौंन्सिलमध्यें काय बोलावयाचें याचा विचार करीत गोखले जागत बसले होते अशी एक आख्यायिका सुप्रसिद्ध आहे. त्यांच्या कौन्सिलांतील अप्रतिम कामगिरीची सिद्धता त्यांना अशा रीतीनें रात्रीच्या रात्री जागरणांत घालवून करावी लागत असे. त्याप्रमाणें टिळकांनाही आपल्या देशसेवेची सिद्धता दिवसरात्र, ख्याली खुशाली, सुखस्वास्थ वगैरे स्वार्थी गोष्टींकडे लक्ष न देतां करावी लागत होती. जन्मतः कोणीही मोठा नसतो. मोठेपणाचा मार्ग कष्टानें आक्रमण करावा लागतो, आणि त्यांच्यायोगानें वाढणारी बडेजावी देखील कटंकमय असते 'ज्याचें अंगीं मोठेपण, तया यातना कठीण' या तुकोबांच्या वचनानुसार टिळकांना देशसेवेच्या कामीं विलक्षण यातना सोसणें भाग पडलें. आल्यागेल्यांची विचारपूस करण्यांत दिवस लोटला, व त्यामुळें वाचनमननाचें कार्य होऊं शकलें नाहीं तर टिळकांना सल्लामसलतीसाठीं अथवा इतर कारणासाठीं येणारांची वर्दळ संपल्यावर कित्येकदां मध्यरात्र उलटल्यावरही आपला वाङ्मयव्यासंग उरकण्याची पाळी येत असे. अशा गोष्टी त्यांच्या चरित्रांतून अनेक दाखवितां येतील. सारांश त्याचे बरेच महत्त्वाचे गुण प्रयत्नसिद्ध होते, उपजत नव्हते.

टिळकांनीं आपल्या भावी उत्कर्षाचीं बीजें बालवयांतच पेरलीं होतीं, असें त्यांच्या चरित्रांवरून दिसून येतें. विद्याभिरुचि त्यांना बालवयांत जडली व ती त्यांनीं राजकारणाचे हजारों व्यवसाय मागें असतांही आमरण कायम ठेवली. जेव्हां संपादक अगर सल्लागार या नात्यानें जो विषय पुढें येईल त्याचें यावच्छक्य साद्यन्त ज्ञान संपादन करावयाचें असा त्यांचा बाणा होता. अमूक एका विषयाशीं आपला पूर्वी कधीं संबंध आलेला नव्हता, अथवा त्यांत आपली गति होण्याचा संभव नाहीं म्हणून त्यांनीं प्रसंगोपात्त समोर आलेल्या विषयाकडे कानाडोळा होऊं दिला नाहीं. ते सर्वज्ञ होतें असें आम्हीं म्हणत नाहीं. तथापि To know everything of something and something of everything या इंग्रजी म्हणीप्रमाणें बहुधा सर्व विषयांत त्यांची गति होती. त्यासाठीं त्यांना परिश्रम करावे लागले, तरी त्यांनीं कधीं माघार घेतली नाहीं. जगांत परिश्रमसाध्य किंवा निग्रहसाध्य नाहीं असा विषय एकही सांपडणें शक्य नाहीं. मानवी कर्तृत्वानें जे विषय जगांत निर्माण झाले त्यांचें ज्ञान मानवी बुद्धीला अगम्य असेल असें टिळकांना वाटत नव्हतें. म्हणूनच ते आपली जिज्ञासा सदैव जागृत ठेवून तिच्या कक्षेंत येतील तेवढ्या विषयांना गुंतविण्याला सज्ज असत. लंडनशहरची माहिती त्यांनीं लंडनशहरांत

वास्तव्य असतांना मिळविली, मुद्रण यंत्राच्या खरेदीच्या वेळीं त्यांनीं यंत्राविषयीं समग्र ज्ञान आपलेसें करून टाकल्यावर त्या यंत्राच्या दुकानांत प्रवेश केला. लहानपणीं कालेजांत असतांना अलंकारविषयाचें त्यांनीं संपूर्ण अध्ययन करून स्वतःच्या समाधानाखातर कित्येक जंत्र्या स्वहस्तें तयार केल्या, प्लेगची उपपत्ति लावतांना त्यांनीं आर्य आणि आंग्ल वैद्यकांचीं पुस्तकें अवलोकन केलीं, संमतिवयाचा कायदा निघाला तेव्हां प्रतिपक्षानें वेदाचीं सूक्तें आधारार्थ पुढें आणलीं म्हणून त्यांनीं वैदिक वाङ्मयाचें परिशीलन केलें, इत्यादि गोष्टी त्यांचें उद्योगशालित्व मनावर ठसवितात. प्रत्येक वृत्तपत्राच्या संपादकाला नानाविध विषयांवर लिहिण्याचा प्रसंग येतो. टिळक कोणताही विषय आकस्मिक रीतीनें समोर आला तरी त्याचा योग्य परामर्शाला डगमगत नसत, याचें कारण त्यांची उपजत बुद्धिमत्ता नसून त्यासंबंधीं परिश्रम करण्याची त्यांची उत्कंठा हेंच होय. त्यांचा हा अखंडित उत्साह त्याच्या बुद्धिमत्तेकडून विद्वत्तेचा अफाट संग्रह करवीत होता. अलीकडे तर ते एक ज्ञानाची सजीव मूर्तीच बनले होते. पण हा सर्व त्यांच्या परिश्रमाचा परिणाम होता. ज्यावेळीं ते कालेजांत शिकत होते अथवा जेव्हां ते कालेजांतून नुकतेंच बाहेर पडले होते, तेव्हां त्यांच्याजवळ ज्ञानाचें अलीकडच्या काळांतल्याप्रमाणें प्रचंड भांडवल नव्हतें, असें म्हटल्यास त्यांची निंदा केल्याचा आरोप आमच्यावर कोणीही लादणार नाहीं. विद्यार्थीदशेचा काळ त्यांनीं वायां जाऊं दिला नसला तरी आयुष्याच्या प्रगतीबरोबर ज्ञानाचा उत्कर्ष वाढत जातो ही गोष्ट नाकबूल करतां येत नाहीं. अध्ययन संपवून ते अध्यापनाच्या कार्यांत शिरल्यावर त्यांनीं शिक्षणाला राजीनामा दिला. त्या दरम्यानच्या अवधींत बराच मोठा ग्रंथसंभार पाहून टाकला असावा असें अनुमान करण्यास जागा आहे. त्यांच्या बुद्धिमत्तेची प्रसवशक्ति १८९० सालानंतर ताबडतोब दृष्टीस पडली. तोंवर ते एक विद्वान् प्रोफेसर आहेत असाच लोकांचा समज होता. त्यांचा ग्रंथकर्तृत्वाचा प्रारंभ आणि निर्भेळ सार्वजनिक चळवळीचा, प्रारंभ हे दोन्ही एकाच वेळीं झाले. सार्वजनिक कार्याचा व्याप वाढल्यावर त्यांनीं विद्याव्यासंगाला योग्य अशी फुरसत फार मिळणें शक्य नव्हतें. तथापि मूळचा त्यांचा ओढा राजकीय पुढारीपणापेक्षां विद्याव्यासंगाकडे विशेष असल्यामुळें त्यांनीं जेव्हां ज्या मानानें फावेल तेव्हां त्या मानानें ग्रंथावलोकन करण्याचा नित्यक्रम ठेवला होता. विद्याव्यासंगामुळेंच त्यांचें कारागृहवासांतलें वास्तव्य काहीं अंशीं सुखाचें झालें, त्यांनीं प्राप्तपरिस्थितीची व आपली निग्रहबळानें ताटातूट करून घेण्याची कला संपादलेली होती. आपण दुःखाच्या परिस्थितींत आहोंत याचें भान उरूं द्यावयाचें नाहीं आणि त्यांतल्या त्यांत जेवढा सुखाचा भाग मिळेल तेवढा मिळवून मनाची तरतरी कायम ठेवावयाची हा त्याच्या स्वभावांतला विशेष ध्यानांत बाळगण्यासारखा आहे. सामान्यतः मानवी जीव दुःखाच्या अल्पस्वल्प माऱ्यांतही स्वकर्तव्याच्या जाणिवेस अंतरतो. आमच्या तत्त्वज्ञानाच्या रहस्याचा रूढिजन्य अर्थ-

बोधामुळें जो विपर्यास झाला आहे त्यानें हिंदूजीवाला अगदीं नेभळट बनवून सोडलें आहे. संकटांची निस्सीम भीति व तीं कोसळूं लागली म्हणजे त्याच्या हलक्याशा भारानें देखील चिरडून जाण्याजोगा मनाचा कमकुवतपणा हे दोन दोष तत्त्वज्ञानाच्या विपर्यासानें हिंदू लोकांच्या स्वभावांत शिरलेले आहेत. वास्तविक सूक्ष्मदृष्टीनें विचार केल्यास ' सुख पहातां जवा पाडें ' नसून ' सुख पर्वताएवढें ' आहे अशी कबूली द्यावी लागते. मनुष्य वर्षेंच्यावर्षें सुखानुभव घेत असतो. पण एखादे वेळीं°जरा दुःख भोगण्याची पाळी आली कीं त्याला मागचा दीर्घकालीन सुखानुभव आठवत नाहीं, त्याला दुःखाची झुळुक लागतांच एकदम सारें जग दुःखमय आहे असें वाटतें. टिळक वरील सामान्य नियमाला अपवाद होते. आणि मनुष्याची खरी मर्दुमकी या अपवाद होण्यांतच आहे. जगांत दुःखें नसतीं, संकटाच्या उत्पत्तीला थारा नसता तर मनुष्याच्या पुरुषार्थाला जागाच उरली नसती, असा आमचा समज आहे, टिळकांनीं इतर महापुरुषांप्रमाणें या समाजाला आपल्या वर्तनाची पुष्टि दिलेली आहे. आपला उत्कर्ष व्हावा (मग तो सांपत्तिक असो, धार्मिक असो, सामाजिक असो अथवा राजकीय असो) असें कोणत्या अभागी माणसाला वाटत नाहीं. उत्कर्षेच्छा ही उत्कर्षशून्यतेमुळें अवतरते, हें लहान पोरासही कळण्यासारखें आहे. ज्या गोष्टीचा अभाव असेल तो अभाव घालविणें हेंच मनुष्याच्या पुरुषार्थाचें मूळ आहे. टिळकांनीं स्वदेशाचा उद्धार हें ध्येय आपल्यासमोर ठेवलें, आणि तें सिद्धीस नेण्याकरितां संकटाचा कसाही वेढा पडला तरी मनाची हिंमते शाबूत राखली. मनाची हिंमत ही एक प्रभावशाली शक्ति आहे. ती ज्याच्याजवळ असेल त्यांचें निम्में काम फत्ते झालें म्हणून समजावें. टिळकांनीं १९०८ सालीं हायकोर्टाची शिक्षा ऐकण्यापूर्वी जे अतुलधैर्य दाखविलें ते त्यांच्या १९१४ सालांतल्या सुटकेनंतरच्या जयजयकाराला बहुतांशीं कारणीभूत आहे. त्यांच्या धैर्याच्या १९०८ सालच्या संस्मरणीय प्रसंगाशिवाय आणखी बऱ्याच गोष्टी प्रसिद्ध आहेत. एक मुलगा नुकताच कालमुखीं पडलेला, दुसऱ्याला रोगानें पाहिलेलें अशा स्थितींत पित्याच्या कर्तव्याला प्राधान्य द्यावयाचें कीं, देशहिताच्या कर्तव्याला प्रमुखत्व द्यावयाचें असा बिकट व्यामोह त्यांना एकवेळ पडला होता. पण दोन्ही कर्तव्यांतील तरतम भाव ओळखून त्याप्रमाणें वागण्याचें कौशल्य टिळकांच्या अंगीं होतें. पिता या नात्यानें एका पुत्राची हानि आणि दुसऱ्या पुत्राची रुग्णावस्था या दोन्ही कारणांनीं त्यांच्या अंतःकरणांस पिळ पडला नव्हता अगर ते तिळतिळ तुटत नव्हते असें म्हणतां येत नाहीं, परंतु देशहिताचें कर्तव्य जास्त जोखमीचें आहे, महत्त्वाचें आहे असें समजल्यावर त्याची हेळसांड त्यांनीं केली नाहीं. पित्याचें कर्तव्य त्यांचीं क्षणभर बाजूस ढकलून दिलें, व देशहिताची पैरवी अगोदर केली. त्यांनीं गीतेंतल्या प्रवृत्तिपर अर्थाचें ज्ञान रोजच्या वर्तन क्रमांत अजमावून पाहिलें होतें, असें वरील उदाहरणावरून म्हणावयास हरकत नाहीं. तथापि त्यांची मनाची साम्यावस्था प्रयत्नसिद्ध होती, निसर्ग प्राप्त

नव्हती असें आह्मांस या स्थळीं सांगावयाचें आहे. त्यांचें चित्त जात्याच वज्रादपि कठोर आणि कुसुमादपि मृदु होतें असा भावार्थ व्यक्त करून आपणास टिळक अनुकरणीय पुरुष नाहींत, आपल्या सामर्थ्याबाहेर त्यांची कर्तृत्वशक्ति होती असें मानून स्वतःच्या आळसाला उत्तेजन देणाऱ्या लोकांनीं, विशेषतः तरुणांनीं परिश्रमशालित्व या टिळकांच्या गुणाकडे केव्हांही कानाडोळा करूं नये अशी आमची विनंति आहे. उच्चध्येयु माणसाच्या डोळ्यापुढें नित्य असलें ह्मणजे कसाही प्रसंग ओढवला तरी तो आपल्या ध्येयाच्या सिद्धीचा मार्ग काढण्यास चुकत नाहीं. टिळकांच्या नशिबीं कारागृहवास तीन वेळ आला, तिन्ही वेळां त्यांना थोडया फार सवलती मिळाल्या व टिळकांनीं मनांतल्यामनांत दुःख न करतां मोठमोठाल्या ग्रंथाची निष्पत्ति बाहेर पाडली. त्यांनीं तुरुंगवास ही एक यदृच्छया प्राप्त झालेली सक्तीची फुरसतच आहे असें मानून तो रिकामपणा सार्थकी लावला. मनामध्यें अवास्तव प्रवृत्तींची वाढ होऊं नये एतदर्थ टिळक फार कसोशीची खबरदारी घेत होते, आणि शृंगार या विषयाला खाजगी संवादांत आणि चिंतनांत त्यांनीं मज्जाव केलेला होता. थोडया दिवसांपूर्वी पुण्याचे रा. म. गो अभ्यंकर यांनीं लोकसंग्रहांत आठवणी देतांना टिळक शृंगारपर चर्चेला कसा फाटा देत असत व त्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायांतल्या एका श्लोकांत शृंगारार्थक पदें असूनही त्यांचा अर्थ निराळा लावल्याचें नमूद केलें आहे. 'लोष्टवत् परद्रव्येषु,' 'मातृवत् परदारेषु' वगैरे तत्त्वें टिळकांनीं मनाचे दमन करूनच संपादलेलें असलीं पाहिजेत. स्वामी विवेकानंदांनीं मनोजय होण्यासाठीं कित्येकवेळा खडतर उपाय अंमलांत आणल्याच्या कथा त्यांच्या चरित्रांत आहेत. एकदां कामविकाराला जाळण्याकरितां त्यांनीं खरोखरच जळत्या शेगडीवर बैठक ठोकून शरीराचा जघन्यभाग भाजून काढला, अशी एक गोष्ट आहे. टिळकांनीं आपल्या आयुष्यांत असा चित्तदमनार्थ क्रूराचार केल्याचें ऐकिवांत नाहीं. पण लोकापवाद टळावा आणि चित्ताला विकारांच्या जाळ्यांत चुकून सुद्धां सांपडण्याचा प्रसंग येऊं नये ह्मणून टिळक ताईमहाराजांच्या प्रकरणांत किती काळजी बाळगीत असत, याची साक्ष देणारीं माणसें आजच्या घटकेस महाराष्ट्रामध्यें कितीतरी हयात आहेत. अस्तु. अशा रीतीनें त्यांच्या एकेक गुणांतील नैसर्गिक भाग किती व श्रमप्राप्त किती याचा उलगडा करीत बसल्यास मोठा ग्रंथ व्हावयचा. एखादा पुरुष जनतेच्या अग्रभागीं चमकला ह्मणजे त्याच्या अंगीं नैसर्गिक गुणाचा आरोप करून फक्त भक्तिभावानें त्याचे पोवाडे गाण्यापलीकडे लोक फारसा त्याच्या चरित्राचा विचार करीत नाहींत. आणि महात्म्याचे गुण नैसर्गिक असतात, असा एकवेळ मनाचा ग्रह करून घेतला कीं, त्याचें अनुकरण करून थोडाबहुत स्वोद्धाराचा पंथ चोखाळण्याची महत्त्वाकांक्षा लंगडी पडते. टिळकांच्या गाइल्या जाणाऱ्या स्तुतिस्तोत्रांमध्यें हाच प्रकार दिसून येतो. आह्मी आरंभीं या एकंदर स्थितीवरूनच टिळकांच्या

समकालीन पिढीनें त्यांचे देणेंहारे माजविण्यापलीकडे विशेष कर्तबगारी दाखविण्याची चाड बाळगली नाहीं असें ध्वनित केलें आहे. टिळकांच्या चरित्रांतली मानुषता लक्षांत ठेवून तरुणांनीं आपल्या वर्तनकमाला वळण दिल्यास महाराष्ट्रांतला किंवा हिंदुस्थानांतला प्रत्येक तरुण टिळकांची योग्यताच संपादन करील असें आमचें प्रतिपादन नाहीं. तो टिळक होणार नाहीं हें आह्मांसही प्रांजळपणें कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. पण टिळकाच्या अनुकरणानें अंशतः टिळक होण्याचा तरुणांनीं निश्चय केल्यास आमच्या मायभूमीचे पांग फिटण्यास कितीसा वेळ लागणार आहे ? आज अनेक गुणांची मूर्ति असणारा एक टिळक हजारपांचशें वर्षांनीं जन्मास येण्यापेक्षां टिळकांच्या एकेका गुणाचा उत्कर्ष ज्यांच्यांत आढळतो असे हजारों टिळक प्रत्यहीं निर्माण झाल्यास त्यांची आवश्यकता देशाला अधिक आहे, अशी आमची नम्र समजूत आहे.

कै. लो. टिळकांचें
लॉकेटस् !

लॉकेटस्--हे घडचाळाच्या सांखळीस लावण्यास फारच फ्यान्सी असून त्याचप्रमाणें कोटाच्या कॉलरवर मेडलप्रमाणें लावण्यास अति शोभायमान आहेत यांत मागें व पुढें दोन बाजूस टिळक-गांधी अगर श्रीकृष्ण बसवून मिळेल. किंमत चांदीचें अर्धा रुपया, साईज फ्यान्सी नक्षीचें दर नगास रु. १॥।=, पावली आकार ओव्हल रु. १।॥, रोल्डगोल्ड मेडल साईज रु. १।= व १८=.

ब्रूचस्--हें गिल्टचे असून एकाच फोटोचे मिळेल, हें कोटाचे कॉलरवर, टोपीवर, व्हॉलटीअरस्, गणपतीचे मेळेवाले, सभेचे डेलिगेटस् वगैरेना फुलें लावण्याच्या ऐवजीं हे लावण्यास दिल्यास लो० टिळकांचे एक प्रकारें स्मारक होऊन अत्यंत शोभायमान दिसेल. किंमत दर नगास -॥- व ।=.

सूचना:--ठोकबंद घेणाऱ्यांस भरपूर कमिशन देऊं या शिवाय कोणत्याही देशभक्तांचे, देवादिकांचे सत्पुरुषांचे फोटो गिऱ्हाईकांच्या मर्जीप्रमाणें लॉकेट व ब्रूचमध्यें बसवून देऊं. व स्वतःचे असल्यास फोटो पाठवावा व पहिल्यानें एक रुपया जास्त किंमत पडेल.

श्री शारदा फोटो कंपनी, सोलापूर सिटी.

No. 7.6.44

कै. टिळकांचें आत्मचरित्र.

[कै. टिळकांचें आत्मचरित्र हे शब्द पाहून आमच्या वाचकांना कदाचित् आश्चर्य वाटेल. टिळकांनीं आपल्या आयुष्यांत कधीं आत्मचरित्राचा खर्डा लिहून ठेवल्याचें कोणाच्या ऐकिवांत नाहीं. मग आम्हीं हें आत्मचरित्र कोठून पैदा केलें असा प्रश्न उद्भवणें साहजिक आहे. कै. टिळक विलायतेस असतांना त्यांची मुलाखत ब्रिटन अँड इंडिया नामक नव्यानें निघालेल्या साप्ताहिकाच्या प्रतिनिधीनें घेतली होती, व तिची विस्तृत हकीकत त्यावेळीं त्या साप्ताहिकांत प्रसिद्धही झाली होती. त्या भेटीचे प्रसंगीं लोकमान्यांनीं आपल्या आयुष्यांतील बऱ्याच ठळकठळक गोष्टींची माहिती मुलाखतदाराला दिली होती. लोकमान्यांनीं आपली निरनिराळ्या राजकीय सामाजिक विषयावरील मतांची थोडक्यांत परिस्फुटता केली होती. आम्हीं त्या मुलाखतीतला चरित्रविषयक भाग टिळकांनीं निवेदन केलेलें आत्मचरित्रच आहे असें समजतों. कोणी बारकाईनें प्रयत्न केल्यास गीतारहस्यांतून टिळकांचें आत्मचरित्र त्याला तयार करणें दुरापास्त नाहीं. सं. उःषकालमाला]

मुलाखतदाराजवळ दुसऱ्या विषयावर बोलणें झाल्यावर लो. टिळक म्हणालेः— ' वस्तुतः माझ्या मनामध्यें ज्ञानदान हेंच माझ्या आयुष्याचें ध्येय ठरवावें असा उद्देश होता, व त्याप्रमाणें मी शिक्षणाच्या कार्यांत आयुष्याच्या सुरवातीस पडलों. जुन्या नव्या ध्येयाचें शिक्षण जनतेस द्यावें हा माझा हेतु होता. लोकांना खऱ्या हिंदी शिक्षणाची तीव्र आवश्यकता आहे असें १८८० सालीं माझ्या मनाला पटलें होतें. राजकीय पुढारी व्हावें असा माझा उद्देश त्यावेळीं मुळींच नव्हता. १८८२ सालच्या एज्युकेशन कमीशनपुढें मी माझे शिक्षणविषयक विचार मांडले असून ते त्या कमीशनच्या अहवालांत नमूद आहेत. माझे सहकारी मित्र रा. आपटे यांनींही आपले शिक्षणासंबंधींचे विचार सदर कमिशनपुढें सांगितले होते. त्यानंतर माझ्यावर तुरुंगांत जाण्याची पाळी आली. " हे शेवटचें वाक्य टिळकांनीं अत्यंत शांतपणानें उच्चारलें.

" तुम्हांस कैदेंत जाण्याचा प्रसंग कां आला ? " मुलाखतदार म्हणाला.

" मी दोन वृत्तपत्रें काढली होतीं; आणि कोल्हापुरच्या महाराजांना त्यांचे कारभारी फार वाईट रीतीनें वागवितात अशा अर्थाचा मजकूर मी छापल्यामुळें माझ्यावर खटला झाला. पण त्याचा निकाल होऊन तदनुसार शिक्षा भोगण्याचा अवधि संपल्यावर मी पूर्ववत् माझ्या स्वीकृत कार्यास लागलों. मी चालुविलेल्या शाळेशीं माझा १८९० पर्यंत संबंध होता. पुढें तो संबंध सुटला. मी या शाळेंत गणीत, संस्कृत, पदार्थविज्ञानादि शास्त्रें शिकवीत होतों. नंतर शाळा कोणत्या तत्त्वावर चालविलीं जावीं याविषयीं माझा सहकारीवर्गाशीं मतभेद झाला. सरकारनें मदतीदाखल रक्कम देऊन शाळेच्या अंतर्गत व्यवस्थेंत हात घालण्याचा प्रयत्न केला. सरकारनें पाहिजे तर मदत द्यावी पण शाळेच्या व्यवस्थेंत ढवळाढवळ करूं नये असें माझें मत होतें. आणि त्यासाठींच सरकारची ग्रँट घेऊं नये असें मी म्हणत होतों. पण इतरांचें माझ्या विरुद्ध बहुमत होऊन मला शाळेंत काम करणें शक्य राहिलें नाहीं. तेव्हांपासूनच माझी शाळा सरकारच्या ताब्यांत गेली आणि ती ज्या ध्येयाकरितां अस्तित्वांत आली तें ध्येय मागें पडून देशाचें नुकसान झालें. मध्यंतरी १८९० पासून मी एक वकीलीचा वर्ग काढला होता, आणि तो १८९८ पर्यंत टिकला. १८९० मध्येंच मी वर्तमानपत्रकाराच्या ग्रंथांत पडलों आणि त्यांमध्यें सर्वस्व खर्ची घातलें. केसरीपत्र केवळ राजकीय जागृतीच्या कार्याकडेच मी लाविले होतें. प्रथम त्याचे वर्गणीदार हजार होते, ते पुढें ५००० झाले आणि हल्लीं त्यांची संख्या वावीस हजार आहे. माझी मूळची वाङ्मयसेवेची प्रवृत्ति परिस्थितीमुळें बाजूस राहून माझ्या कार्यांत राजकारणाला प्रमुख स्थान देणें भाग पडलें.

1375

नाना फडणिसांचा उत्सव आणि कै. टिळक.

लेखक:—के. बी. जोशी.



कै. लो. टिळक यांचा वेळासला नाना फडणिसांची पुण्यतिथी साजरी करण्याच्या समारंभाशीं कोणत्या प्रकारच्या संबंध होता. या विषयीची हकीकत दुसरीकडे येऊन गेलेली आहे * त्या समारंभामध्यें कै टिळकांनीं १९०४ सालीं प्रामुख्यानें भाग घेतला,अलौकिक पुरुषाच्या अंगीं असामान्य गुण कसे वसत असतात व तो आपल्या अनुयायांना कित्येक आचारविचारांचा धडा कसा सहज रीतीनें घालून देतो याचा अनुभव कै. टिळकांनीं आपल्या निसर्गरम्य वर्तनक्रमामध्यें आणून दिला. वेळासला नानांची पुण्यतिथी साजरी करण्याचीं कल्पना निघाल्यानंतर तिला मूर्तस्वरूप आणण्यचें सगळें श्रेय कै. टिळकांकडे आहे. ती कल्पनेची इष्टता टिळकांनीं मान्य करून त्या कल्पनेच्या पुरस्कर्त्यांना टिळकांनीं उत्कट प्रोत्साहन दिलें. आरंभापासून या उत्सवाशीं त्यांचा निकट संबंध होता, पण चौथ्या उत्सवापर्यंत त्यांना त्यांत प्रत्यक्ष भाग घेतां आला नाहीं. त्या वर्षी टिळकांनीं अध्यक्षपदवी सनाथ केली व कार्यक्रमाच्या ओघांत कांहीं कांहीं गोष्टी अशा अमलांत आणल्या कीं, त्या योगानें अद्यापि कै टिळकांविषयीं धन्यतेचे उद्गार काढले जातात. त्यांनीं पाडून दिलेले प्रघात जोंपर्यंत नामशोष होणार नाहींत तोंपर्यंत ते प्रघात टिळकांचें स्मारकच होऊन राहतील याबद्दल शंका बाळगावयास नको.

वेळासला होणाऱ्या नाना फडणिसांच्या स्मरणोत्सवांत एके दिवशीं त्यांच्या तसबिरीची मिरवणूक काढण्याची रीत आहे. ही मिरवणूक भानूंच्या घरासमोर आली ह्मणजे तेथें थोडावेळ थांबवून पानसुपारीचा लहानसा समारंभ भानूंच्या घरीं केला जातो. त्यावेळीं तसबीर भानूच्या घरच्या ओटीवर ठेवण्याची वहिवाट आहे. ज्या घराण्यांत नाना फडणिसांचा जन्म झाला, तें मूळ वेळासचें ही गोष्ट इतिहासज्ञांना सांगावयास नको. या घराण्याच्या ज्येष्ट शाखेची परंपरा सदरहू उत्सवापर्यंत अखंड

---

* इंदुप्रकाशकारांनीं टिळक गुणकलाप या नांवांचा जो खास अंक काढला आहे, त्यामध्यें रा. जोशी यांनीच उत्सवाची हकीकत पृष्ठ २३ वर विस्तारपूर्वक दिलेली आहे.

चाललेली होती. त्या वर्षी सदर घराण्यांतील अखेरचे औरस वंशज हयात होते. कै. हरि अप्पाजी भानू हेच ते वंशज होते. ते व त्यांची सच्छील पत्नी गंगाबाई हें दम्पत्य जुन्या घरंदाज लोकांच्या चालीरीती कशा उदात्त व उदार स्वरूपाच्या असतात याचें एक मूर्तिमंत उदाहरणच होतें असें म्हटल्यास हरकत नाहीं. अलीकडे त्यांची स्थिति विलक्षण खालावलेली होती. तथापि अतिथि अभ्यागतांचें स्वागत, आप्तेष्टांचा परामर्ष वगैरे कुलाचारांत त्यामुळें त्यांनीं शेवटपर्यंत व्यत्यय पडूं दिला नाहीं. वेळासकरांचें प्रेम त्यांवर इतकें होतें कीं, त्यांची अडचण ती आपली अडचण असें समजून ते कै. हरि अप्पाजी भानू यांच्या घरच्या कारभारांत कोणतेही न्यून न राहूं देण्यासाठीं झटत होते. कै. हरि अप्पाजी यांची कान्ति, त्यांच्या चेहऱ्यावरील वगैरे केवळ बाह्यलक्षणें त्यांस पहाणारांच्या मनावर छाप पाडण्यासारखीं होतीं. त्यांच्या मुद्रेवर वृद्धापकाळानेंही न भंगलेलें गांभीर्य अवलोकन करून प्रत्येकाच्या हृदयांत त्याविषयीं अकृत्रिम आदर उत्पन्न झाल्याशिवाय रहात नसे. प्रख्यात ऐतिहासिक कुलामध्यें जन्मास आलेला हा पुरुष व अर्वाचीन इतिहासाचें प्रवर्तन करणारे कै. लो. टिळक यांची गांठ १०४ सालांमध्यें सार्वजनिक रीत्या पडली, तेव्हां टिळकांनी कै. हरि अप्पाजींचा अपूर्व सन्मान करून मिरवणुकीसाठीं जमलेल्या सर्व लोकांच्या नेत्रांतून प्रेमाश्रुंचा महापूर वहावयास लाविला. नानांची मिरवणूक रीतसर भानूंच्या घरीं आली. टिळक तेथें गेले. आणि मध्येंच एकदम उठून त्यांनीं कै. हरि अप्पाजींना चरणस्पर्शपूर्वक साष्टांग नमस्कार केला. हरि अप्पाजी व टिळक या दोघांनांही प्रस्तुत प्रेमप्रसंगानें गहिंवर आला. टिळकांना ऐतिहासिक घराणीं आणि त्यांतील सध्याचे वंशज याविषयीं विलक्षण अभिमान वाटत असे. ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. परंतु त्याचें प्रत्यन्तर या प्रसंगानें वेळासकरांच्या नजरेस आलें. तेव्हां तर परस्परांना कडकडून भेटणाऱ्या थोरपुरुषांप्रमाणेंच त्यांचेंही हृदय हेलावून गेलें. टिळकांसारखा अर्वाचीन महात्मा आपला सन्मान करतो हें न रुचून हरि अप्पाजीं त्यांना निवारीत होते व टिळक त्यांची थोरवी गाऊन त्यांच्याविषयीं सन्मानबुद्धि व्यक्त करीत होते हा देखावा अद्यापि डोळ्यांसमोर दिसत आहे. आणि त्यावेळीं टिळकांनीं उच्चारलेले शब्द अजून कानांमध्यें दुमदुमत आहेत. असा सोहळा क्वचितच भाग्यानें पहावयास सांपडत असावा अशी माझी समजूत आहे. टिळक केवळ हरि अप्पाजीं यांची भेट घेऊनच स्वस्थ राहिले नाहींत. त्यांनीं नंतर त्यांच्या पत्नीच्या पायांवर डोकें ठेविलें. ती माउलीदेखील आश्चर्यावेगानें गहिंवरून टपटप अश्रु ढाळूं लागली. 'खूप शर्थीनें' मराठ्यांचें डळमळीत सिंहासन कित्येक वर्षें संभाळून ठेवणाऱ्या यशवंत फडणीस नानांच्या वंशजांना आज खालावलेली विपन्न स्थिती यावी या कालचक्राच्या विपरीत फेऱ्यांचा झपाटा लक्षांत येऊन टिळकांचेही अंतःकरण भडभडून आलें.

" आपल्यासारखे ऐतिहासिक परंपरेचे दुवे आजकाल दृष्टीस पडणें दुर्लभ झालें आहे,' अशा अर्थाचे उद्गार टिळक त्यावेळीं काढीत होते.

* * *

हा प्रसंग विशेष असला तरी कै. लोकमान्यांच्या सहवासांत दृष्टीस पडलेल्या अथवा दूर असतां खात्रीलायक व्यक्तींच्या तोंडून ऐकलेल्या अनेक गोष्टी संस्मरणीय आहेत. १९०२ सालीं त्यांनीं मुंबई प्रेसिडेन्सी असोसीएशन समोर आर्यांचें मूल वसती स्थान यां विषयावर व्याख्यान दिलें. त्यावेळीं सदर संस्थेमध्यें मुंबईतील बहुतेक सुप्रसिद्ध विद्वानांचा संबंध होता. टिळकांच्या प्रस्तुत व्याख्यानानंतर त्या सर्वांची टिळक हे एक प्रचंड पंडित आहेत अशी खात्री झाली. त्यानंतर हे पुस्तक प्रसिद्ध होऊन १९०३ सालच्या सरकारी रिपोर्टांत या पुस्तकाचा मुद्दाम उल्लेख केलेला पहाण्यांत आला. तेव्हां त्यांच्या योग्यतेविषयीं चांगलीच साक्ष पटली. सरकारतर्फे ' moral and material Progress of India ' या नांवांचें एक पुस्तक ठराविक कालावधीनें प्रसिद्ध होत असतें. सरकारचें व टिळकांचें सख्य सर्वश्रुत आहे. त्यामुळें टिळकांच्या पुस्तकाचा गौरव सरकारी रिपोर्टांत आढळून येईल हें कोणासही शक्य वाटणार नाहीं. परंतु त्या पुस्तकाचा प्रभाव सरकारी रिपोर्टराच्याही मनावर झाला. ' ' A note-worthy book of this year ' अशा अर्थाच्या शब्दांनीं या पुस्तकाचा ह्या रिपोर्टांत उल्लेख केला आहे. टिळकांना ही गोष्ट माहिती नव्हती. सहजगत्या प्रस्तुत लेखकाकडून ती त्यांच्या कानावर जाण्याचा योग आला. व त्यांनीं सरकारी रिपोर्ट मागवून वरील शेरा आपल्या संग्रही ठेवला.

* * *

श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांचा अध्यक्षतेखालीं मुंबईस भरलेल्या अस्पृश्य परिषदेंत टिळकांचें एक सुश्राव्य व्याख्यान झालें. ही गोष्ट लोकांच्या ताज्या स्मरणांतली आहे. टिळक आणि समाजसुधारणा या अन्योन्याबद्दल लोकांत फार गैर समज असल्यानें त्यांनीं त्याप्रसंगीं सांगितलेल्या कांहीं गोष्टी लोकांच्या स्मरणांतून नाहींशा होण्याचा बराच संभव आहे टिळक समाज सुधारणेला प्रतिकूल होते असें ज्याचें मत आहे व मी देत असलेली गोष्ट मुद्दाम विसरतील व ज्यांचें तसें मत नाहीं त्यांना तिचें महत्व न वाटून तीं त्यांच्या स्मरणांतून जाईल. त्या व्याख्यानांत टिळकांनीं अस्पृश्यता निवारणाचें तत्व आणि महत्व उत्तम प्रकारें प्रतिपादन केलें होतें. आपण पूर्वीपासूनच सार्वजनिक कार्यांत स्पृश्यास्पृश्यतेचा भेद सोडला आहे हें लोकांच्या मनावर ठसविण्याकरितां त्यांनीं पुण्यास गणेशोत्सवाचा समाप्तीचे वेळीं विसर्जनाला जाणाऱ्या गणपतींच्या अग्रभागीं चांभारांचा व अन्नसंतर्पणाच्या जोरावर गोरगरीब ब्राह्मणेतरांचेंही चित्त उत्सवाकडे वेधून ध्यावें असे टिळकांनीं बेळासच्या उत्सवप्रसंगीं मुद्दाम बजावलें होतें.

* * *

अस्सल वापरा.

अत्तराचा रजा.

ओटो मोहिनी

चमेलीचे फुलाचा बहार.

सोल एजंट:- मोहिनी एजंट:-

जुम्मा मसजिद मुंबई.

अत्तराचा झरा

म्हणजे

रोबीनिया

हेअर

आईल

केसांना खरें सौंदर्य मिळविण्यास जगांत **रोबनीया**-सारखें दुसरें कोणतेंही तेल नाहीं. हें तेल नित्य वापरिल्यानें मस्तकाचे सर्व विकार नष्ट होऊन आणि केसांचें मुळांस योग्य असें पोषक द्रव्य मिळून केंस सुशोभित होऊन वाढतात. व आपण जणूं काय एखाद्या पुष्पवटिकेंतच बसलों आहो असें वाटतें.

किं. १ बा. रु. १

मोहिनी एजन्सी

जुमामसीद मुंबई.

कार्ड बिझिट साईज किंमत रु. १५.

फोटो काढण्याचा

छुपा कॅमेरा.

• आतांच विलायतेहून नवीन कॅमेरा आलेला आहे. त्यावरून लहान मुलगा देखील फोटो काढूं शकतो. धांवता बैल, उडता पक्षी, चालती आगगाडी. पाचपन्नास मनुष्यांचे ग्रूप, पैकीं वाटेल त्याचा फोटो सहज काढतां येतो. फोटो काढावयाचें काम आह्मीं प्रत्येकाला घरबसल्या शिकवूं शकतों. कॅमेरा बरोबर ६ डार्क स्लाईड, लेन्स, डायाफ्राम, दोन ह्यू फाईन्डर सटर, प्लेटरीकोर्डिंग, टाईम, इन्स्टीटीन्युसटाईसह किंमत रु. १५ पोष्ट खर्च रू. १॥

त्रासाशिवाय केंस काढण्याचा

बादशाही साबू.

वाटेल त्या जागीं हा साबू लाविला तर तेथील केंस चामडीस कोणत्याहि प्रकारचा डाग न पडतां अत्यंत सफाईनें निघून जातात. चामडी अतिशय मृदुगुलाबी होते. ३ वडयांचे १ पेटीची किंमत रु. १ पोष्टेज ४ आणें. प्रत्येक पेटीवर रजिस्टर नं. ५२९ तपासून घ्यावा. ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत.

सफेत केंस काळे करण्याकरितां

बादशाही हेअरडाय

तारुण्यांत अगर वृद्धावस्थेमुळें पिकलेले पांढरे केंस काळे होण्यास **बादशाही हेअरडाय** "हा एकच उत्तम कलप आहे. याच्या उत्तम" गुणावरून त्याचा खप अतिशय वाढला आहे. एकच वेळ लाविल्यानें पुनः कित्येक महिने कलप लावण्याची जरूरच पडत नाहीं. शिवाय इतर कलप लाविल्याने केंस तांभडे, पिंवळे, अगर भूरे रंगाचे होतात, तसें बादशाही हेअरडायनें होत नसून काळेच होतात. एका बाटलीची किंमत एक रुपाया. पोष्टेज ४ आणे. बाराबाटल्यांची किंमत पो. शिवाय रु. ९.

सोलएजंट–सी. सी. महाजन आणि कं.

शेख मेमन स्ट्रीट, मुंबई, २.

पैसे परत देऊं] मदनविलासचूर्ण [हमी वाचून पहा.

अथवा

इंडियन टॉनिक फूड.

शरीरांत कीड ठेवणें हें मरणाचें मूळ आहे हें चूर्ण दुधांत सेवन करीत गेलें असतां आंगांतील कडकी, उष्णता, पित्तरोग, वातरोग, प्रदररोग, मधुमेह, क्षयरोग, घाळंतरोग, खोकला, जीर्णज्वर, मूळव्याध, नपुसकत्व, धातूचा पातळपणा यांचा नाश होतो. कंबरदुखी हातापायाची आग, तोंडांतील चट्टे, वास मारणें, अन्नपचन न होणें हे विकार नाहीसे होतात. हें चूर्ण धातुपौष्टिक, वीर्यस्तंभक, कामोत्तेजक रक्तशुद्धिकारक असें असून यानें शौचासं साफ़ होतें.

किंमत ३० तोळ्यांचे डब्यास एक रुपाया. व्ही, पी सह १।= आणे, अनुपान सोबत, गुणावद्दल शेंकडों अभिप्राय आले आहेतत **हमी**-ह्या डब्यांत ३० तोळे चूर्ण असतें. ह्यांतून दररोज एक तोळ्याप्रमाणें १० दिवस चूर्ण खाऊन पसंत न पडल्यास बाकीचे चूर्ण परत करावें म्हणजे ट. ख. वजा करून पैसे परत पांठवून देऊं. दहा तोळ्यांचेवर चूर्ण खर्च केल्यास एक तोळ्यामागें दोन आणे कांपले जातील.

तयार करणार—**नारायण सखाराम पेंढारी**

मशीद बंदर, तार ऑफिस समोर.—मुंबई

लोकप्रिय ज्ञानमित्र पुस्तकमालेंतील अत्यंत तेजोमय-

एक रुपयांत तीन सुबोध कादंबऱ्या.

परमेश्वरी संकेत-उदात्त पतिपत्नी प्रेमाची ओळख पटविणारी. रहस्यमय कादंबरी. **हतभागी इंदू**-समाजांत विलक्षण चळवळ उडविणारी हृदयद्रावक नवल कथा. **एक रूपसौंदर्य कळस**-रम्य काव्यमय-हृदय नंदवारी-रोम्यांटिक कादंबरी. या तीन मनोरंजक कादंबऱ्या तुर्त एक रुपयांत देवूं. व्ही. पी. नें १०=

प्रो. **ज्ञानमित्र** शनवार पेठ **पुणेसिटी.**

EXCELSIOR.] [EXCELSIOR.

Do Not Loose The Unique-Opportunity of Bettering

Your Prospects and Earning Money.

:000:

THREE INVALUABLE GIFTS

1. Touch System in Typewriting.
2. Speedy Dictation In Short-hand, and
3. Prompt Execution of Type-copying work on Contract Basis.

TERMS STRICTLY MODERATE.

For full particulars apply to:—

The Proprietor.

The Thakurdwar Typewriting & Short-hand Studio

Jitekar's Chawl Thakurdwar Road.

BOMBAY, No. 2.

राणा त्रयदेशमुख वंधु उदार आश्रयाखालौ **मराटा-मित्र.** राजे वानखडे यांचे चाललेलें

हें तत्वज्ञान, चरित्र, इतिहास, शेती, शिक्षण, कविता, उद्योग, चर्चा, स्वभावचित्र व मनोरंजन इत्यादि विविधविषयांनीं अलंकृत असलेलें सर्वांगसुंदर मासिक आहे. विजयादशमीपासून प्रसिद्ध होंऊं लागलें. वर्षारंभ आक्टोबर. वार्षिक वर्गणी ट. ह. सह रु० २–१२–० जाहिराती देणारांनीं पत्रव्यवहार करावा. नमुना अंकास चार आणे.

पत्ता—म्यानेजर मराठा मित्र, महाल-नागपूर.

दी शांघवी स्टोअर.

सन्डहर्स्टरोड, लहेरी बील्डींग मुंबई

हरतऱ्हेचे गरम. रेशमी, सुती देशी व विलायती धोतरें, मथुरेच्या साडया, उंची मलमल, लॉगक्लाथ, गंजिफ्राक मोजे, टुवाल टोप्या, तयार केलेले कमीज, जाकीट, लहान मुलांचे झबलें, दरएक जातीचें सुगंधी अत्तरें, साबण छत्र्या, बूट, वहाणा वगैरे सामान एकच भावानें मिळेल. बाहेरगांवी व्ही. पी. नें माल पाठविला जाईल.

☞ मालाच्या खात्रीबद्दल एकवेळ अनुभव घ्या.

---

७ × ४ = २८

म्हणजेच दाते यांच्या

मूळव्याधीवर पुडया

कसलीही मूळव्याध एक आठवड्यांत कमी होते.
मुळव्याधीचा प्रकार जरूर कळविणें,
२८ पुड्या व्ही. पी. सह फक्त २-४
अत्यंत वीर्यस्तंभक, कामोत्तेजक

आनंद गुटिका.

१६ गोळया बाटली व्ही. पी. सह फक्त १-४
कॅटलाग नं. २ फुकट मागवा.

आनंद आणि कं. पुणें—शहर.

41.45
0494

94934
2cc19145

4E38

A7
9433